दैनिक
जनप्रभात
सामाजिक पीरवर्तनाचा बुलंद आवाज

जमीन गैरव्यवहार प्रकरणात झारखंडचे मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांना ईडीकडून अटक

रांची : मनी लॉंड्रिंग प्रकरणात झारखंडचे मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांना अटक करण्यात आली आहे. हेमंत सोरेन यांना ईडीने ताब्यात घेतले आहे. ईडीकडून अटक होताच, त्यांनी आपला राजीनामा राज्यपालांकडे सुपूर्द केला. महत्त्वाची बाब म्हणजे यावेळी नाट्यमय घडामोडी पाहायला मिळाल्या. कारण ईडीने सोरेन यांना ताब्यात घेतल्यानंतर ते ईडीच्या पथकासोबतच राज्यपालांकडे गेले आणि ईडीच्या अधिकाऱ्यांसमोर त्यांनी आपला राजीनामा राज्यपालांकडे दिला. तर राज्यपालांकडूनही तत्काळ तो राजीनामा मंजूर करण्यात आला आहे. हेमंत सोरेन यांच्या राजीनाम्यानंतर आता चंपई सोरेन हे मुख्यमंत्री पदाची शपथ घेतील.

* (आष्टी) वर्धा * गुरुवार दि.०१/०२/२०२४ * वर्ष : २ * अंक : २०४ * पाने : ८ * किंमत : ५ रु * मुख्य संपादकः- राहुल गजरे * उपसंपादकः- राठोड रमेश पंडित * कार्यकारी संपादकः-अवधूत शेंद्रे * RNI No : MAHMAR/2020/82242

अधिसूचनेवरून वादंग

मराठा आरक्षणावर ओबीसींमध्ये नाराजी, नेते आक्रमक

मुंबई : मराठा समाजाला ओबीसी आरक्षण देण्याबाबतची अधिसूचना राज्य सरकारने काढल्यानंतर ओबीसी समाजामध्ये प्रचंड नाराजी पसरली असून ओबीसी नेते आक्रमक झाले आहेत. ओबीसी नेते मंत्री छगन भुजबळ यांनी तर प्रसंगी सरकारमधून बाहेर पडण्याची तयारीदेखील दाखवली आहे. केंद्रीय मंत्री, भाजप नेते नारायण राणे हेदेखील मराठा समाजाला आरक्षण देण्यावरून नाराज आहेत, तर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ओबीसी आरक्षणाला धक्का लागू देणार नाही, अशी ग्वाही दिली आहे. त्यामुळे मराठा आरक्षणाच्या प्रश्नावरून सरकारमध्येच वादंग निर्माण झाले आहे.

ओबीसींवर अन्याय होऊ देणार नाही





नागपूर : ओबीसींच्या हक्कांचे जतन करावे लागेल, हे स्वतः मुख्यमंत्र्यांना देखील माहिती आहे. भाजप सत्तेत असेपर्यंत ओबीसींवर अन्याय होणार नाही. वेळ आली तर मी आमच्या पक्षश्रेष्ठींशी बोलेन, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. मराठ्यांना सरसकट कुणबी दाखले दिले जाणार नाहीत, ज्यांच्या कुणबी नोंदी मिळतील, त्यांनाच दाखले दिले जातील, याचा पुनरुच्चारही फडणवीस यांनी केला.

देवेंद्र फडणवीस म्हणाले, ''आमचे सरकार कोणत्याही परिस्थितीत ओबीसींवर अन्याय होऊ देणार नाही. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनाही माहीत आहे की, आपल्याला ओबीसी समाजाचे संरक्षण करायचे आहे. त्यामुळे त्यांचीही भूमिका स्पष्ट आहे. ओबीसी आरक्षणाला धक्का न लावता मराठा समाजाला आरक्षण देण्याची महायुती सरकारची भूमिका आहे.'' भुजबळांच्या वक्तव्यावर फडणवीस म्हणाले, ''मी स्वतः भुजबळांशी या विषयावर चर्चा करणार आहे. त्यांना जे काही आक्षेप असतील ते सांगावेत. कुठेही ओबीसींवर अन्याय होत असेल, तर त्यात नक्कीच बदल करू. जी काही सुधारणा करायची आहे ती करू, पण आम्ही कोणत्याही परिस्थितीत ओबीसींवर अन्याय होऊ देणार नाही.''

फडणवीस म्हणाले, ''मराठा आरक्षणासंबंधी घाईने निर्णय घेतलेला नाही. ज्यांच्या कुणबी नोंदी आहेत, त्यांना दाखले मिळतील. यासाठी हा निर्णय आहे.''

मला सरकारमध्ये ठेवायचे की नाही पक्षाने ठरवावे!

भुजबळ यांच्या वक्तव्याने महायुतीत अस्वस्थता



मुंबई : मला सरकारमध्ये ठेवायचे की नाही हे माझ्या पक्षाने ठरवावे, मुख्यमंत्र्यांनी ठरवावे. मला त्याची काही चिंता नाही. ओबीसी प्रश्नाचे दुःख आणि संताप आहे. त्यापुढे कोणतीही अभिलाषा नाही. त्यांना जाऊन सांगा तुम्ही यांना काढा म्हणून, मी एकटा नाही. माझ्या मागे ओबीसी समाज आहे. लाखो लोक आहेत, असे वक्तव्य राष्ट्रवादीचे नेते छगन भुजबळ यांनी केल्याने साऱ्यांच्या भुवया उंचावल्या आहेत. 'मराठ्यांना वेगळे आरक्षण द्या. त्याला आमचा विरोध कधीच नव्हता.

संमिश्र पानावर



पदापेक्षा जात, धर्म आणि देश महत्त्वाचा

मुंबई : मराठा आरक्षणाबाबत राज्य सरकारने घेतलेल्या निर्णयावरून केंद्रीय मंत्री नारायण राणे नाराज आहेत. या मुद्द्यावर भूमिका स्पष्ट करण्यासाठी आयोजित केलेली पत्रकार परिषद त्यांनी रद्द केलेली असली, तरी एक्स या सोशल मीडिया अकाऊंटवरून त्यांनी सूचक पोस्ट केली आहे. स्वाभिमानी मराठा हा कुणबी समाजामध्ये समाविष्ट होऊन आरक्षण घेणार नाही. तसे केल्यास ओबीसी समाजावर आक्रमण होणार आहे. या सगळ्या नाजूक प्रश्नाचा महाराष्ट्र सरकारने सखोल विचार करावा, असे सरकारला सुचवितानाच कोणत्याही पदापेक्षा जात, धर्म आणि देश महत्त्वाचा आहे, एवढंच मला सांगावेसे वाटते, असेही राणे यांनी स्पष्ट केले आहे.

संमिश्र पानावर

राज्यसभेच्या ५६ जागांसाठी निवडणूक घोषित

- राज्यातील ६ जागांचा समावेश
- बदलत्या राजकीय समीकरणामुळे रंगत

मुंबई : भारत निवडणूक आयोगाने सोमवारी १६ राज्यांतील राज्यसभेच्या रिक्त होणाऱ्या ५६ जागांसाठी निवडणूक जाहीर केली. यात महाराष्ट्रातील सहा जागांचा समावेश असून त्यासाठी २७ फेब्रुवारीला मतदान होणार आहे. राज्यसभा निवडणुकीसाठी होणारे मतदान हे खुले मतदान असल्याने पक्षादेश म्हणजे व्हीप महत्त्वाचा ठरणार आहे. राज्यात शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पडल्यानंतरची ही पहिलीच निवडणूक आहे. राज्यात बदललेल्या राजकीय पार्श्वभूमीवर या निवडणुकीसाठी मतदान झाल्यास बरीच रंगत येणार आहे. दरम्यान, शिवसेना उद्धव ठाकरे गटाला भरत गोगावलेंचा व्हीप मानावा लागणार असल्याने ठाकरे गटाची कोंडी होणार आहे.

संमिश्र पानावर

२ एप्रिल २०२४ रोजी मुदत संपणारे राज्यसभा सदस्य

भाजप
प्रकाश जावडेकर, व्ही.मुरलीधरन, नारायण राणे

शिवसेना ठाकरे गट
अनिल देसाई

राष्ट्रीय काँग्रेस
कुमार केतकर

राष्ट्रवादी शरद पवार गट
वंदना चव्हाण

महाराष्ट्र विधानसभेतील पक्षीय बलाबल

भाजप : १०४, राष्ट्रवादी (अजित पवार गट) : ४२. शिवसेना (एकनाथ शिंदे गट) : ४०, काँग्रेस : ४५, शिवसेना उद्धव ठाकरे गट : १६ राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) : ११, बहुजन विकास आघाडी : ३, समाजवादी पक्ष, एआयएम आणि प्रहार जनशक्ती प्रत्येकी २, महाराष्ट्र नवनिर्माण सेना, सीपीआयएम, शेकाप, स्वाभिमानी पक्ष, रासप, जनसुराज्य शक्ती, क्रांतिकारी शेतकरी पक्ष प्रत्येकी १ आणि अपक्ष १३ ... एकूण २८७

निवडक

ज्ञानवापीच्या तळघराचे वैज्ञानिक सर्वेक्षण करा

नवी दिल्ली : वाराणसीतील ज्ञानवापी मशिदीचे तळघर खुले करून प्रतिबंधित भागाचे वैज्ञानिक सर्वेक्षण करावे, अशी मागणी करणारी याचिका हिंदू पक्षाने सुप्रीम कोर्टात दाखल केली आहे. ज्ञानवापी मशिदीच्या परिसरात शिवलिंग असल्याचा दावा हिंदूंच्या वतीने करण्यात आला होता. त्यावर सुप्रीम कोर्टाने हा परिसर प्रतिबंधित करण्याचे आदेश यापूर्वीच दिले आहेत.

हिंदू पक्षाची सुप्रीम कोर्टात याचिका

संमिश्र पानावर

जेईई विद्यार्थिनीची आत्महत्या

कोटा : राजस्थानच्या कोटा शहरात आयआयटी जेईई परीक्षेला दोन दिवस राहिलेले असतानाच एका विद्यार्थिनीने आत्महत्या केली. तिच्या खोलीत आत्महत्यापूर्व चिठ्ठी मिळाली आहे. त्यात तिने तिचे दुःख व्यक्त केले आहे. तिने लिहिले की, मी परीक्षेच्या दबावाखाली आहे. आई-बाबा मी जेईई उत्तीर्ण होऊ शकत नाही. त्यामुळे मी आत्महत्या करत आहे. मी वाईट मुलगी आहे. मला माफ करा, पण हाच शेवटचा पर्याय आहे. ही मुलगी १८ वर्षांची असून ती जेईईचा

संमिश्र पानावर



मोबाईलचा वापर रिल्ससाठी नको, शिक्षणासाठी करा!

परीक्षा पे चर्चात पंतप्रधान मोदी यांचा सल्ला

नवी दिल्ली : मोबाईलचा वापर रिल्स बनवण्यासाठी न करता शिक्षणासाठी करा...चांगली झोप घ्या...स्पर्धेची भीती बाळगू नका...आदी महत्त्वाचे सल्ले पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोमवारी मुलांना दिले.

दहावी, बारावीच्या विद्यार्थ्यांना पंतप्रधानांनी 'परीक्षा पे चर्चा' या कार्यक्रमात मार्गदर्शन केले. या कार्यक्रमात तीन हजार विद्यार्थी सहभागी झाले होते. जवळपास दोन तास १० मिनिटे मोदींनी विद्यार्थ्यांच्या प्रश्नांची उत्तरे दिली.

पंतप्रधान म्हणाले की, जीवनात स्पर्धा आवश्यक असून कोणताही दबाव झेलण्याच्या लायक आपल्याला बनवले पाहिजे. तसेच प्रत्येक वेळी आई-वडिलांनी मुलांना समजवायला जाऊ नये. कधी आई तर कधी वडील तर कधी मोठा भाऊ मुलांना बोलतात. मात्र, मुलांवर त्यांचा दबाव पडतो. तुलना केल्याने मुलांच्या मनात द्वेष पसरतो. आई-वडिलांनी आपल्या मुलाची अन्य मुलांसोबत स्पर्धा करू नये. मुलांचे मार्कशीट तुमचे व्हिजिटिंग कार्ड बनू नये, असा सल्ला त्यांनी दिला.

शिक्षकांनी संगीताच्या सहाय्याने मुलांचा वर्ग आनंदित करू शकतात. शिक्षकांनी विद्यार्थ्यांशी संबंध चांगले केले पाहिजेत. शिक्षकांचे स्थान त्यांच्या जीवनात चांगले आहे, असे विद्यार्थ्यांना वाटत नाही. जेव्हा शिक्षक केवळ अभ्यासक्रमाबाहेर जाऊन विद्यार्थ्यांशी चांगले संबंध प्रस्थापित करतील तेव्हा मुले त्यांच्याशी सर्व तणावावर चर्चा करतील, असे पंतप्रधानांनी सांगितले.

परीक्षेपूर्वी विद्यार्थ्यांनी मन शांत ठेवावे. तणावाचा सामना करायला आपल्याला छोट्या छोट्या चुकांपासून वाचले पाहिजे. परीक्षा केंद्रात मित्रांसोबत थट्टामस्करी करा. दीर्घश्वास घ्या, त्यामुळे तुमच्या हातात पेपर आल्यानंतर तुम्हाला तणाव येणार नाही. परीक्षेत सर्वात मोठे आव्हान हे लिखाणाचे असते.

संमिश्र पानावर

लोकशाही संपवण्याच्या दिशेने पाऊल मानायचे का?

मुंबई : लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी पक्षांतर बंदी कायदा समितीच्या अध्यक्षपदी महाराष्ट्राचे विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांची नियुक्ती केली आहे. राहुल नार्वेकर यांच्या नेमणुकीवर शिवसेना ठाकरे गटाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी संताप व्यक्त केला आहे. राहुल नार्वेकरांची नेमणूक हे देशातील लोकशाही संपवण्याच्या दिशेने टाकलेले पुढचे पाऊल मानायचे का? असा सवाल त्यांनी केला आहे. आमदार अपात्र प्रकरणात नार्वेकर यांनी दिलेल्या निकालाविरोधात शिवसेना सर्वोच्च न्यायालयात गेली असताना ही नेमणूक करणे म्हणजे सर्वोच्च न्यायालयावरच दडपण आणण्याचाच प्रयत्न समजावा लागेल, असेही उद्धव ठाकरे म्हणाले आहेत.

लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी पक्षांतर बंदी कायदा समितीच्या अध्यक्षपदी महाराष्ट्राचे

राहुल नार्वेकरांच्या नियुक्तीवर उद्धव ठाकरेंचे टीकास्त्र



विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या नेमणुकीची घोषणा केली आहे. त्यांच्या नेमणुकीवर उद्धव ठाकरे यांनी संताप व्यक्त केला असून हे लोकशाही संपण्यासाठीचे पुढले पाऊल मानायचे का? असा सवाल उपस्थित केला आहे. महाराष्ट्रात नुकताच राज्यघटनेच्या परिशिष्ट दहाच्या चिंधड्या उडवून जो उफराटा निर्णय नार्वेकरांनी दिला त्याचे वस्त्रहरण आम्ही जनतेच्या न्यायालयात तर केले आहेच, पण त्या विरोधात सर्वोच्च न्यायालयातही गेलो आहोत. हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात असताना ही नेमणूक करणे म्हणजे सर्वोच्च न्यायालयावर दडपण आणण्याचाच प्रयत्न समजावा लागेल, असेही उद्धव ठाकरे म्हणाले.

आम्ही सर्वोच्च न्यायालयाहून मोठे आहोत, आम्ही म्हणू तेच संविधान आणि म्हणू तोच कायदा, यापुढे देशात असेल असे म्हणणारे कोणीही असले तरी त्याला डॉ. बाबासाहेबांनी दिलेल्या संविधानाची आणि लोकशाहीची ताकद दाखवावीच लागेल. अन्यथा देशात लोकशाहीची हत्या होऊन बेबंदशाही येईल, असे मत उद्धव ठाकरे यांनी व्यक्त केले आहे.

महिला कर्मचाऱ्यांना पेन्शनसाठी मुलगा, मुलगी वारस ग्राह्य

नवी दिल्ली : केंद्र सरकारने महिला कर्मचाऱ्यांना त्यांच्या पेन्शनसाठी पतीऐवजी मुलगी किंवा मुलाचे नामांकन करण्यास परवानगी दिली आहे. केंद्र सरकारचा निर्णय ऐतिहासिक असून त्याचा मोठा परिणाम सामाजिक आर्थिक स्तरावर होणार आहे, याबाबत अधिकृत माहिती देण्यात आली.

केंद्र सरकारचा निर्णय

पूर्वीपासून फॅमिली पेन्शन ही मृत व्यक्तीच्या जोडीदाराला दिली जाते. संबंधित जोडीदार व्यक्तीचा मृत्यू झाल्यानंतर त्याच्या कुटुंबातील अन्य व्यक्तींना ही पेन्शन मिळत होती.

केंद्रीय कार्मिक राज्यमंत्री जितेंद्र सिंह म्हणाले की, पेन्शन व पेन्शनर्स वेल्फेअर विभागाने केंद्रीय नागरी सेवा (पेन्शन) २०२१ मध्ये सुधारणा केल्या आहेत. या सुधारणानुसार, सरकारी महिला कर्मचारी किंवा पेन्शनर्सना त्यांच्या पेन्शनसाठी त्यांच्या पात्र मुलगा किंवा मुलांचे नामांकन करता येऊ शकेल.

या ऐतिहासिक निर्णयामागे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या महिलांना समान न्याय देण्याच्या भूमिकेचा मोठा आधार आहे. याचे मोठे परिणाम सामाजिक व आर्थिक होतील. यासाठी सरकारने कायद्यात सुधारणा केल्या आहेत. महिला कर्मचाऱ्यांना त्यांच्या पश्चात मुलगा किंवा मुलीला पेन्शनसाठी नामांकन केले जाऊ शकते, असे कार्मिक खात्याने सांगितले.

संमिश्र पानावर

राष्ट्रवादी आमदार अपात्रतेचा निर्णय १५ फेब्रुवारीपर्यंत घ्या

विधानसभा अध्यक्षांना निर्देश

नवी दिल्ली : राष्ट्रवादी काँग्रेसच्या आमदार अपात्रता प्रकरणावर १५ फेब्रुवारीपर्यंत निर्णय घ्यावा, असे सुप्रीम कोर्टाने विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांना सुनावले आहे. नार्वेकर यांनी या प्रकरणाच्या सुनावणीसाठी सुप्रीम कोर्टाकडे मुदतवाढ मागितली होती. त्याला सोमवारी न्यायालयाने मंजुरी दिली आहे.



राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पडल्यानंतर शरद पवार गटाने अजित पवार गटाच्या आमदारांना अपात्र ठरवावे, अशी याचिका सुप्रीम कोर्टात दाखल केली होती.

संमिश्र पानावर

तंदुरुस्तीसाठी नवीन नियम लागू

लष्करी अधिकाऱ्यांचा फिटनेस घसरला

नवी दिल्ली : देशाच्या लष्करातील अधिकाऱ्यांना अनेकदा आरोग्याच्या समस्यांना सामोरे जावे लागते. काही अधिकारी लठ्ठपणा तसेच इतर आजारांनी त्रस्त होतात. ही समस्या लक्षात घेऊन भारतीय लष्करातील अधिकाऱ्यांच्या शारीरिक तंदुरुस्तीसाठी नवीन नियमावली लागू करण्यात आली आहे. लष्करी अधिकारी शारीरिकदृष्ट्या तंदुरुस्त (फिट) असावेत, या उद्देशाने लष्कराच्या सर्व कमांड्सना पत्र पाठवले आहे. या पत्राद्वारे नव्या नियमावलीची माहिती दिली आहे. अनेकदा देशांतर्गत तसेच देशाबाहेरील मोहिमेवर असलेल्या अधिकाऱ्यांना आरोग्याच्या अनेक समस्या भेडसावतात.

नव्या बदलानुसार ब्रिगेडियर रँकवरील अधिकाऱ्याकडून अधिकारी तसेच जवानांची फिटनेस टेस्ट घेतली जाणार आहे. याआधी कमांडिंग ऑफिसरकडून जवानांची दर तीन महिन्यांच्या अंतराने फिटनेस टेस्ट घेतली जात होती. सध्या प्रत्येक जवान व अधिकाऱ्याच्या शारीरिक तंदुरुस्तीची नोंद एपीएसी कार्डवर केली जाते.

भारतीय लष्कराकडून अधिकारी व जवानांची शारीरिक कार्यक्षमता तपासण्यासाठी दर तीन महिन्यांच्या अंतराने दोन चाचण्या घेतल्या जातात. युद्ध शारीरिक कार्यक्षमता चाचणी व शारीरिक कार्यक्षमता चाचणी अशी या चाचण्यांची नावे आहेत. प्रत्येक जवानाच्या शारीरिक चाचणीच्या निकालाची नोंद एसीआर (वार्षिक गुप्तता अहवाल) मध्ये नोंदवून घेतली जाते.

दोन नियमित चाचण्यांबरोबरच आणखी एक चाचणी केली जाणार आहे.



दर सहा महिन्यांनी फिटनेस टेस्ट

दोन नियमित चाचण्यांसमवेत आता आणखी एक चाचणी लष्करी अधिकाऱ्यांसाठी बंधनकारक असणार आहे. त्यानुसार दर सहा महिन्यांनी १० किमी स्पीड मार्च, ३२ किमी रूट मार्च व वर्षातून एकदा ५० मीटर जलतरण चाचणी अधिकाऱ्यांना द्यावी लागणार आहे. नव्या धोरणानुसार, या चाचण्यांमध्ये लठ्ठपणामुळे अपयशी होणाऱ्या अधिकाऱ्यांना वजन कमी करण्यासाठी ३० दिवसांचा कालावधी दिला जाणार आहे. तसेच वजन कमी करण्यासाठी त्यांना लेखी माहिती पुरवली जाणार आहे. गरज पडल्यास त्यांच्या सूचनांमध्ये कपातही होऊ शकते.

दोन वर्षांच्या कार्टर डलासचा विक्रम

एव्हरेस्ट बेस कॅम्पवर पोहोचणारा सर्वात लहान मुलगा

काठमांडू : कार्टर डलास, वय वर्षे २. या चिमुरड्याने माऊंट एव्हरेस्टच्या बेस कॅम्पवर पाऊल ठेवून जागतिक विक्रम केला आहे. यापूर्वी माऊंट एव्हरेस्टच्या बेस कॅम्पवर पाऊल ठेवणारा मुलगा चार वर्षांचा होता.

कार्टरने माऊंट एव्हरेस्ट बेस कॅम्पवर जाण्याचा प्रवास वडील रॉस व आई जेड यांच्या पाठीवरून केला. स्कॉटलंडला राहणारे रोस व जेड हे आपल्या मुलासह एका वर्षाच्या आशियाच्या प्रवासाला निघाले आहेत. यासाठी त्यांनी आपले घर भाड्याने दिले आहेत. गेल्यावर्षी २५ ऑक्टोबरला माऊंट एव्हरेस्टच्या बेस कॅम्पवर चढाईला सुरुवात केली. त्यानंतर ते तेथे पोहोचले. याबाबत रॉस म्हणाले की, आमच्यापेक्षा कार्टर हा अधिक उत्साहित होता. मला व झेडला उंचावर जाताना श्वास घेताना त्रास होत होता. मात्र कार्टरला काहीच अडचण झाली नाही. बेस कॅम्पवर चढाईपूर्वी दोन डॉक्टरांनी त्यांची तपासणी केली. त्यांची आमची रक्तचाचणी केली.



आमच्या तुलनेत कार्टर हा अधिक सुदृढ होते. आम्ही ट्रॅकिंगसाठी अन्नाची पाकिटे व दोन स्लीपिंग बॅग खरेदी केल्या. काठमांडू पोहचल्यानंतर २४ तासांत आम्ही चढाईला सुरुवात केली. आम्ही दीर्घ श्वास घेण्याचा प्रयत्न सुरू केला. घरात आम्ही बर्फाच्या पाण्याने आंघोळ करत होतो. आम्ही कार्टरलाही त्याच पाण्याने आंघोळ घालत होतो.

संपादकीय .....

वाढवण रेटण्याची घिसाडघाई!

राज्य सरकारने अपेक्षेप्रमाणे वाढवण बंदर जनसुनावणीचा फार्स कडक पोलीस बंदोबस्तात शुक्रवारी उरकला. त्याआधी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भाजपशी संबंधित मच्छीमार समाजाच्या नेत्यांशी चर्चा करून सरकार वाढवणवासीयांच्या सोबत असल्याचे आश्वासित केले. वाढवण विरोधकांनी ही जनसुनावणी होऊ नये यासाठी मुंबई हायकोर्टातही धाव घेतली होती, पण हायकोर्टातून दिलासा न मिळाल्याने जनसुनावणी ठरल्याप्रमाणे पार पडली. वाढवण बंदराला विरोध करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर जनता उपस्थित होती. पालघरचे जिल्हाधिकारी गोविंद बोडके यांनी राज्य सरकारच्या आज्ञेनुसार पोलिसांच्या कडेकोट बंदोबस्तात जनसुनावणी रेटून नेली. त्यामुळे वाढवण बंदर होण्याचा मार्ग सुकर झाला आहे. पालघर जिल्ह्यातील डहाणू तालुक्यात वाढवण बंदर भाजपचा आता मुख्य अजेंडा बनला आहे. राज्यात पहिल्यांदा शिवसेना-भाजप युतीचे सरकार आले तेव्हा वाढवण बंदराविरोधात जोरदार आंदोलने होत होती. त्याची दखल घेत शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी वाढवण बंदराची माहिती घेण्यासाठी तेव्हा उद्धव ठाकरे यांना पाठवले होते. त्यानंतर गावकर्यांचा विरोध असेल तर वाढवण बंदर होऊ देणार नाही, अशी भूमिका बाळासाहेब ठाकरे यांनी घेतली होती. तेव्हापासून वाढवण बंदराचा मार्ग खडतर झाला होता.महाविकास आघाडी सरकारच्या काळात उद्धव ठाकरे यांनीही वाढवण बंदर होऊ नये याची काळजी घेतली होती, मात्र राज्यात सत्तांतर झाल्यानंतर वाढवण बंदराच्या हालचाली सुरू झाल्या होत्या. पंतप्रधान नरेंद्र मोदी सरकारला वाढवण बंदर उभारण्याची घाई झालेली आहे. आता तर वाढवण बंदराचा मार्गच मोकळा झाल्याचे दिसत आहे. जनसुनावणीत पालघर जिल्ह्यातील राजकीय लोकांचेही पाठबळ नसल्याचे दिसून आले. वाढवण बंदरविरोधकांना आता रस्त्यावरची आणि न्यायालयीन लढाईचा मार्ग शिल्लक राहिला आहे. त्यामुळे आता त्यांना त्या अनुषंगाने विचार करण्याशिवाय पर्याय नाही.गेल्या काही महिन्यांपासून जेएनपीटीमार्फत विविध वर्तमानपत्रात वाढवण बंदराची माहिती देणार्या मोठ्या जाहिराती प्रसिद्ध झाल्या तेव्हाच वाढवण बंदर होणार याची चाहूल लागली होती. जेएनपीटीच्या अधिकार्यांनी पालघरमध्ये येऊन माध्यमांशी संवाद साधून वाढवण बंदर किती महत्त्वाचे आहे, हे सांगण्याचा प्रयत्न केला, तेव्हाच जनसुनावणी घेतली जाईल, असेही जाहीर करण्यात आले होते. त्यानंतर पालघरचे पालकमंत्री रवींद्र चव्हाण यांनी वाढवण बंदराची महती सांगण्यासाठी पालघर जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींची मुंबईत बैठक आयोजित केली होती.या हालचाली बंदर मार्गी लावण्यासाठीच असल्याचे दिसत होते. वाढवण बंदरविरोधी समितीने जनसुनावणी इतक्या घाईत घेऊ नये, यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंना साकडे घातले होते. बाळासाहेब ठाकरे यांचे विचार पुढे नेण्यासाठीच त्यांच्या पुत्राविरोधात बंड केले, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि त्यांचे समर्थक सातत्याने सांगत आहेत. त्यामुळे बाळासाहेब ठाकरे यांनी घेतलेलीच भूमिका मुख्यमंत्री शिंदे घेतील, अशी भाबडी आशा वाढवण बंदरविरोधकांची होती, पण मुख्यमंत्र्यांनी त्यांची निराशा केली. इतकेच नाही तर पालघर जिल्ह्यातील लोकप्रतिनिधीही वाढवण बंदरविरोधकांच्या पाठीशी नसल्याचे चित्र आहे.जनसुनावणीत राष्ट्रवादीचे आमदार सुनील भुसारा आणि माकपचे आमदार विनोद निकोले वगळता एकही लोकप्रतिनिधी हजर नव्हता. या दोन आमदारांसह शिंदे गटाचे जिल्हाप्रमुख कुंदन संखे यांनी जनसुनावणी स्थगित करण्याची मागणी केली. जनसुनावणीच्या पूर्वी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भाजपशी संबंधितच मच्छीमार समाजाच्या नेत्यांशी संवाद साधून वाढवणवासीयांच्या सोबत असल्याचे चित्र निर्माण करण्याचा प्रयत्न केला होता. अर्थातच त्यावर मच्छीमार समाजातील लोकांनी टीकेची झोड उठवली होती.शुक्रवारी झालेल्या जनसुनावणीकडेही आता वाढवणविरोधक संशयाने पाहू लागले आहेत. जनसुनावणीच्या जागी प्रचंड पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. सभागृहातील खुर्च्यांवर मोठ्या प्रमाणावर पोलीस बसलेले दिसत होते. या ठिकाणी अडीच हजारांहून अधिकचा पोलीस फौजफाटा तैनात केल्याचे सांगितले जाते. कुणीही व्यासपीठापर्यंत पोहोचू नये याची सर्व खबरदारी घेतली गेली होती. जिल्हाधिकारी गोविंद बोडके विरोधकांचे संपूर्ण बोलणे ऐकून घेण्याच्या मनस्थितीत दिसत नव्हते, इतकी घाई त्यांना जनसुनावणी पार पाडण्याची झाली होती.जनसुनावणीत भाजपने वाढवण बंदराला समर्थन देणार्यांना मोठ्या प्रमाणावर पाठवण्याचेही काम केले होते. त्यामुळे प्रकल्पाला समर्थन देण्यासाठी भाजपचे स्थानिक नेते, पदाधिकारी यांच्यासह उत्तर भारतीय महिला मोठ्या संख्येने हजर होते. यावर मच्छीमारांनी जोरदार हरकत घेत गोंधळ घातल्याने समर्थकांना सुनावणीत भाग घेण्याचे धाडस झाले नाही. जनसुनावणीआधी अहवाल मराठीत देण्याची मागणी मान्य केली गेली असली तरी त्यात अनेक तांत्रिक त्रुटी आणि सदोष अनुवाद असल्याचा आक्षेप नोंदवत विरोधकांनी पर्यावरणीय अभ्यास अपूर्ण असल्याचेही निदर्शनास आणून दिले, पण त्याचीही दखल घेतली गेली नाही.वाढवण बंदराबाबत अनेक आक्षेप आहेत. असे असताना यावर सविस्तर बाजू मांडण्याची संधी दिली गेली नसल्याचा आरोप विरोधकांकडून केला जात आहे. बंदराविरोधातील तांत्रिक मुद्दे मांडण्यासाठी पुरेसा वेळ देण्याची गरज होती, पण जिल्हाधिकार्यांनी अवघ्या साडेपाच तासात जनसुनावणी गुंडाळून टाकली. एकंदरीत देशातील सर्वात मोठे आणि जगातील पाचव्या क्रमांकाचे बंदर उभारण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकारने जनसुनावणीचाही सोपस्कार पूर्ण करण्याचे काम केले आहे. त्यावरून केंद्र आणि राज्य सरकारला वाढवण बंदराचे काम मार्गी लावायचेच आहे, हे स्पष्ट झाले आहे.

जलजीवन आणि संस्कृती पोषक! आंतरराष्ट्रीय पाणथळ प्रदेश दिन.

जागतिक पाणथळ जमीन दिवस हा एक पर्यावरणाशी संबंधित उत्सव आहे, जो १९७१चा आहे, जेव्हा अनेक पर्यावरणवादी पाणथळ प्रदेशांच्या संरक्षण आणि प्रेमाची पुष्टी करण्यासाठी एकत्र आले होते, ज्या जल परिसंस्था आहेत ज्यात वनस्पती जीवन आणि इतर जीव आहेत जे केवळ पाणीच नाही तर पर्यावरणीय आरोग्यास भरपूर प्रमाणात आणतात. शरीरे पण संपूर्ण वातावरण, जागतिक पाणथळ प्रदेश सचिव विभाग मूळचा ग्लैंड, स्वित्झर्लंडचा आहे. कॅस्पियन समुद्राच्या किनाऱ्यावरील इराणी शहर रामसर येथे रामसर अधिवेशनाचा अवलंब दि.२ फेब्रुवारी १९७१ रोजी झाला. श्रीकृष्णदास (बापू) निरंकारी यांचा हा मार्गदर्शक संकलित लेख जरूर वाचाच... संपादक.

इराणमधील कॅस्पियन या समुद्राच्या किनाऱ्यावरील रामसर या शहरी पाणथळ प्रदेशाचे महत्त्व या विषयावर परिषद आयोजित करण्यात आली होती. पाणथळ प्रदेशांना मानवी जीवनात असलेले स्थान सर्वांना समजावे या हेतूने दर वर्षी २ फेब्रुवारीचा दिवस वेटलँड्स डे साजरा केला जावा, असा निर्णय या परिषदेत घेतला गेला. असा पहिला दिवस १९९७ साली साजरा झाला होता. पाणथळ प्रदेश म्हणजे नदी, तलाव, सागरी किनारे अशा ठिकाणी उथळ पाण्याने झाकलेल्या व अनेकविध प्रकारच्या गवतांनी आणि झुडपांनी भरलेल्या पाणथळ जमिनी आपल्याला आढळतात. त्यामध्ये कृत्रिम तलाव व कालवे, मिठागरे, सांडपाण्याचे तलाव, मत्स्यशेती तलाव, शेततळी, भाताची खाचरे अशा मानवनिर्मित स्थळांचाही समावेश होतो.असा बहु उपयोगी पाणथळ प्रदेशात सद्या आपण भूगर्भातील पाण्याचा भरपूर वापर करतो. या पाण्याचे पुनर्भरण करण्याचे काम असे प्रदेश करतात. अनेकदा आपण प्रदूषित पाणी व इतर हानिकारक द्रव्ये अशा प्रदेशात फेकतो खरे; परंतु पाणथळ जागी वाढणाऱ्या वनस्पतीच या घटकांना गाळण्याचे काम करून पाणी शुद्ध करतात. उदा.कोलकात्यातून बाहेर टाकल्या जाणाऱ्या घाण पाण्याचा काही भाग शुद्ध करण्यासाठी जवळच्या पाणथळ प्रदेशाचा वापर केला जातो. भातखाचरे आणि मत्सबीज उत्पादनासाठी बनवलेली तळी हे देखील पाणथळ प्रदेशच असल्याने त्यांमधून जगभरातील ३ अब्ज लोकांना दररोजचे अन्न- भात आणि मासे मिळते. सागरी किनारपट्टीवर असलेल्या अशा गवतयुक्त पाणथळ प्रदेशांमुळे लाटांनी होणारी किनाऱ्यांची धूप थांबवली जाऊन वादळांपासून होणारे नुकसानही घटते. शिवाय समुद्राचे आक्रमण थोपवून किनारी जमीन अतिक्षारयुक्त- निरुपयोगी खारपड होण्याची क्रियाही तेथील मॅनग्रुव- खारफुटी प्रकारच्या झुडपांमुळे कमी होते. नदीला पूर आल्यास किंवा अतिवृष्टी झाल्यासही हे जास्तीचे पाणी किनारी पाणथळ प्रदेशात मुरते व मानवी वस्ती जलमय होण्याच्या संभाव्य धोक्याचे प्रमाण कमी होते. महाराष्ट्राचा विचार केल्यास असे दिसते, की इथले महत्त्वाचे पाणथळ प्रदेश हे दख्खनच्या पठारावरील नद्या-उपनद्या, धरणांमागील जलाशय आणि पाझर तलावांच्या आसपासच्या परिसंस्था आहेत. यामुळे भूजलाचे पुनर्भरण आणि पाझर यात मोलाची मदत होते. पक्षी आणि पाणथळ प्रदेशात बगळे, बदके, करकोचे, खंड्या तसेच शिकारी प्रजातींच्या व इतरही अनेक पक्ष्यांना पाणथळ प्रदेशांतूनच अधिवास मिळतो. प्लवर सारख्या विशिष्ट प्रजातींची घरटी पाणथळ प्रदेशांत आढळतात. करकोचे, शराटी-इबिस, चमचा, रोहित- फ्लेमिंगो हे पक्षीही पाणथळ जागीच येतात. अगदी सायबेरियासारख्या प्रदेशांतूनही क्रेन आणि बदके इथे येतात. कारण इथे त्यांना अन्न मिळते. हे पक्षी या प्रदेशातील अन्नसाखळीतला एक महत्त्वाचा दुवा असतात. आपण काय करू शकतो. दुर्दैवाने आज पाणथळ प्रदेशांकडे वाया गेलेली जमीन म्हणूनच पाहिले जाते, पण जैविक आणि पर्यावरणीय साखळीतील त्यांचे महत्त्वाचे स्थान लक्षात घेऊन ते जतन करून, तिथला कचरा इ.दूर करून त्यांचा सजगतेने वापर करणे गरजेचे आहे. प्रत्येकाने आपली जबाबदारी ओळखून वैयक्तिक पातळीवर सुद्धा पाणथळ प्रदेश वाचविण्याचा प्रयत्न केला तरी या दिशेने एक ठोस पाऊल उचलले जाऊ शकते. आपल्या प्रत्येकाच्या खारीच्या वाट्याने पृथ्वीवरची ही महत्त्वाची समस्या काही प्रमाणात कमी होऊ शकते आणि पर्यावरणाची बूज राखली जाऊ शकते.

जागतिक पाणथळ भूमी दिवस दरवर्षी फेब्रुवारीच्या दुसऱ्या दिवशी साजरा केला जातो, जरी तो १९९७पर्यंत साजरा केला जात नव्हता. हा दिवस जगभरातील पाणथळ प्रदेशांचा प्रभाव आणि सकारात्मक उत्पादन अधोरेखित करतो आणि समुदायांना फायद्यासाठी एकत्र आणतो. हा दिवस केवळ लोकांसाठीच नाही तर ग्रहासाठी पाणथळ भूभागाच्या महत्त्वपूर्ण भूमिकेबद्दल जागतिक जागरूकता वाढवतो. समुदाय रक्षक आणि पर्यावरणप्रेमी सर्वजण या दिवशी एकत्र येऊन निसर्गावरील त्यांचे प्रेम उत्सवाच्या माध्यमातून साजरे करतात, जे केवळ मानवांसाठीच नव्हे, तर जगातील सर्व प्रकारच्या जीवांसाठी पाणथळ प्रदेशांनी काय केले हे ओळखते. कालांतराने मानवी बांधकामामुळे पाणथळ प्रदेशांवर परिणाम करणाऱ्या विविध पर्यावरणीय समस्या निर्माण झाल्या आहेत. जास्त लोकसंख्या आणि बांधकामामुळे पर्यावरण संवर्धन कमी झाले आहे. अनेक पाणथळ जागा गमावल्या जात आहेत आणि पर्यावरण शास्त्रज्ञांचा असा दावा आहे की जगाचा नैसर्गिक फिल्टर आणि संरक्षक हरवण्याआधी मानवाने कोंडी ओळखली पाहिजे.

सन १९९८पासून रामसर सचिवालयाने आर्थिक सहाय्यासाठी डॅनोन ग्रुप इव्हियन फंड फॉर वॉटर-पॅरिसच्या बाहेरील आणि बार्सिलोना, स्पेनमध्ये स्थापित सह भागीदारी केली आहे. रामसर सचिवालयासाठी ज्याला रामसर कन्व्हेन्शन ऑन वेटलँड्स ऑफ इंटरनॅशनल इम्पॉर्टन्स म्हणूनही ओळखले जाते, विशेषत: वॉटरफॉल हॅबिटॅट म्हणून या आर्थिक सहाय्यान डब्ल्यूडब्ल्यूडी साजरा करण्यासाठी आयोजित केलेल्या देशांच्या उपक्रमांना समर्थन देण्यासाठी लोगो, पोस्टर्स, फॅक्टशीट्स, हँडआउट्स आणि मार्गदर्शक दस्तऐवजांसह विविध पोहोच सामग्री तयार केली आहे. हे साहित्य जागतिक पाणथळ दिवस वेबसाइटवर अधिवेशनाच्या तीन भाषांमध्ये विनामूल्य डाउनलोड करण्यासाठी उपलब्ध आहे, इंग्रजी, फ्रेंच आणि स्पॅनिश भाषेत. असे म्हटल्याबरोबर सर्व साहित्य इव्हेंट आयोजकांसाठी त्यांच्या स्थानिक भाषा आणि संदर्भांमध्ये सानुकूलित करण्यासाठी आणि त्यांना अनुकूल करण्यासाठी त्यांच्या डिझाइन फाइल्समध्ये देखील उपलब्ध आहेत.सन सचिवालयाला विनंती केल्यावर काही मुद्रित प्रती देशांना उपलब्ध करून दिल्या आहेत.

श्रीलंकेत जागतिक पाणथळ प्रदेश दिन साजरा झाला. सन २०१५पासून सुरू होणारी, २ फेब्रुवारीपासून सुरू होणारी महिनाभर चालणारी वेटलँड्स युथ फोटो स्पर्धा तरुणांना लक्ष्य करण्यासाठी आणि त्यांना डब्ल्यूडब्ल्यूडीमध्ये सहभागी करून घेण्यासाठी नवीन दृष्टिकोनाचा एक भाग म्हणून सादर करण्यात आली. १५ ते २४वयोगटातील लोक एखाद्या विशिष्ट पाणथळ जमिनीचे छायाचित्र घेऊ शकतात आणि ते फेब्रुवारी आणि मार्च महिन्यांदरम्यान जागतिक पाणथळ दिवस वेबसाइटवर अपलोड करू शकतात. सन १९९७पासून रामसर वेबसाइटने त्यांच्या डब्ल्यूडब्ल्यूडी क्रियाकलापांचे सुमारे १०० देशांतील अहवाल पोस्ट केले आहेत. सन २०१६मध्ये देशांना त्यांच्या क्रियाकलापांना प्रोत्साहन देण्यासाठी आणि डब्ल्यूडब्ल्यूडी नंतर अहवाल देणे सुलभ करण्यासाठी कार्यक्रमांचा नकाशा सादर करण्यात आला. आजवरच्या जागतिक पाणथळ प्रदेश दिन थीम- दरवर्षी लक्ष केंद्रित करण्यासाठी आणि पाणथळ जमिनीच्या मूल्याविषयी जनजागृती करण्यात मदत करण्यासाठी एक थीम निवडली जाते. देश जागरूकता वाढवण्यासाठी विविध कार्यक्रम आयोजित करतात. जसे की; व्याख्याने, परिसंवाद, निसर्ग पदयात्रा, मुलांच्या कला स्पर्धा, संपन्न शर्यती, समुदाय स्वच्छता दिवस, रेडिओ आणि दूरदर्शन मुलाखती, वर्तमानपत्रांना पत्रे, नवीन पाणथळ धोरणे, नवीन रामसर साइट्स आणि राष्ट्रीय स्तरावर नवीन कार्यक्रम समाविष्ट असतात. सन २०२३मध्ये जागतिक पाणथळ दिवसाची थीम ''वेटलँड्स रिस्टोरेशन'' अशी अपेक्षित होती आणि ती ओलसर जमिनीच्या पुनर्संचयनावर आधारित असावी, असे वाटत होते. सन २०२३- आर्द्र प्रदेश पुनर्संचयित करण्याची वेळ आली आहे, सन २०२२- लोक आणि निसर्गासाठी पाणथळ कृती, सन २०२१- ओलसर जमीन आणि पाणी, सन २०२०- पाणथळ प्रदेश आणि जैवविविधता, सन २०१९- पाणथळ प्रदेश आणि हवामान बदल, सन २०१८- शाश्वत शहरी भविष्यासाठी पाणथळ प्रदेश, सन २०१७- आपत्ती जोखीम कमी करण्यासाठी पाणथळ जागा, सन २०१६- आमच्या भविष्यासाठी आर्द्र प्रदेश: शाश्वत उपजीविका, सन २०१५- आमच्या भविष्यासाठी वेटलँड्स, सन २०१४ पाणथळ जमीन आणि शेती: वाढीसाठी भागीदार, सन २०१३- पाणथळ जागा पाण्याची काळजी घेतात, सन २०१२- वेटलँड पर्यटन: एक उत्तम अनुभव, सन २०११- पाण्यासाठी जंगले आणि ओलसर जमीन, सन २०१२- आर्द्र प्रदेशांची काळजी घेणे- हवामान बदलाचे उत्तर, सन २००९- अपस्ट्रीम, डाउनस्ट्रीम: वेटलँड्स आपल्या सर्वांना जोडतात, सन २००८- निरोगी पाणथळ प्रदेश, निरोगी लोक, सन २००७- उद्यासाठी मासे? सन २००६- जीविका धोक्यात, सन २००५- वेटलँड विविधतेमध्ये संपत्ती आहे- ते गमावू नका, सन २००४- पर्वतांपासून समुद्रापर्यंत- आमच्यासाठी ओलसर जमीन काम करत आहे, सन २००३- ओलसर जमीन नाही- पाणी नाही, सन २००२- पाणथळ प्रदेश: जलजीवन आणि संस्कृती, सन २००१- एक आर्द्र जग- शोधण्यासारखे जग, सन २०००- आमच्या संघटना आंतरराष्ट्रीय महत्त्वाचे पाणथळ प्रदेश दिन साजरे करत आहे, सन १९९९- लोक आणि पाणथळ जमीन- महत्त्वाचा दुवा, सन १९९८- जीवनासाठी पाण्याचे महत्त्व आणि पाणीपुरवठ्यात पाणथळ जमिनीची भूमिका,सन १९९७- डब्ल्यूडब्ल्यूडी प्रथमच साजरा केला, हे विशेष!!! विश्व पाणथळ प्रदेश दिन निमित्त सर्वांना हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!

दै.जनप्रभात
- संकलन व सुलेखन -
श्रीकृष्णदास बापू निरंकारी.
रामनगर वॉर्ड, गडचिरोली.
फक्त व्हॉट्सॲप- ९४२३७१४८८३.

हरहुन्नरी कर्तबगारीचे धनी: राजा बढे!

राजा बढे जयंती सप्ताह विशेष.

राजा नीळकंठ बढे हे संपादक, चित्रपट अभिनेते, गद्य लेखक, नाटककार, कादंबरीकार, कथाकथनकार आणि गायक असले तरी त्यांची खरी ओळख मराठी कवी आणि गीतकार अशीच होती. या विदर्भाच्या माणिक-मोतीविषयी त्यांच्या जयंतीप्रित्यर्थ अलककार- श्री कृ. गो. निकोडे गुरूजींचा माहितीपूर्ण व प्रेरक लेख वाचकांच्या सेवेत... संपादक.

राजाभाऊ बढे यांचे त्यांच्या बकुल नावाच्या मोठ्या भावावर अतोनात प्रेम होते. भाऊ वारल्यावर त्यांनी धाडिला राम तिने का वनी या नाटकातले घाई नको बाई अशी, आले रे बकुळफुला हे गीत रचले होते. मुंबईतील कवी राजा बढे चौक त्यांच्या नावावर आहे. नागपूरच्या महाल पेठेतील सीपी ॲन्ड बेरार महाविद्यालयासमोरील चौकासही राजा बढे यांचे नाव दिले आहे. महाराष्ट्राचा प्राचीन राजा हाल सातवाहन यांच्या काव्यांचे संकलन असलेल्या गाथा सप्तशतीचा मराठी अनुवाद हा राजा बढे यांच्या लेखनाची अत्युच्च कार्यसिद्धी समजली जाते. राजा नीळकंठ बढे यांचा जन्म दि.१ फेब्रुवारी १९१२ रोजी विदर्भात नागपूर येथे झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण छिंदवाडा येथे तर माध्यमिक शिक्षण नागपूरच्या टिळक विद्यालयात झाले. सन १९३५मध्ये त्यांनी पंजाब विद्यापीठातून मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण केली. पुढची पाच वर्षे अशीतशीच घालवून त्यांनी पुण्याच्या दैनिक सकाळमध्ये उमेदवारी केली. एका वर्षानंतर ते नागपूरला परतले. नागपूरच्या दैनिक महाराष्ट्रमध्ये ते वर्षभर सहसंपादक होते. त्याचवेळी राजा बढे हे नागपूरच्या बागेश्वरी मासिकाच्या संपादक मंडळात होते. तिथून निघून बढे यांनी साप्ताहिक सावधानमध्ये मावकर-भावे यांच्याबरोबर काम केले. दरम्यानच्या काळात ते नागपूरच्या एका कॉलेजात दाखल झाले. सन १९३९ साली बीएच्या वर्गात असताना त्यांनी कॉलेज सोडून दिले. ते पदवीधर झाले नाहीत. मात्र कॉलेजमध्ये असताना त्यांनी कोंडिबा या टोपणनावाने बरेचसे स्फुटलेखन केले. आई-वडिलांच्या निधनानंतर मोठा भाऊ म्हणून लहान भावंडांची जबाबदारी पालनपोषण यांतच सर्वस्व मानून राजा बढे स्वतः अविवाहित राहिले.

राजा बढे हे सन १९५६ ते १९६२ या कालखंडात आकाशवाणीवर निर्माता म्हणून काम करीत होते. या नोकर्यांच्या धरसोडीत त्यांचे कॉलेजशिक्षण राहून गेले. मुंबई आकाशवाणीवरच्या नोकरीनंतर त्यांनी आकाशवाणीला छोटे छोटे माहितीपट करून दिले. चित्रपटात काम करावे, या विचाराने ते सन १९४० साली पार्श्वनाथ आळतेकर यांच्याकडे गेले. त्यांचे शिष्यत्व पत्करून त्यांनी त्यांच्या सिरको फिल्म्समध्ये दोन वर्षे उमेदवारी केली. व्हॉईस कल्चरचे धडे त्यांनी आळतेकरांकडून घेतले. दोन वर्षांनी ते नागपूरला परतून प्रकाश स्टुडिओमध्ये रुजू झाले. बंधू बबनराव यांच्या मदतीने त्यांनी स्वानंद चित्र ही संस्था उभी केली आणि रायगडचा राजबंदी हा संभाजी महाराजांच्या जीवनावरील चित्रपट काढला. राजा बढे यांना संस्कृत काव्याचा आणि उर्दू शायरीचा गाढा अभ्यास होता. तरीही त्यांच्या कवितेतील भाषा बोजड नव्हती. गीत, गझल याप्रमाणेच चारोळी हा रचनाप्रकार त्यांनी हाताळला. कोंडिबा हे टोपण नाव वापरून काही राजकीय वात्रटिका त्यांनी लिहिल्या. मुंबईच्या विविधवृत्तात त्या प्रकाशित होत असत. स्वातंत्र्यवीर सावरकर हेच त्यांचे दैवत होते. त्यांचे राष्ट्रप्रेम त्यांच्या क्रांतिमाला-१९५२ या संग्रहातून वेळोवेळी दिसून येते. त्यात २१ कविता आहेत. स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळातील देशभक्तिपर गीते आहेत. प्रत्यक्ष सावरकरांनी प्रस्तावनेत- आपण स्वतःच नामवंत, सुप्रतिष्ठित प्रतिभासंपन्न साहित्यिक असल्याने माझ्या प्रस्तावनेची गरज नाही, असे गौरवोद्गार काढले होते. कथाकथनाचे कार्यक्रम आज सर्वत्र होतात, त्याचे खरे बीज रोवले राजा बढे यांनीच. सन १९६४ साली मुंबईत त्यांच्या पुढाकाराने प्रथमच कथाकथनचा कार्यक्रम झाला. या कार्यक्रमात पु.ल.देशपांडे, ग.दि.माडगूळकर यांनी प्रथमच त्यांच्या कथा कथन केल्या होत्या.

बढे यांची अनेक गाणी रेकॉर्ड झाली होती. अशावेळी जेव्हा प्रकाश पिक्चर्सच्या सावरकरांकडे राम-राज्य चित्रपटासाठी गाणी लिहिण्याची मागणी केली, तेव्हा त्यांनी ती चटकन मान्य केली होती. दिल्लीला असताना राजा बढे यांचा दि.७ एप्रिल १९७७ रोजी अकाली मृत्यू झाला. !! जयंती सप्ताहात राजा बढे यांना व त्यांच्या हरहुन्नरी कर्तबगारीस मानाचा मुजरा !!

दै.जनप्रभात
- संकलन व सुलेखन -
श्री कृ. गो. निकोडे गुरूजी.
(वैभवशाली भारतातील सत्पुरुषांच्या जीवनचरित्रांचे गाढे अभ्यासक)
रामनगर वॉर्ड नं.२०, गडचिरोली,
फक्त मोबा. ७७७५०४१०८६.

नाटक ..

पद यात्रा करताना
गरीब वस्तीत जातो
रेशीमबस्कर टाकून
जमिनीवरती बसतो

वाळल्याभाकरीमधे
पिझ्झा लपून खातो
साहेब कसे हे साधे
चर्चा करितो जो तो

कमाई तया घामाची
क्षण भरात उडवतो
नरडीवर पाय मारुन
भविष्यमस्त घडवतो

शेंबडे पोरगे कडेवर
समक्ष उचलूनि घेतो
गरिबा कडून नेहमी
काही ना काही घेतो

बिसलेरी शुध्द पाणी
तांब्यात घालून पितो
पळवूनलावेन गरिबी
आश्वासने फक्त देतो

झोपवून टाकेसकला
अंगाई गीतनीत गातो
निवडणूक वेळी येतो
अज्ञात वासात जातो

दै.जनप्रभात
- हेमंत मुसरीफ पुणे
९७३०३०६९९६
www.kavyakusum.com

झोपडीत ..

गरिबांच्या झोपडीत
निवांत बसा खुशाल
उघड्या गरीब पोरां
पांघरा मायेची शाल

दिखावा करणेसाठी
घासातलेघास खालं
चार थाळीचे रूपडे
द्या परत जेव्हा जालं

आजू बाजूला पहावे
ते बळीराजाचे हाल
कधीतरी दे निमंत्रण
दावा आपला महाल

बांधावरती उन्हामुळे
गाल होई लालेलाल
यांच्या मुळे उधळला
निवडणूकीत गुलाल

कोरडीविहीर पहावी
बिसलेरी जेंव्हाप्याल
कळावे मोल घामाचे
विश्रांती जेंव्हा घ्यालं

आठव इतिहास जरा
दिलीआश्वासने काल
पूर्तता नाही वचनांची
कधीही बदलेलं काल

दै.जनप्रभात
- हेमंत मुसरीफ पुणे
९७३०३०६९९६
www.kavyakusum.com

गावकूसाबाहेरील जीणं...!

भाग-२

१०४ वर्षानंतर सुद्धा मूकनायक वर्तमान पत्राचे महत्व कमी झालेलं नाही. सदैव व्यक्तीमध्ये आत्मविश्वास ,आत्मभान जागृत करण्यासाठी हे वर्तमानपत्र मानवाला प्रेरणादायी ठरले, त्यासाठी दुसऱ्या भागात आपण माहिती देत आहोत, वैदिक काळामध्ये ब्राह्मणांनी ज्ञानदानाचा कार्य करावे ,क्षत्रियांनी लढाया कराव्यात आणि वैशयांनी व्यापार उद्योग करावेत, तर शुद्रांनी आपले जीवन सर्वांच्या सेवा करण्यासाठी व्यतित करावे ,असे, वर्ण व्यवस्थेने सांगितले होते, तसेच उलटे बोलू नये, पडेल त्याचे काम करावे ,असा एक अलिखित नियमच होता. उच्चवर्णीयांनी खोटे वागले, बोलले कोणालाही त्रास दिला तरी ते त्रिलोकी श्रेष्ठ असे समाजमान्य होते, त्या काळात हुशार मानवानी निरक्षर मानवावर अत्याचार केले, आणि स्वतःचा फायदा करून घेतला ,जेवढी पिळवणूक करता येईल तेवढी केली, जिकडे तिकडे निरक्षर लोकांना कामाला जुंपले. शाळेमध्ये वर्गात बसू दिले गेले नाही, त्यावेळेस राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या संस्थानांमध्ये याच लोकांना समाविष्ट करून घेतले, जातीची कदर न करता गुणाची कदर करणारे एकमेव राजे राजर्षी शाहू महाराज होते त्या काळात त्यांनी सर्वधर्मसमभावाची शिकवण दिली, लहान -मोठा उच्च- नीच असा भेदभाव कधीच केला नाही म्हणून ते आज पूजनीय आहेत,१९०२ मध्ये त्यांनी आरक्षणाचा विषय काढला. ज्याचे हक्क त्याला मिळावे असे त्यांचे स्पष्ट मत होते, शिक्षणाने माणूस सुधारतो म्हणून त्यांनी सर्वधर्मीयांना शिक्षणाची सोय केली.माणसा माणसातील फरक त्यांना जाणवला, त्यामुळे त्यांनी आपल्या संस्थानामध्ये सर्व धर्मीय लोकांना समानता दिली. आपल्या सोबत सुद्धा बारा बलुतेदार व अठरा आलूतेदार लोकांना ठेवले. त्या काळातील परिस्थितीआणि बहुजन समाजाची आजची परिस्थिती यामध्ये भरपूर फरक आहे. ज्या काळामध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिबा फुले राजर्षी शाहू महाराज, राष्ट्रसंत गाडगे महाराज यांनी सर्वांना एकत्रित आणण्यासाठी महान कार्य केले, म्हणून ते समतेचे तीर्थकार झाले. बहुजन समाजातील अनेक मुले -मुली बुद्धिमान व हुशार आहेत परंतु त्यांना आर्थिक अडचणीमुळे शिक्षण शिकता येत नाही. म्हणून त्यांना शिष्यवृत्ती मिळवून देण्याचे काम यावरील महान व्यक्तीने केले. महात्मा ज्योतिबा फुले यांनी आपल्या घरातील पिण्याच्या पाण्याचा हौद सर्वांसाठी खुला केला ही त्या काळातील परिवर्तनवादी सामाजिक क्रांती होती . क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी महिलांना शिकविले हे सामाजिक परिवर्तन आपल्याला बरंच काही सांगून जाते .लोकांच्या अंत:करणात असणारे ह्या व्यक्तींनी मानवाला माणुसकीचे शिक्षण दिले. स्त्री -पुरुष समानता शिकवली .डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना शिष्यवृत्ती मिळाल्यामुळे त्यांनी आपल्या बौद्धिक क्षमतेवर अमेरिकेतील कोलंबिया विद्यापीठातून जगातले पहिले विद्वान महामानव म्हणून पुढे आले. त्यामुळे ७ नोव्हेंबर हा विद्यार्थी दिवस म्हणून जगभर आता साजरा केला जात आहे. आज पर्यंत त्यांनी केलेले शिक्षण आणि लिहिलेले ग्रंथ यांची बरोबरी कोणीही करू शकले नाही ,म्हणून शिकून मोठे व्हा. दोन रुपये तुमच्याकडे असतील तर एक रुपयाचे तुम्ही पुस्तक घ्या, असे सांगणारे आणि पुस्तकासाठी घर बांधणारे एकमेव व्यक्ती म्हणजे भारतरत्न डॉ,बाबासाहेब आंबेडकर आहेत. त्यांनी दलित समाजाला व प्रत्येक मानवाला आत्मविश्वास, आत्मभान ,स्वाभिमान, आत्मजागृती शिकविले, त्यामुळे आज मूकनायक फाडफाड बोलू शकतो ,सर्वांच्या बरोबर तो येऊ शकतो, संविधानामध्ये त्यांनी आम्ही भारताचे लोक असे सुरुवात करून दिली हे मला येथे सांगावे वाटते. त्यांनी कसल्याही प्रकारचा गर्व बाळगला नाही. हजारो जातींचा त्यांनी विचार करून राज्यघटना लिहिली. म्हणून तर आज अनेक व्यक्ती मोठमोठ्या पदावर विराजमान झाले आहेत. हे सगळे परिवर्तन मुकनायक वर्तमानपत्रातून त्यांनी त्या काळामध्ये सांगून समाजात जागृती केली हेच या लेखाच्या उद्देशाने सांगावयाचे आहे. आज १०४ वर्षे झाली. मूकनायक वर्तमानपत्र काढून परंतु किंचितही त्याचे महत्त्व कमी झाले नाही ,वर्तमानपत्र हा लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ असतात. चुकीच्या व्यक्तींना शिक्षा केली जाते. आणि सत्य असणाऱ्यांचा उदो उदो केला जातो म्हणून हे वर्तमानपत्र लाख मोलाचे होते. ब्रिटिशांची सत्ता भारतावर असताना अशी वर्तमानपत्रे रोखठोक पणे लिखित चालवणे हे फार निर्भीडपणाचे काम होते. वास्तविकता छापण्यासाठी हिंमत आणि कुशाग्र बौद्धिक क्षमता असावी लागते, त्यांनाच हे जमते. हे येरागबाळ्याचे काम नव्हते.असे मला म्

शतायुषी होण्यासाठी ! सदा तरूण राहण्यासाठी !

शरीरश्रमः दीर्घायू होण्यासाठी आणि तारुण्य टिकवण्यासाठी महत्त्वाचे तत्त्व जे शास्त्रज्ञांना आढळले ते म्हणजे, जे लोक अखेरपर्यंत शरीरश्रम करतात, तेच लोक जास्त जगतात. दीर्घायू असणाऱ्या या आदिवासी लोकांमधील अगदी एकशे दोन वर्षांचा म्हातारा सुध्दा, तास-दोन तास शेतीमध्ये काम करतो; याचाच अर्थ घाम गाळल्याशिवाय माणसाला आयुष्य वाढविता येत नाही वा तारुण्य टिकवता येत नाही. दुर्दैवाने आज आमचे सगळे प्रयत्न हे घाम कमीत कमी निघावा, अशी आरामदायी जीवनशैली असावी या दिशेने सुरू आहेत. आजच्या विज्ञान व तंत्रज्ञानाच्या युगामध्ये तसेही मानवी शरीरश्रम दिवसेंदिवस कमी होत चालले आहेत. त्याचे मानवी आरोग्यावर विपरीत परिणामपण होत आहेत. आजच्या जगाचे मुख्य आजार म्हणजे हार्ट अटॅक, ब्लडप्रेशर वाढलेले असणे, डायबिटीस, वजन प्रमाणापेक्षा जास्त असणे व लठ्ठपणा, हे सर्व मुख्यत्वे शरीरश्रमाच्या अभावामुळे निर्माण होणारे आजार आहेत. शरीरश्रम केल्याशिवाय माणसाला दीर्घायू होता येत नाही व तारुण्य टिकवून ठेवता येत नाही. त्यामुळे आपल्या जगण्यामध्ये शरीरश्रमाचे महत्त्व लक्षात घेऊन आपल्या दिनचर्येमध्ये श्रमाला स्थान देणे व नियमाने करणे हे महत्त्वाचे आहे.

आज शरीरश्रमापेक्षा बौध्दिक श्रमाला जास्त महत्त्व व किंमत आलेली आहे. शरीरश्रमाला हलके मानले जाते. या दोघांमधील फरक कमी करणे एकूणच मानवी आरोग्यासाठी गरजेचे आहे. खासकरून प्रत्येकाने जर उत्पादक श्रम आपल्या दिनचर्येचा भाग बनविला, तर सर्वांचेच आरोग्य सुधारेल; शिवाय आज समाजामध्ये दिसणारी वेगवेगळ्या प्रकारची विषमतासुध्दा कमी होईल.

बैठी जीवनशैली असणाऱ्यांसाठी तर शरीरश्रम हे अमृत व संजीवनी देणारे औषध आहे. त्यामुळे दिनचर्येमध्ये शरीरश्रमाचा समावेश करणे वा तशाप्रकारची जीवनशैली शक्य नसेल तर, जाणीवपूर्वक व्यायामासाठी वेळ राखून ठेवणे अतिशय महत्त्वाचे आहे. असे केले तरच आपल्याला वाढत्या वयासोबत होणारे आजार टाळता येणे शक्य होईल. एकूण तीन प्रकारचे व्यायाम करणे गरजेचे असते. हृदय व फुफ्फुसांची क्षमता वाढविणारे म्हणजेच दम-श्वासाचे व्यायाम अथवा कार्डिओ साधारणपणे ४५ मिनिटे, शरीराची लवचिकता टिकवून ठेवण्यासाठी/वाढविण्यासाठी योगासने व स्नायू बळकट करण्यासाठी वेट ट्रेनिंग / जीमचे व्यायाम / वजने उचलण्यासारखे व्यायाम साधारणपणे १०-१५ मिनिटे प्रत्येकासाठी आवश्यक आहेत. आठवड्यातून किमान ५ दिवस जरी हे करता आलेत तरी पुरेसे आहेत. एवढा वेळ तर प्रत्येकाला आपल्या दिनचर्येमध्ये व्यायामासाठी काढता आलाच पाहिजे. पारस्पारिकता व शेअर अँड केअर ॲटिट्यूडः या दीर्घायू समाजाच्या अभ्यासामधून जो मुद्दा लक्षात आला तो म्हणजे, त्या समाजामध्ये पारस्पारिकता आहे. परस्परांमध्ये घट्ट नातेसंबंध व एक-दुसऱ्याच्या सुख-दुःखामध्ये सहभागी होण्याची वृत्ती मोठ्या प्रमाणावर कायम आहे. त्या जमातीच्या दीर्घायू जगण्याचे आणि तारुण्य टिकवण्यामागचे हे पण रहस्य आहे. इंग्रजीमध्ये ज्याला शेअरींग अँड केअरींग म्हणतात, ते केल्याशिवाय माणसाला आपले आयुष्य वाढविता येत नाही वा तारुण्य टिकविता येत नाही असं आज आपल्याला विज्ञान सांगते.

दुर्दैवाने आज आम्ही ना तर सुख वाटून घेत, ना तर दुःख; प्रत्येकजण आपापल्या स्वार्थी आणि आत्मकेंद्रित वर्तुळात जगण्यामध्ये मश्गुल झालेला आहे. अशाप्रकारच्या आत्मकेंद्रित जगण्याने आपले आयुष्य कमी होते व म्हातारपण लवकर येऊ शकते हे लक्षात घ्यायला पाहिजे; आणि मग आमची इच्छा असो वा नसो, आम्हाला जर लवकर मरायचं नाही आणि लवकर म्हातारं पण व्हायचं नाही, तर स्वतःची व इतरांची सुख-दुःख वाटून घ्यायला शिकावं लागेल. हे केलं तरच आमचे आरोग्यसुध्दा टिकविता येऊ शकेल. आज वाढत्या औद्योगिकीकरणामुळे शहरीकरण वाढत चालले आहे. एकूणच जगणे सुपरफास्ट होत चाललेले आहे. जागतिकीकरण व मुक्त अर्थव्यवस्थेच्या रेट्यामुळे व वाढत्या चंगळवादापायी मानवी । जीवनातील सहजता संपत चालली आहे. मानसिक तणाव वाढत चालला आहे. मानवी नात्याची वीण पार उसवून चुकली आहे. त्यामुळे आयुष्याची लांबी वाढूनही, वाढीव आयुष्यात सुख भोगणे माणसाच्या नशीबामध्ये दिसत नाही. या सगळ्यांचा विचार करता माणसाला आपल्या आयुष्याची लांबी वाढविताना, आयुष्याची खोलीसुध्दा कशी वाढविता येईल याचा विचार करणे अगत्याचे झाले आहे. इतरांसाठी निरपेक्षपणे काहीतरी करणे हे परोपकारासाठी नाही, तर निव्वळ स्वार्थ म्हणून का होईना करणे, हे निरामय व दीर्घायू जगण्यासाठी व अगदी आजारांमधून बरे होण्यासाठीसुध्दा गरजेचे असते असे आज आपल्याला विज्ञान सांगते आहे. १९८२-८३ साली नागपूरच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातून, एमबीबीएस ही पदवी घेतल्यानंतर, उच्च शिक्षणासाठी सहज प्रवेश मिळत असतानासुध्दा जाणीवपूर्वक पुढे न शिकता, आपल्या ज्ञानाचा उपयोग पैसे कमविण्यासाठी न करता, सर्वसामान्य लोकांना व्हावा म्हणून मागील ४० वर्षांपासून कार्यरत डॉक्टर. औषधांचा फारसा वापर न करता निरामय व स्वस्थ जीवन कसे जगावे, आजारी पडल्यावर औषध घेण्यापेक्षा, आजारी पडूच नये यासाठी काय करावे, हार्ट अटॅक, बी.पी., डायबिटीस, हायपोथायरॉईड सारखे आजार कसे टाळावेत, झालेले असतील तर कुठल्याही औषधांशिवाय केवळ जीवनशैलीमध्ये बदल करून ते कसे रिव्हर्स करावेत, याबाबत समाजाला जागरूक करण्यासाठी संपूर्ण महाराष्ट्रात हजारो व्याख्याने व शिबिरांद्वारे जनजागृती. कोरोनापासून तर ऑनलाईन पध्दतीने देशातील अनेक राज्ये व जगातील १५-१६ देशांमधील हजारो रुग्णांना आजार व औषधांपासून मुक्त करण्यास मदत केलेली. 'शतायुषी होण्यासाठी हृदयसंवाद, यशस्वी व्हा व आम्ही बिघडलो तुम्ही बी घडाना ! या पुस्तकांचे लेखक, सेवांकुर या तरुणांच्या खुल्या मंचाचे संस्थापक, हजारो तरुणांचे प्रेरक- मार्गदर्शक व मेंटॉर, शतायुषी होण्यासाठी, यशस्वी व्हा, सुजाण पालकत्व, नात्यांचे व्यवस्थापन इ. अनेक जीवनोपयोगी विषयांचे उत्कृष्ट व्याख्याते व प्रशिक्षक, सुप्रसिध्द गांधीवादी विचारवंत.)



दै.जनप्रभात
लेखक
जगदिश वांदिले सर
तालुका प्रतिनिधी / अमोल झाडे समुद्रपुर

बालाघाट पॉलिटेक्निकचे घवघवीत यश

दै.जनप्रभात
सचिन नागनाथ बानाटे
अहमदपूर-

प्रतिनिधी:तालुक्यातील रुद्धा येथील बालाघाट पॉलिटेक्निक मध्ये महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाच्या वतीने घेण्यात आलेल्या परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून या परीक्षेमध्ये बालाघाटच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे यामध्ये इलेक्ट्रिकल विभागातून इलेक्ट्रिकल विभागातून प्रथम वर्ष प्रथम सय्यद महबूब नासीर ८५.१८%, दुतीय कोलपुसे मारोती बळीराम ८१.५३%, तृतीय कोरे मारोती सुनील ८०.९४% ,द्वितीय वर्षामधून प्रथम शेख निसाद सलीम ७७.८८%, दुतीय तेलंगे नम्रता दयानंद ६७.६३%, तृतीय सुभेदार सुजित मनोज ६०.२५% तृतीय वर्षामध्ये प्रथम ठुले शैलेश वैजनाथ ७७.९०%, दुतीय वाघमारे अविनाश ७६.००% तृतीय जाधव अंकिता सुरेश ६८.३०% गुण घेऊन उत्तीर्ण झाले आहेत. कम्प्युटर विभागामधून प्रथम वर्षात प्रथम कांबळे रोहिणी राजेश ८४.२४%, पाटील गोपाळ रामकिशन ८३.४१%, ऊपरवाड प्रगती संजय ८३.०६, द्वितीय वर्षामध्ये



प्रथम शिंदे सुमित बालाजी ८२.१३%, द्वितीय आवळे साक्षी ईश्वर ७८.६७, तृतीय पवार दिव्या व्यंकट ७६.८०%, तृतीय वर्षामध्ये ऊपरवाड तिरुपती ८८.८९%, द्वितीय चोले भाग्यश्री भानुदास ८८.३३, तृतीय करनाळे संकेत ८७.५६% गुण घेऊन उत्तीर्ण.मेकॅनिकल विभागातून प्रथम वर्षात भालेराव प्रेम दत्तात्रेय ८०.४७%, दुतीय चव्हाण कृष्णा सुनील ७९.७७%, देवकत्ते अनिकेत बळीराम ७८.००% गुण घेऊन उत्तीर्ण.सिव्हिल विभागातून प्रथम वर्षात प्रथम दराडे ऋतुजा शिवाजी ८२.१२%, दराडे सोनाली संजय ८०.२४%, वैद्य कृष्ण उद्धव ८०.००% द्वितीय वर्षामध्ये प्रथम राठोड अरुण बालाजी ७५.५६%, दुतीय सोळुंके मारुती श्रावण ७५.००%, तृतीय जाधव जयदीप रावसाहेब ७२.३३% तृतीय वर्षामध्ये प्रथम सूर्यवंशी शिवानी शिवाजी ८१.४०%, द्वितीय राठोड कांचन प्रसाद ७९.९०%, तृतीय गव्हाणे संगीता एकनाथ ७८.५०% वरील गुण घेऊन घवघवीत यश संपादन केले आहे या यशाबद्दल संस्था अध्यक्ष तथा भाजपा प्रदेश प्रवक्ते गणेश हाके यांनी सर्व उत्तीर्ण विद्यार्थाचे व सर्व प्राध्यापक, प्राध्यापक इतर कर्मचारी याचे अभिनंदन केले तसेच संस्था सचिव रेखाताई तरडे, कोषाध्यक्ष अमरदीप हाके, प्राचार्य स्वप्निल नागरगोजे तसेच सर्व प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारी यांनी सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

भारतीय स्टेट बँक विरुळ शाखे द्वारे बचतगटांना एक कोटी तीन लाख पन्नास हजार रुपयांचे कर्ज वाटप

दै.जनप्रभात , विरुळ आकाजी/प्रतिनिधी

विरुळ आकाजी येथील भारतीय स्टेट बँक शाखा विरुळ द्वारे ३१/०१/२०२४ ला विरुळ व परिसरातील बचत गटांना एक कोटीं तीन लाख पन्नास हजार रुपये चे कर्ज वाटप करण्यात आले आहे.यावेळी ग्रामपंचायत कार्यालयात बँकेचे व्यवस्थापक श्री बाळकृष्णा सोरते, ऋण अधिकारी श्री बंडू भाऊ देवकर यांच्या हस्ते वाटप करण्यात आले, बँक सखी व त्यांच्या सहयोगी यांचे बँकेच्या वतीने पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले यावेळी वीस बचत गटांना कर्ज वाटप करण्यात आले आहे. तसेच यावेळी बँक सखी सौ. जया ताई पांडे तथा त्यांच्या सहयोगी एरिया सी. आर. पी.उपस्थित होत्या तसेच यावेळी बँकेचे कर्मचारी सुनिलजी बॅनर्जी,अमोलजी काळे,निमजे सर,सूरज सहारे,वैभव देशमुख,इत्यादी या वेळी उपस्थित होते.



गुरुकुल पब्लिक स्कूल येथे हळदी कुंकू समारंभ उत्साहात संपन्न

दै.जनप्रभात गितांजली लव्हाळे
बिड/प्रतिनिधी

गुरुकुल पब्लिक स्कूल तेलगाव येथे दिनांक ३० जानेवारी वार मंगळवार रोजी हळदी कुंकू कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून कावेरी दादासाहेब धुमाळ(ग्रा.प.सरपंच,तेलगाव.) तसेच कार्यक्रमास विशेष उपस्थिती म्हणून..सो.डॉ.प्रिया अमोल लगड(बी.ए.एम.एस फॅमिली फिजिशीएशन..) उपस्थित होत्या.या हळदी कुंकू समारंभात पारंपारिक सणाला आधुनिकतेची जोड देत महिलांच्या आरोग्य बाबतीत समस्या यावर मार्गदर्शन करण्यात आले.त्याचबरोबर मोबाईलचे दुष्परिणाम, मुलांना सकस व पौष्टिक आहार वेळेवर दिला पाहिजे महिला स्वसंरक्षणाबाबत मार्गदर्शन करण्यात आले. खास करून स्त्रियांच्या आर्थिक



व सामाजिक बळात वृध्दी व्हावी, या करिता खास महिलासाठी उखाणे स्पर्धा व संगीत खुर्ची स्पर्धाचे आयोजन करण्यात आले होते...विजेते महिलांसाठी आकर्षक बक्षीसही ठेवण्यातत आले होते.प्रथम बक्षीस पैठणी व द्वितीय बक्षीस चांदीचा करंडा... तसेच मनोरंजनात्मक कार्यक्र घेण्यात आले.सर्व महिलांची ओटी भरून त्यांना वाण देण्यात आले... स्त्रियांनी फक्त चूल आणि मूल न पाहता स्वालंबी व्हावे यावर मार्गदर्शन करण्यात आले. या कार्यक्रमास जितेंद्र खैरनार सर, दत्ता लगड सर , आनंद धुमाळ सर, सदानंद अवाड सर , युवराज लगड सर यांचे अनमोल सहकार्य व मार्गदर्शन लाभले. तसेच गुरुकुल पब्लिक स्कूल तेलगाव, सर्व शिक्षकांनी परिश्रम घेतले व कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडला..

शिरुर मध्ये सामुदायिक विवाह सोहळा संपन्न

दै.जनप्रभात
शिरूर प्रतिनिधी -
शकील मनियार

अल बैतुल माल कमिटी शिरुर यांचा वतीने आयोजित सामुदायिक विवाह सोहळ्यात ६ सामुदायिक विवाह पार पडले . येथील शिरुर नगरपरिषद मंगल कार्यालयात हा विवाह सोहळा पार पडला . यावेळी आमदार ॲड अशोक पवार ,हज कमिटीचे शेख इम्राहिम उर्फ भाईजान , जिल्हा परिषदेचे माजी सभापती मंगलदास बांदल , मुस्लिम जमाती शिरुरचे अध्यक्ष इक्कबालभाई सौदागर, ज्येष्ठ नेते घनश्याम शेलार ,माजी नगराध्यक्ष नसिम खान ,माजी नगरसेवक विनोद भालेराव , मंगेश खांडरे , सचिन धाडीवाल संघपती मुन्ना चोरडिया , साजिदभाई रशिदभाई शेख ,ऋषीकेश शेलार , राष्ट्रवादी कॉंग्रेसचे जिल्हाचे नेते संतोष शितोळे ,भजपा अल्पसंख्याकचे जिल्हाध्यक्ष राजू शेख , मनसेचे सुशांत कुटे, मनसेचे तालुका संघटक अविनाश घोगरे ,विजय साखला , हाफीज बागवान ,



राहील शेख , श्रीनिवास परदेशी , किरण बनकर ,उमेश भोसले ,मोहम्मद हुसेन पटेल आदी यावेळी उपस्थित होते. आमदार ॲड . अशोक पवार म्हणाले की माजी नगराध्यक्ष शहिदखान पठाण यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु झालेल्या सामुदायिक विवाहाची चळवळ २१ वर्ष सुरु आहे .शहरात जातीय सलोख्या व राष्ट्रीय एकात्मता कायम राखण्याकामी माजी नगराध्यक्ष रसिकलाल धारीवाल व शहिदखान पठाण यांचे योगदान मोठे आहे . जाकिरखान पठाण यावेळी म्हणाले की माजी नगराध्यक्ष शहिदखान पठाण यांच्या मार्गदर्शना अल बैतुल माल कमिटी शिरुर हे मागील २० वर्षापासून शहारात सामूदायिक विवाह सोहळा होत आहे आता पर्यत १५० हून आधिक विवाह सामुदायिक विवाह सोहळात पार पडले आहेत . यावेळी प्रास्ताविक अल बैतुल माल कमिटीचे शिरुरचे फिरोजभाई बागवान यांनी केले . सूत्रसंचालन रावसाहेब चक्रे यांनी केले. हा सोहळा यशस्वी करण्यसाठी अल बैतुल माल कमिटीचे फिरोजभाई बागवान , शब्बीरभाई बागवान ,फारुखभाई बागवान , साबीरभाई शेख ,हाजी सिंकदर खान ,नसिम काझी ,रियाज खान ,अन्वर खान , तन्वीर शेख , आरिफभाई सय्यद , सिंकदर मण्यार ,मोनिब शेख ,फैय्याज सौदागर , बदृद्दीन काझी , जलिल पठाण ,हैदरभाई शेख , लालुभाई शेख , शाबान शाह आदीनी प्रयत्न केले .

३० जानेवारीला पारशिवनी मेथे सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षक महासभेचे जिअधिवेशन संपन्न

दै.जनप्रभात
काटोल/प्रशांत पवार

संपूर्ण महाराष्ट्रात सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षकांच्या प्रलंबित मागण्यांसाठी पोस्टकार्ड आंदोलन, संबंधित विभागांना तसेच मुख्यमंत्री ग्रामविकास मंत्री यांना निवेदन देणे, नागपूर जिल्ह्यातील तेराही तालुक्यात शासन आणि प्रशासनाच्या विरोधात धरणे व थाळीनाद आंदोलन, विधानसभेवर भव्य मोर्चा काढून आपल्या मागण्या पूर्ण करून घेणारी महाराष्ट्रातील एकमेव संघटना महाराष्ट्र राज्य उच्च श्रेणी मुख्याध्यापक व सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षक महासभा नागपूर तर्फे जिल्ह्यातील सर्व सेवानिवृत्तांचे दरवर्षी प्रमाणे यंदाही निरंतर २३ वे अधिवेशन आणि वयाची ७५ वर्ष पूर्ण करणाऱ्या सेवानिवृत्तांचा भव्य सत्कार कार्यक्रमाचे आयोजन तकिया मारोती देवस्थान पारशिवनी येथे करण्यात आले होते कार्यक्रमाचे उद्घाटन मा. आ सुधाकर आडबोले शिक्षक आमदार यांचे शुभ हस्ते व मा अशोकराव दगडे यांचे अध्यक्षते खाली पार पडले तसेच मा माजी मंत्री सुनील बाबू केदार . याचे शुभ हस्ते सर्व जिल्ह्या तील ७५ जे शिक्षकांचा व जि. प्रसिद्धी प्रमुख मा प्रा सुधीर बुटे व जि सो . मिडिया प्रभारी मा प्रा सुनिल मोहोड व सह प्रभारी सर्व श्री गोपाल कडू संजय वाळके प्रशांत पवार . रमेश गिरडकर विजय भुते या मा . सर्व पत्रकार मंडळीचा व दिलीप चांदूरकर नवनिर्वाचित सरपंच (से नि शिक्षक) यांचा विशेष सत्कार करण्यात आला. . या प्रसंगी अशोक थूल . मा मधूकर काठोळे . नुतन बांगरे व मिलमीलेजी हे विविध संघटना प्रतिनिधी व विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचे विवीध पदाधिकारी उपस्थित होते . पर्यटन मित्र चंद्रपाल चौकशे,व मा कुंदा राउत उपाध्यक्ष मा राजकुमार कुसूंबे शिक्षण सभापती व पारशिवनी पं.स. सभापती निंबोने मॅडम. उपसभापती व भोयते मॅडम डोणेकरजी . रश्मीताई बर्वे माजी जिल्हा परिषद अध्यक्ष व अर्चना भोयर जि.प सदस्य उपस्थित होते तर सदर अधिवेशनाला जिल्ह्यातील ६५० सेवानिवृत्तांनी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शविली . अनेक संघटनात्मक बाबी वर या अधिवेशनात चर्चा केल्या गेली व उपस्थित मान्यवराचे



मार्गदर्शन लाभले . प्रास्ताविक जि सरचिटणीस दिपक सावळकर . अहवालवाचन संजय भेंडे . मागणी निवेदन वाचन विनोद राउत व सुधाकर भूरके यांनी केले . संचलन रामठाकरे . सुनीता दामले व इंगोले मॅडम यांनी केले कार्यालय जयदेव टाले यांनी सांभाळले. साहेबराव ठाकरे, वि सरिता किमतकर शेषराव घुगल मुरलीधर कामडे,रामदास काकडे, मुरलीधर काळमेघ शांताराम जळते, नबी शेख, दिलीपसिंग बागडी वासुदेव भक्ते . झोड गुरुजी यादवराव बावनकुळे . प्रकाश वैरागडे विनोद राउत . दिपक सावळकर संजय भेंडे . आदीनी कार्यक्रम यशस्वीते करिता परिश्रम घेतले.

****

आरोग्य सांभाळून समाजसेवा करावी : दिलीप जाधव यांच्या सेवानिवृत्तीनिमित मान्यवरांचे मनोगत

दै.जनप्रभात
सातारा/जीवन मोहिते :

४० वर्षे सेवा करून केंद्रप्रमुख दिलीप जाधव सेवानिवृत्त झाले आहेत.त्यांनी पुढील इनिंग स्वत:चे आरोग्य सांभाळून समाजसेवा करावी.असे मनोगत मान्यवरांनी व्यक्त केले. झांजवड,ता.महाबळेश्वर येथील दिलीप जाधव यांच्या निवासस्थानी झालेल्या कार्यक्रमास जिल्हा बँकेचे माजी उपाध्यक्ष तथा विद्यमान संचालक राजेंद्र राजपुरे,गटविकासाधिकारी अरुण मरभळ,सहायक ग.वि. अधिकारी सुनील पार्टे, गटशिक्षणाधिकारी आनंद पळसे, विस्ताराधिकारी सुनील चिकने,सरपंच रमेश चोरमले, प्राथमिक शिक्षक समितीचे अध्यक्ष सुरेंद्र भिलारे, मुख्याध्यापिका सौ.वैशाली कणसे-कदम,संभाजी जाधव व विलास मोरे,बंधुत्व प्रतिष्ठानचे संस्थापक अनिल वीर, आजी-माजी मुख्याध्यापक, शिक्षक,शिरवली हायस्कुलचे मुख्याध्यापक,लिपिक, तालुक्यातील केंद्रप्रमुख, शिक्षक, शिक्षिका,दुधगाव पंचक्रोशीतील भीमराव यादव,सिद्धार्थ यादव, शशिकांत यादव,कुंभार, अधिकारी,पदाधिकारी,विविध



दिलीप जाधव यांचा सत्कार करताना राजेंद्र राजपुरे शेजारी अनिल वीर व मान्यवर.

संघटनांचे प्रतिनिधी व ग्रामस्थ मोठ्या संख्येनी उपस्थित होते. मिष्टान्न भोजनांनी सांगता करण्यात आली.

अमृतमहोत्सवी वर्षात ७५ व्याख्याने संविधानावर देणार : डॉ.शिवाजीराव पाटील

दै.जनप्रभात
सातारा/जीवन मोहिते : राष्ट्रपिता महात्मा गांधी बहु सांस्कृतिकता जपणारे वैश्विक नेते होते. त्याचे स्वप्न साकारण्यासाठी भारतातील बहु संस्कृतिकता व विविधता टिकवणे गरजेचे आहे.अमृतमहोत्सवी वर्षात ७५ व्याख्याने आपण संविधानावर देणार असल्याचे स्पष्ट निर्देश रयत शिक्षण संस्थेच्या छत्रपती शिवाजी कॉलेज राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. शिवाजीराव पाटील यांनी व्यक्त केले.महात्मा गांधी यांच्या स्मृतिदिनी प्रमोद मनोहर कोपर्डे प्रतिष्ठानच्या वतीने डॉ. शिवाजीराव पाटील यांच्या हस्ते यावर्षीचा संस्कृती क्षेत्राचा सातारा जीवनगौरव पुरस्काराने पुणे येथील ज्येष्ठ नाटककार दिग्दर्शक, कादंबरीकार मकरंद साठे यांना व कलाक्षेत्राचा कृष्णामाई जीवनगौरव पुरस्काराने नाशिक येथील ज्येष्ठ चित्रकार,कवी, लेखक धनंजय गोवर्धने यांना प्रत्येकी रु.३५ हजार रुपयांचा धनादेश ,स्मृतीचिन्ह, शाल व सातारा कंदी पेढे देऊन सन्मानित करण्यात आले. या प्रसंगी 'भारतीय राज्यघटना व बहुसांस्कृतिकता' या विषयावर डॉ.शिवाजीराव पाटील मार्गदर्शन करीत होते.अध्यक्षस्थानी प्रतिष्ठानचे अध्यक्ष जेष्ठ कवी प्रमोद कोपर्डे होते. विचार मंचावर प्रतिष्ठानचे विश्वस्त ज्योत्स्ना पाटील - शिंदे व कवी वसंत शिंदे होते.या प्रसंगी प्रमोद कोपर्डे यांच्या 'निरंतर अधांतर' या नवीन कवितासंग्रहाचे प्रकाशन प्रमुख पाहुणे व जीवनगौरव पुरस्काराचे मानकरी यांच्या हस्ते करण्यात आले.डॉ.शिवाजीराव पाटील म्हणाले, ''भारतीय संविधान हा मानवता व समतेचा पुरस्कार करणारा राष्ट्रीय ग्रंथ आहे. बहुसांस्कृतिकता हा तिचा मुलाधार व आविष्कार आहे. तिच्यावर घाला घालण्याचे काम सध्या होतआहे.'' संविधानाच्या अमृत महोत्सव काळात या अनुषंगाने प्रबोधन करण्यासाठी आपण ७५ व्याख्याने देण्याचा संकल्प केला असल्याचाही त्यांनी पुनरुच्चार केला.जीवन गौरव पुरस्कार स्वीकारल्यानंतर सत्काराला उत्तर देताना मकरंद साठे म्हणाले, ''संस्कृतीकडे संकुचितपणे पाहिले जाते. खरे तर ती अन्नपाण्यापेक्षाही जास्त महत्त्वाची असते. बहुसांस्कृतिकता धोक्यात आणणारीअत्यंत भयावह अशी परिस्थिती देशभर आणि जगभर निर्माण झालेली आहे. साहित्य व कला क्रांती घडवण्यास मदत करते. कलावंतांनी देशातील बहुसांस्कृतिकता लोकशाही वाचवण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे.''धनंजय गोवर्धने म्हणाले , ''साहित्यिक कलावंतांनी सत्याचा शोध घ्यावा.हेच त्यांचे मूलभूत कार्य असते.'' कोपर्डे पुरस्कार बळ व मनाला उभारी देणारे असल्याची भावना यावेळी दोन्ही पुरस्कार विजेत्यांनी व्यक्त केली. अध्यक्षीय भाषणात प्रमोद कोपर्डे म्हणाले, ''साहित्य हे संस्कृतीचे वाहक आहे. लेखक कलावंतांनी संस्कृतीचा प्रवाह गतिमान करण्याचे काम केले पाहिजे. महात्मा गांधीजींच्या सत्य, अहिंसा या तत्त्वाशिवाय समाजाला भवितव्य नाही.'' या समारंभास विविध क्षेत्रातील मान्यवर,पत्रकर,श्रोते व संविधानप्रेमी उपस्थित होते.चित्रा भिसे यांनी सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन केले.

सुराज्य निर्माण सेना पक्षाच्या लातूर जिल्हाध्यक्षपदी

भागवत भुजबळ तर जालना जिल्हा अध्यक्ष पदी संतोष बिवे यांची नियुक्ती

दै.जनप्रभात उपसंपादक ---
राठोड रमेश पंडित

लातूरः - दि. सुराज्य निर्माण सेना पक्षाच्या जिल्हाध्यक्षपदी भागवत भुजबळ यांची नियुक्ती करण्यात आली.बार्शी रोड येतील गणेश कॉम्प्लेक्स येथे बैठक संपन्न झाली.यावेळी पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शिवानंद मठपती हे अध्यक्षस्थानी तर प्रमुख पाहुणे म्हणून माजी सहशिक्षक वीरभद्र मठपती होते. यावेळी जिल्हाध्यक्ष म्हणून भागवत भुजबळ व जालना जिल्हा अध्यक्ष पदी संतोष बिवे यांची निवड करण्यात आली. उपाध्यक्ष बालाजी नागीने, शहराध्यक्ष बालाजी गिरी यांची नियुक्ती करून नियुक्तीपत्र देण्यात आले.मार्गदर्शन पर बोलताना प्रदेशाध्यक्ष शिवानंद मठपती म्हणाले सध्याच्या प्रस्थापित पक्षाला जनतेचे काहीच देणे घेणे नाही, ''खुर्चीसाठीच प्रयत्न अहोरात्र'' अशी अवस्था झाली आहे. बोलताना ते पुढे म्हणाले महागाईने कळस गाटला आहे, बेरोजगारीने उच्चांक गाटला आहे अशा परिस्थितीत जनसामान्याचे व तळागाळातील सामान्य जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी सुराज्य निर्माण सेना कटिबद्ध आहे. वीरभद्र मठपती म्हणाले सामान्य जनतेला एक पर्याय हवा आहे आणि तो पर्याय सुराज्य निर्माण सेना पक्ष आहे.जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती झाल्याबद्दल भागवत भुजबळ म्हणाले सुराज्य निर्माण सेना या पक्षात मी प्रवेश केला आहे आणि या पक्षाचे कार्य तन मन आणि धन लावून सामान्य



जनतेला न्याय देण्यासाठी सज्ज आहे.यावेळी बिराजदार लक्ष्मण, दगडू अंडरगुळे, सिद्धेश्वर बिराजदार, संजय भुजबळ, गजानन लखादिवे, स्वप्निल हंडरगुळे, वामनराव ईनकर यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे प्रस्ताविक पत्रकार लहू शिंदे यांनी केले तर शेवटी आभार संजय भुजबळ यांनी मानले यावेळी अनेक कार्यकर्ते व नागरिक उपस्थितीत होते.

शेतकरी उत्पादक संस्था स्थापण्यास व समूह संकलन केंद्र उभारणीस मान्यता

डॉ.पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन अंतर्गत राबवावयाच्या बाबींमध्ये बदल

दै.जनप्रभात मुंबई.-

डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन अंतर्गत राबवावयाच्या बाबींमध्ये बदल करण्यात आला असून १० गटांच्या समुहाची शेतकरी उत्पादक कंपनी (त्रझज) स्थापन करावयाच्या तरतुदीसोबतच १० गटांच्या समुहाची शेतकरी उत्पादक संस्था (त्रझज) स्थापन करण्यास व विपणन सुविधेकरिता समूह संकलन केंद्राची उभारणी करण्यास मान्यता देण्यात आली आहे. याबाबतचा शासन निर्णय कृषी विभागामार्फत निर्गमित करण्यात आला आहे. डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन अंतर्गत राबवावयाच्या बाबींमध्ये पुढीलप्रमाणे सुधारित तरतूद करण्यात आल्या आहेत.नैसर्गिक सेंद्रीय शेती क्षेत्र विस्तार - राज्यातील नैसर्गिक व सेंद्रिय शेतीस चालना देण्यासाठी ही योजना प्रस्तावित करण्यात येत आहे. योजनेअंतर्गत ५० हे. क्षेत्राचा एक गट याप्रमाणे १० गटांचा एक समुह व त्या समुहाची शेतकरी उत्पादक कंपनी किंवा सहकार कायद्याअंतर्गत शेतकरी उत्पादक संस्था (त्रझज) स्थापन करावयाची आहे.गटस्तरावर जैविक निविष्ठा संसाधन केंद्र - गट स्तरावरील एका शेतकऱ्याच्या शेतात नैसर्गिक व सेंद्रिय निविष्ठा निर्मिती करण्यासाठी एक जैविक निविष्ठा संसाधन केंद्र (इळे-खपर्णी ठर्शीिअॅलश उशपींअॅश) स्थापित करण्यासाठी खर्चाच्या ७५ टक्के किंवा रु. १.०० लाख यापैकी जे कमी असेल ते अर्थ सहाय्य देय असेल व उर्वरित शेतकरी/ गटाचा हिस्सा असेल. याकरिता २ टक्के आकस्मिक खर्चासह एकूण रु १३४.८४ कोटी इतक्या आर्थिक तरतुदीस मान्यता देण्यात येत आहे.शेतकरी उत्पादक कंपनीस पणन सुविधेसाठी अर्थसहाय्य - शेतकरी उत्पादक कंपनीस्तरावर पणन सुविधेसाठी एक विक्री केंद्र स्थापन करावयाचे असून त्याकरिता वाहन खरेदी किंवा विक्री केंद्र बांधणीसाठी खर्चाच्या ७५ टक्के किंवा रु ४.५० लाख यापैकी जे कमी असेल तेवढे अर्थसहाय्य देय असेल. तसेच प्रसिद्धी, विक्री मेळावे इत्यादी करिता ५० हजार रुपये व समूह संकलन केंद्र उभारण्याकरिता रु.१०.०० लाख अर्थसहाय्य देय असेल. त्याकरिता २ टक्के आकस्मिक खर्चासह एकूण रु. २०४.५७ कोटी इतक्या आर्थिक तरतुदीस मान्यता देण्यात येत आहे. अशा प्रकारे या योजनेत सुधारित तरतुदी करण्यात आल्या आहेत. राज्यात नैसर्गिक/सेंद्रीय शेतीला प्रोत्साहन देण्यासाठी डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशनला सन २०२२-२३ ते सन २०२७-२८ या कालावधीकरीता मुदतवाढ देण्यात आली आहे.

अमृत' च्या विविध योजनांचा लाभ घ्या - उदय लोकापल्ली

वर्धा येथे लाभार्थी संवाद व मार्गदर्शन

दै.जनप्रभात
वर्धा, दि. ३१ (जिमाका) :

खुल्या प्रवर्गातील परंतु ज्या अर्थिकदृष्टया दुर्बल घटकांना शासनाच्या इतर कोणत्याही आयोग, महामंडळ, संस्था यांच्याकडून लाभ मिळत नाही, अशा अर्थिकदृष्टया दुर्बल घटकांच्या आर्थिक उन्नतीसाठी महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी, पुणे (अमृत) या संस्थेची राज्य सरकारने स्थापना केली आहे. या संस्थेमार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचा लाभ जिल्ह्यातील पात्र लाभार्थ्यांनी घ्यावा, असे आवाहन 'अमृत'चे विशेष कार्यकारी अधिकारी तथा विभागीय पालक अधिकारी उदय लोकापल्ली यांनी केले. अमृतच्या विविध योजनांचा प्रसार, प्रचार करणे व लाभार्थी संवाद व मार्गदर्शन करण्यासाठी बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी बोलत होते. विभागीय समन्वयक देवदत्त पंडीत, नागपूर ग्रामीण समन्वयक दिनेश डोबले व वर्धा प्रतिनिधी हृषीकेश खराटे तसेच वर्धा शहरातील विजय कुलकर्णी, गौरीशंकर डिबरेवाल, प्रफुल्ल शर्मा, माजी नगरसेवक, आकाश सोनावणे, शैलेश सिन्हल आदींसह विविध क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थिती दर्शवित 'अमृत'च्या योजनांच्या प्रसारासाठी आपले योगदान देण्याची ग्वाही दिली. तसेच वर्धा व परिसरामध्ये 'अमृत'च्या लाभार्थ्यांसाठी मेळाव्यांचे आयोजन करणेबाबत या बैठकीत आश्वासित केले.महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या राज्यसेवा पूर्व आणि मुख्य परीक्षेसाठी निवड झालेल्या उमेवारांना अर्थसहाय्य देणे, संघ लोकसेवा आयोगाच्या नागरी सेवा पूर्व आणि मुख्य परीक्षेसाठी निवड केलेल्या उमेदवारांना अर्थसहाय्य देणे,



आर्थिक विकासाकरिता प्रोत्साहन व प्रशिक्षण कार्यक्रम राबवून स्वावलंबी बनविणे, याचबरोबर कृषी उत्पन्न आधारित लघुउद्योग सुरू करण्यासाठी प्रशिक्षण देणे, कौशल्य विकास प्रशिक्षण व नोकरीची संधी उपलब्ध करून देण्यासाठी समन्वय साधने इत्यादी योजना 'अमृत' मार्फत रबिवल्या जात आहेत, असे श्री. लोकापल्ली यांनी यावेळी सांगितले.'अमृत'चे संकेतस्थळ www.mahaamA°ut.oA°g.in यावर सर्व माहिती व विविध योजनांचे अर्ज दिलेले आहेत. अमृतच्या योजना विद्यार्थ्यांपर्यत पोहोचविण्यासाठी न्यू आर्टस, कॉमर्स अॅण्ड सायन्स कॉलेज, वर्धाचे प्राचार्य आशीष ससानकर यांनीही सहकार्य करण्याचे आश्वासन यावेळी दिले.

भूमिपूजन माजी कॅबिनेट मंत्री सुनीलबाबू केदार

यांचे शुभहस्ते रामटेक - १ कोटी १ लक्ष रुपयाचे कामाचे भूमिपूजन.

माजी कॅबिनेट मंत्री सुनीलबाबू केदार यांचे शुभहस्ते रामटेक

दै.जनप्रभात
जयश्री मेंघरे रामटेक -आजनी येथे समग्र शिक्षा अभियान योजनेअंतर्गत नागपूर जिल्हातील प्रथम आदर्श शाळा बांधकाम (१ कोटी १ लक्ष) रुपयाचे कामाचे भूमिपूजन राज्याचे माजी कॅबिनेट मंत्री सुनीलबाबू केदार साहेब यांचे शुभहस्ते करण्यात आले कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून सौ. रश्मिताई बर्वे (माजी अध्यक्षा जी.प. नागपुर/ सदस्य जी.प. नागपुर), कु. कुंदाताई राऊत (उपाध्यक्षा जी.प. नागपुर), श्री. राजकुमारजी कुसुंबे (शिक्षण सभापती जी.प. नागपुर), श्री.चंद्रपालजी चौकसे , मा.श्री. दुधरामजी सव्वालाखे (जिल्हा परिषद सदस्य नगरधन भंडारबोडी सर्कल) श्री. नरेद्रजी बंधाटे (सभापती पंचायत समिती रामटेक) उपस्थित होते. यावेळी प्रमुख्याने श्री. सुनिलजी रावत, सौ. अस्विता बिरणवार (सदस्या पं.स. रामटेक), श्री. भूषण (शंकर) होलगिरे (माजी (सदस्य पं.स. रामटेक), डॉ. रामसिंगजी सहारे, श्री.मनोजजी लिल्हारे (सरपंच आजनी), श्री. बिरजलाल उपराडे (उपसरपंच आजनी), कु. वर्षा बांधबूचे, श्री. प्रशांत कामडी (माजी सरपंच नगरधन), श्री. महेश कलारे (माजी सरपंच चाचेर), श्री. मनोज नौकरकर, श्री. ज्ञानेश्वर हटवार (उपसरपंच नंदापुरी), श्री. रमेशजी बिरणवार, श्री.माणिकजी मोहारे , श्री. सेवकरामजी बावणे, श्री. जगदीश उपराडे, ग्रा.पं. आजनीचे सन्मानीय सर्व सदस्यगन, व समस्त गावकरी मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



याशिवाय अयोध्या राम मंदिर

एंड आकाश सपेलकर अध्यक्ष ऑल इंडिया रिपोर्टर असोसिएशन

दै.जनप्रभात : पंतप्रधान मोदींनी अयोध्येतील श्रीरामाचे तुलनात्मक स्पष्टीकरण दिले की, राम हा अग्नी नसून ऊर्जा आहे. राम हा वाद नाही, तो उपाय आहे. राम उपस्थित नसून शाश्वत आहे. रामाचे जीवन-अभिषेक हे कालचक्राचे नवीन उद्गम आहे. अशा अनेक तुलनेनंतर पंतप्रधानांनीही प्रश्न विचारला की राम मंदिर बांधले आहे, पुढे काय? रामापासून राष्ट्रात चैतन्य पसरवायचे आहे, असे उत्तरही त्यांनी दिले. 'चेतनेचा विस्तार' हे अतिशय व्यापक आणि उपदेशात्मक विधान आहे. राम मंदिराला 'जातीयवादी' म्हणणारे भविष्यातील प्रचारात मथुरा आणि काशीचाच विचार करतील. श्रीकृष्णजन्मभूमी आणि ज्ञानवापी यांचे वाद न्यायालयात आहेत. ते न्यायालयासमोर प्रलंबित राहू द्यावेत. अयोध्या वादावर सर्वोच्च न्यायालयाच्या पाच न्यायमूर्तींच्या खंडपीठाने दिलेला ऐतिहासिक निर्णय, ज्यामुळे राम मंदिरात देवतेला अभिषेक करता आला, तो आता कनिष्ठ न्यायालयांसाठी आधारबिंदू ठरू शकतो. १९९१ मध्ये संसदेने प्राचीन धार्मिक स्थळांच्या संदर्भात प्रार्थनास्थळांच्या यथास्थितीबाबत केलेल्या कायद्याचा अर्थ सर्वोच्च न्यायालयाने सध्या रद्द केला आहे. मात्र, पंतप्रधानांनी भविष्यातील मोहिमांसाठी केवळ मथुरा आणि काशीचाच निर्णय घेतला नाही, तर त्यांना विकास, पायाभूत सुविधा, लोककल्याण आणि तंत्रज्ञान या क्षेत्रात राम मंदिरासारखी उद्दिष्टे घेऊन पुढे जायचे आहे. केवळ राम मंदिराची निवडणूक रणनीती पुरेशी नाही, हे त्यांच्या लक्षात आले, त्यामुळे अयोध्येहून दिल्लीला परतल्यानंतर त्यांनी एक कोटी घरांच्या छतावर सौरऊर्जा यंत्रणा बसवण्याची योजना जाहीर केली. अयोध्येचा कायापालट झाला आहे. उर्वरित योजनांचे काम सुरू आहे.



अयोध्येत आंतरराष्ट्रीय विमानतळ आणि जंक्शनच्या रूपात एक नवीन, विकसित रेल्वे स्थानक, रस्ते आणि महामार्गांचे रुंदीकरण आणि ५० हून अधिक जागतिक दर्जाच्या हॉटेल्सची बांधकाम प्रक्रिया हे नवीन अयोध्येचे नवे चेहरे आहेत. सुमारे ५०,००० कोटी रुपयांचे प्रकल्प तयार होत आहेत. लवकरच अयोध्येत १ लाख कोटी रुपयांचा व्यवसाय होईल, असा औद्योगिक संघटनांचा अंदाज आहे. पंतप्रधानांच्या ताज्या भाषणांवरून हेही स्पष्ट झाले आहे की, यावेळी सार्वत्रिक निवडणुकीत त्यांचे लक्ष दक्षिण भारतावरही असेल. त्यांना तेथे अधिक चांगले प्रदर्शन करायचे आहे, म्हणून राम मंदिराच्या अभिषेकासाठी ११ दिवसांच्या कठीण विधी दरम्यान, पंतप्रधानांनी आंध्र प्रदेश, तामिळनाडू आणि केरळमधील राम मंदिरांना भेट दिली.त्यांच्या रीतिरिवाजानुसार पूजा केली आणि त्यांच्या भाषेतील 'रामायण'चे पठणही ऐकले. तत्पूर्वी, पंतप्रधानांनी दक्षिण भारतातील राज्यांसाठी हजारो कोटी रुपयांच्या प्रकल्पांची पायाभरणी आणि उद्घाटनही केले. दक्षिण भारतातील या राज्यांमध्ये भाजपचे निवडणूक यश 'शून्य' आहे. केरळ, तामिळनाडू आणि आंध्रमधून भाजपचा एकही खासदार संसदेत निवडून आलेला नाही. राम मंदिरावर आधारित पंतप्रधानांची रणनीती भाजपला निवडणूक लाभांश देऊ शकेल का आणि कितपत हा प्रश्न आहे? अर्थातच राममंदिर 'मोदींची हमी' मान्य करते. घटनापीठाने पाया रचला असला, तरी प्रशासकीय आणि इतर व्यवस्था केल्या नसत्या, तर अयोध्येतील उत्सव इतका मोठा आणि वैविध्यपूर्ण झाला नसता. अयोध्या सोहळा भाजप-संघाने प्रायोजित केला होता. आता इथून 'सांस्कृतिक राष्ट्रवाद' हा नवा प्रकार सुरू होईल.

कुस्तीपटू कल्याणी मोहारेची अष्टपैलू कामगिरी

कु.कल्याणी मोहारे हिने आंतरविद्यापीठस्तरीय कुस्ती स्पर्धेत तसेच विदर्भ केसरी स्पर्धेत चमकदार कामगिरी बजावली.






दै.जनप्रभात
जयश्री मेंघरे/ रामटेक :

श्री.नरेंद्र तिडके कला वाणिज्य महाविद्यालय रामटेकची विद्यार्थिनी कु.कल्याणी मोहारे हिने आंतरविद्यापीठस्तरीय कुस्ती स्पर्धेत तसेच विदर्भ केसरी स्पर्धेत चमकदार कामगिरी बजावली. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या विद्यापीठस्तरीय कुस्ती स्पर्धेत कु.कल्याणी मोहारे हिने सुवर्णपदक पटकावले होते. तिची निवड चंदीगड मोहाली येथे आयोजित आंतरविद्यापीठस्तरीय कुस्ती स्पर्धेसाठी झाली होती.या स्पर्धेत नागपूर विद्यापीठाचे नेतृत्व करताना तिने रौप्यपदक पटकावले.महिला कुस्ती गटात कु.कल्याणी हिने मिळवलेले हे एकमेव पदक आहे हे विशेष.नुकत्याच नागपूर येथे झालेल्या विदर्भ केसरी कुस्ती स्पर्धेत कल्याणी मोहारे हिने अजिंक्यपद पटकावले.केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते तिला चांदीची गदा देऊन सन्मानित करण्यात आले.विद्यापीठाचे व रामटेक परिसराचे नावलौकिक करणाऱ्या कल्याणीचे श्री.नरेंद्र तिडके महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.मनोज तेलरांधे, क्रीडा प्रशिक्षक प्रा.किशोर धांडे,डॉ. दिलीप जेना,प्रा.नरेश आंबिलकर,डॉ. बाळासाहेब लाड,डॉ. श्रीकांत भोवते यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

****

महिला बचत गट कक्ष जिल्हा अध्यक्षपदी निवड



दै.जनप्रभात
प्रतिनिधी :- लटेश्वरी भाजप बचत गट सेल जिल्हा समन्वयक कामठी झाल्या. कामठी नंदू कोल्हे, भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, जिल्हाध्यक्ष सुधाकर कोहळे यांच्या सूचनेवरून आगामी काळात महिलांशी संबंधित कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आणि त्याचवेळी संघटना मजबूत करण्यासाठी लटेश्वरी ब्रह्माजी काळे महिला बचत गट कक्ष देण्यात आला.जिल्हा अध्यक्षपदाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. सध्या त्यांनी भाजप महिला जिल्हा उपाध्यक्षपद भूषवून संघटनेत सक्रिय भूमिका बजावली असून त्या भिलगाव ग्रामपंचायत सदस्याही आहेत. पक्षाने दिलेल्या सूचनांचे पालन करून पक्ष व संघटना मजबूत करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणार असल्याचे लटेश्वरी काळे यांनी सांगितले. अधिकाधिक महिलांना पक्षात सामावून घेण्याचे काम केले जाईल. या नियुक्तीबद्दल भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, जिल्हाध्यक्ष सुधाकर कोहळे, विदर्भ प्रदेश संघटनमंत्री उपेंद्र कोठेकर, आमदार टेकचंद सावरकर यांनी आभार व्यक्त केले आहेत.

वैभव दुधकोहळे व शुभम सोमकुवर यांचा गौरव

दैं.जनप्रभात
विरुळ आकाजी /प्रतिनिधी
२७ जानेवारी २०२४ रोजी चेन्नई येथे पार पडलेल्या संस्कृत भारती(भारत,अमेरिका,कॅनडा) आयोजित आंतरराष्ट्रीय संस्कृत लघुचित्रपट महोत्सवामध्ये आपल्या वर्ध्यातील वैभव विठ्ठलराव दुधकोहळे आणि शुभम सोमकुवर (रा. धर्ती) यांना काल: या लघुचित्रपटासाठी अनुक्रमे सर्वोत्कृष्ट संकलन आणि सर्वोत्कृष्ट छायांकन या दोन पारितोषिकांनी गौरविण्यात आले.या लघुचित्रपटाची निर्मिती



आशिष दत्तात्रय कुलधरण व लेखन – दिग्दर्शन वैभव दुधकोहळे याने केले आहे.या कार्यक्रमाला सूचनाप्रसारण मंत्री डॉ.एल.मुरुगन तसेच प्रसिद्ध कश्मीर फाइल्स या चित्रपटाचे लेखक दिग्दर्शक श्री.विवेक अग्निहोत्री उपस्थित होते. यांच्या बरोबर रंगलेल्या चर्चेमधून सर्व उपस्थित विजेत्यांना विशेष मार्गदर्शन मिळाले.

माजी नगरसेवक कपिल गायधने भा ज यु मो महाराष्ट्र प्रदेश सचिवपदी नंदू कोल्हे

दैं.जनप्रभात / कामठी
उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली भाजयुमो महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष राहुल लोणीकर यांनी माजी नगरसेवक कपिल गायधने यांची भारतीय जनता युवा मोर्चा महाराष्ट्र प्रदेश सचिव पदावर नियुक्ती केली. कपिल गायधने यांनी पक्षाच्या पदाधिकाऱ्याचे आभार मानले. पक्षाला मजबूत करण्यासह पक्षाची ध्येय धोरणे, विचार, पक्षाचे काम तळागळातील व्यक्तीपर्यंत पोहोचविण्यासाठी कटिबद्ध राहणार असल्याचे सांगितले.प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेश महामंत्री विक्रांत दादा पाटील.मोर्चा राहुल लोणीकर, जिल्हा अध्यक्ष सुधाकर कोहळे, प्रदेश महामंत्री शिवानीताई दानी, बादल कुलकर्णी, अनुप मोरे, माजी जि. प. सदस्य अनिल निधान, अजय अग्रवाल, आमदार टेकचंद सावरकर, मनिष



वाजपेयी, आशिष फुटाणे, रोहित पारवे, संकेत बावनकुळे, पंकज वर्मा, राजेश खंडेलवाल, भाजप कामठी शहर अध्यक्ष चंद्रशेखर तुप्पट यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

गांधी सिटी पब्लिक स्कूल पुलगाव येथे निरोप समारंभ

दैं.जनप्रभात/ वरूळ आकाजी
जय महाकाली शिक्षण संस्था द्वारा संचालित गांधी सिटी पब्लिक स्कूल पुलगाव येथे वर्ग दहावीच्या विद्यार्थ्यांचा आशीर्वाद समारोह आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाचे मुख्य अतिथी श्री पंडित शंकरप्रसादजी अग्निहोत्री अध्यक्ष जय महाकाली शिक्षण संस्था व श्री अभिजीत रघुवंशी, गांधी सिटी पब्लिक स्कूल, वर्धा च्या रूपात उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलन व स्वागतगीताने झाली. कार्यक्रमाचे शाळेच मुख्याध्यापक श्री धनंजय शिंगणजुडे यांनी केले.शाळेतील वर्ग दहावीच्या विद्यार्थ्यांनी आपले मनोगत आणि शाळेतील आपल्या प्रवासाबद्दल आठवणींना उजाळा दिला. सोबतच वर्ग दहावीच्या काही पालकांनी सुद्धा आपल्या पाल्यांच्या उज्वल भविष्याकरिता शाळा प्रमुख आधारस्तंभ आहे हे आपल्या भाषणात सांगितले. वर्ग दहावीच्या विद्यार्थ्यांना भेटवस्तू देण्यात आल्या. पंडित श्री.शंकरप्रसादजी अग्निहोत्री यांनी विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्याकरिता शुभेच्छा दिल्या. सोबतच विद्यार्थी जीवनात संस्कार व मूल्य जपण्याकरीता सांगितले. सर्व विद्यार्थ्यांना आशीर्वाद देताना शिक्षा, दीक्षा, प्रज्ञा, द्यान व प्रतिभा यांचे महत्त्व सांगितले. आई-वडिलांचा मान सन्मान हा सर्वतोपरी असतो आणि विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनात उज्वल भविष्याकरिता ऊर्जावान राहणे गरजेचे आहे असे त्यांनी विद्यार्थ्यांना पटवून दिले. त्यानंतर विद्यार्थ्यांना शपथ देण्यात आली आणि राष्ट्रगीताने कार्यक्रमात समारोप करण्यात आला कार्यक्रमाचे संचालन वर्ग दहावीची विद्यार्थी श्रेया भोयर व वेदांत तिवरे व आभार प्रदर्शन विराज गडेकर यांनी केले.



महाराष्ट्र एसटी कामगार संघटना हिंगणघाट आगाराची कार्यकारिणी जाहीर

दैं.जनप्रभात
अमोल झाडे-
समुद्रपुर/प्रतिनिधी
दि. ३१ जानेवारी २४ रोजी महाराष्ट्र एसटी कामगार संघटनेच्या सन २०२४ च्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे आयोजन संकट मोचन हनुमान मंदिर येथे करण्यात आले होते वार्षिक सर्वसाधारण सभा विभागाचे विभागीय अध्यक्ष श्री सचिनजी काकडे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली प्रमुख पाहुणे म्हणून विभागाचे विभागीय सचिव श्री शम्मी पठाण होते. सभेला संबोधित करताना सर्व प्रथम विभागीय सचिव यांनी संघटनेची भूमिका स्पष्ट केली त्यानंतर अध्यक्षस्थानी असलेल्या विभागीय अध्यक्ष यांच्या अध्यक्षते खाली नवीन कार्यकारिणीची निवड करण्यात



आली. हिंगणघाट आगाराचे अध्यक्ष म्हणून श्री, प्रदीपभाऊ शेंडे यांची एकमताने फेरनिवड करण्यात आली. आगाराचे सचिव म्हणून श्री. शीकांत काशीद यांची सुद्धा एकमताने कुठलाही विरोध न करता फेरनिवड करण्यात आली. तसेच कार्याध्यक्ष म्हणून श्री अल्ताफभाई मिर्झा तसेच कोषध्यक्ष म्हणून श्री, राजेंद्र मडावी, उपाध्यक्ष म्हणून श्री, अनिलभाऊ करपते. संघटन सचिव म्हणून श्री, विलासभाऊ फुसाटे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. सभेला महाराष्ट्र एसटी कामगार संघटनेचे असंख्य सभासद उपस्थित होते. खेळीमेळीच्या वातावरणात सभेला सुरवात करण्यात आली व सर्व नवनियुक्त पदाधिकारी यांना योग्य मार्गदर्शन करून सर्वांना पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.

आयुष भारत डॉक्टर्स असोशियन द्वारा कार्यशाळा संपन्न

आयुष भारत डॉ.असो. महाराष्ट्र यांच्या मार्फत पत्रकारांना दहा लाखांचा विमा पॉलीसी मोफत देण्याचा निर्धार

दैं.जनप्रभात
विरुळ आकाजी/प्रतिनिधी
–मंगळवार दि ३०/१/२४ ला सिद्धिविनायक मंगल कार्यालय पंचधारा रोड पुलगाव येथे सकाळी ११ वाजता आयुष भारत डॉक्टर्स असोसिएशनचे विदर्भ व मराठवाड्यातील पहिले सेमिनार चे आयोजन करण्यात आले होते या कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ.श्री अमिर मुलानी(राष्ट्रीयअध्यक्ष),कार्यक्रमाचे उदघाटक डॉ. सौ. साक्षी सुतार राष्ट्रीय कार्याध्यक्ष,मार्गदर्शक श्री एस एन सुतार यांच्या हस्ते करण्यात आले होते.तसेच आयुष भारत डॉ. असो.राष्ट्रीय पदाधिकारी, राष्ट्रीय सदस्य, तसेच सर्व राज्य अध्यक्ष, जिल्हाध्यक्ष पदाधिकारी, व सदस्य गण उपस्थित होते या कार्यक्रमाला २७० डॉक्टर उपस्थित होते सर्व मान्यवरांच्या हस्ते प्रथम फोटो चे पूजन करून हारार्पण करण्यात आले त्यानंतर प्रमुख पाहुण्यांचे स्वागत समारंभ करून सत्कार करण्यात आले तसेच प्रमुख पाहुन्याच्या हस्ते डॉक्टरांना प्रशस्तीपत्र देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला तसेच या कार्यक्रमात आयुष भारत डॉ. असो.महाराष्ट्र यांच्या मार्फत महाराष्ट्रातील पत्रकारांना दहा लाखांचा विमा पॉलीसी देण्याचा निर्धार केला आहे त्यानंतर कार्यक्रमाचे अध्यक्ष, प्रमुख पाहुणे व मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले या कार्यक्रमाला डॉक्टर मंडळी व प्रमुख पाहुणे, मान्यवर मोठ्या प्रमाणात उपस्थित होते यावेळी डॉ विनोद देशमुख यांची आयुष भारत



डॉ. असो.महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष म्हणून निवड करण्यात आले तसेच डॉ मोहन बमनोटे यांची आयुष भारत डॉ. असो.विदर्भ अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आले विदर्भ व मराठवाड्यातील पहिले राज्यस्तरीय सेमिनारचे आयोजन केले होते. राज्यातील या सेमिनारला उपस्थित राहून सेमिनारचा लाभ घेतला त्याबद्दल महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष डॉ विनोद देशमुख आयुष भारत डॉ असो.यांनी सगड्यांचे आभार मानले व कार्यक्रमाचे सांगता करण्यात आली.

सकल कुणबी समाजाचे सुमित वानखेडे यांना निवेदन-सुमित वानखेडे यांना "सकल कुणबी समाज भवन" निर्माणासाठी समाजाचे साकडे

दै.जनप्रभात
आर्वी/प्रतिनिधी
तालुक्यातील शहर तथा ग्रामीण भागातील कुणबी समाजाच्या प्रातिनिधिक शिष्टमंडळाने सुमित वानखेडे यांची भेट घेऊन आर्वी शहरात 'सकल कुणबी समाज भवन' मंजूर करून त्याचे भव्य दिव्य निर्माण व्हावे यासाठी चर्चा करून निवेदन दिले. सविस्तर चर्चे दरम्यान 'सकल कुणबी

निवेदनात केलेल्या मागणीला सुमित वानखेडे यांचा सकारात्मक प्रतिसाद

समाज भवनाची' आवश्यकता व उपयोगीता लक्षात घेऊन सुमित वानखेडे यांनी कुणबी समाज शिष्टमंडळास सकारात्मक प्रतिसाद दिल्याने महाराष्ट्रात प्रथमच 'सकल कुणबी समाज भवन' निर्मितीस श्रीगणेश झाला आहे. आर्वी तालुक्यातील शहरी व ग्रामीण भागात कुणबी समाजाची संख्या मोठया प्रमाणात आहे. कुणबी समाजाचा मुख्य व्यवसाय शेती आहे. बदलत्या निसर्ग चक्राने गेल्या काही वर्षात कुणबी समाजाचा शेतकरी मेटाकुटीस आला आहे. त्यामुळे गरीब कुणबी समाजातील परिवारातील सामाजिक व पारिवारिक कार्यक्रम पार पाडण्यासाठी समाजाचे सभागृह नसल्याने नाईलाजास्तव खाजगी कार्यालय भाड्याने घेवुन कार्य प्रसंग पार पाडावे लागतात. समाजातील लोकांना कार्यालयाचे वाढते भाडे परवडत नसल्याने प्रसंगी बाहेरून कर्ज काढुन कार्य प्रसंग पार पाडावा लागतो. मोठे कार्यप्रसंगासाठी विविध स्वरूपातून रक्कम जमा करता करता समाज बांधव कर्जाच्या विळख्यात सापडतात. त्यामुळे हे चित्र बदलण्यासाठी 'सकल कुणबी समाज भवनाची' नितांत गरज सद्यस्थितीत आहे. कुणबी समाजाला इतर समाजाप्रमाणे समाजाचे हक्काचे सभागृह नाहीच. त्यामुळे कुणबी समाजाचे सामाजिक, सांस्कृतिक व पारिवारिक कार्य प्रसंग आर्वी येथे पार पाडण्यासाठी भव्य दिव्य



"सकल कुणबी समाज भवन" देण्याची मागणी केली आहे. निवेदन देते वेळी राजेंद्र पावडे, अशोक निकम, गौरव ठाकरे, अमोल शेंडे, सचिन्द्र कदम, अश्विन शेंडे, ओमप्रकाश कडू, निखिल कडू, अमोल बोबडे, निलेश देशमुख, एम. व्ही. कळमकर, नरेश गेडाम, हर्षल शेंडे, प्रमोद दाऊतपुरे, हर्षल पांडे, मंगेश सरोदे, छत्रपती बोके, कार्तिक काळे, संजय दांदडे, प्रविण पावडे,मनोज कसर, योगेश सरोदे, धर्मेंद्र राऊत, दर्शनकुमार चांभारे, जितेंद्र ठाकरे, मनोज कसर, सुहास देशमुख, मनिष उभाड , विशाल राऊत, यशवंत भोयर, सुहास ठाकरे, चंद्रशेखर शेंडे, शाम सरोदे, रमेश हांडे, बाळाभाऊ सोनटक्के, अजिंक्य कडू, रूपेश शेंडे, नितीन कदम,राहुल चौधरी, कुमार गेडे, यांच्यासह अनेक समाजबांधवांची समाज प्रातिनिधिक स्वरूपात उपस्थिती होती.

कामठीत महात्मा गांधी यांना अभिवादन

दैं.जनप्रभात
नंदू कोल्हे
कामठी/प्रतिनिधी
शहर वतीने महात्मा गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त
नगर परिषद परिसरातील महात्मा गांधीजींच्या पुतळ्यास माल्यार्पण करून
अभिवादन करण्यात आले.
यावेळी जि. प.चे माजी अध्यक्ष सुरेश भोयर, वसंत गुरुजी, राजकुमार गेडाम, काशिनाथ प्रधान, इर्शाद शेख, मोहम्मद सुलतान, किशोर धांडे, चिंधू दुगाणे, सलामत अली, विष्णू चनोले, अब्दुल सलाम अन्सारी,सोहेल अंजुम, अजबराव उईके, इशरत खान बाजी, रफिक खान, तैसेफ फैजी,आकाश भोकरे, प्रकाश लाईनपांडे, आरीफ





मीर, आरिफ कुरेशी, राजेश कांबळे,साजिद अन्सारी, परवीन बानो, दीपाली पाटील, छाया कांबळे, संगीता फुले, गीतापाटील, सिंधू मेश्राम, कांचन खोब्रागडे, गुंफा गेडाम, विजय गजभिये, डॉ. फरजाना बानो, दीक्षा कांबळे, सषमा नागदेवे आदी उपस्थित होते.

सोनेकर कोलेज ऑफ फार्मसीमध्ये जागतिक कुष्ठरोग दिना निमित्य रॅलीचे आयोजन

दैं.जनप्रभात /कोराडी,
दिलीप येवले/प्रतिनिधी
जागतिक कुष्ठरोग दिनाच्या औचित्याने सोनेकर कॉलेज ऑफ फार्मसी, कोराडी येथे ३० जानेवारी रोजी पोस्टर स्पर्धा आणि महादुल्ला परिसरात जनजागरूकता रैलीचे आयोजन करण्यात आले होते.कुष्ठरोगास 'हैनसेन रोग' असेही म्हणतात. हा रोग मायकोबॅक्टेरियम लेप्री नावाच्या जिवाणूमुळे होतो. या आजाराबाबत लोकांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी जागतिक कुष्ठरोग दिन '' साजरा केला जातो. यानिमित्याने महादुला परिसरात कुष्ठरोगाच्या बाबतीत लोकांमध्ये जागरुकता निर्माण करण्याच्या हेतूने रॅलीचे



आयोजन करण्यात आले होते. आयोजित कार्यक्रमास रवि बहुउद्देशिय शैक्षणिक संस्थेचे अध्यक्ष के.पी. सोनेकर, सचिव एम. पी. सानेकर, सोनेकर कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ. ए. एन. मलिये उपस्थित होते. पोस्टर स्पर्धेत सेजल बारापात्रे प्रथम, अंकीता पोरभरे द्वितीय आणि दिव्या पागरूत यांना तृतिय पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले. स्पर्धे चा व रॅलीच्या योजनासाठी पी. सी. माटे, प्रा. सोनम एम. शेंडे, पी. एम. नवले, प्रा. एम. एस अंबेकर, प्रा. ए. आर. थोटे यांनी विशेष प्रयत्न घेतले.

हळदी-कुंकू कार्यक्रमातून महिला सक्षमीकरणाचा नारा

दैं.जनप्रभात / नंदू कोल्हे
कामठी/प्रतिनिधी
ऑरेंज सिटी पार्क येथील मंडळातर्फे रविवारी तीळ-गुळ व हळदी-कुंकू कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यानिमित्त पारंपरिक सणाला आधुनिकतेची जोड देत महिला सक्षमीकरण, स्वसंरक्षण यावर जनजागृती करण्यात आली. या कार्यक्रमात विविध क्षेत्रात कार्याचा ठसा उमटविणाऱ्या महिलांनी सहभाग घेतला.मकरसंक्रांतीनिमित्त महिलांची ओटी भरून त्यांना वाण देण्यात आले. त्यानंतर महिलांवर वाढलेल्या अत्याचारांबाबत चिंता व्यक्त करत महिला सक्षमीकरणाबाबत जनजागृतीपर विचार मांडण्यात आले. स्वसंरक्षणाबाबत मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी विविध क्षेत्रात कार्याचा ठसा उमटविणाऱ्या समाजातील महिलांची उपस्थिती



राहिली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मनीषा खिनकर, मितांश खिनकर, अनिता डोंगरे, कीर्ती गजभिये, सपना मारबते, ज्योती भातकुले, वनमाला मेंढे, किरण सिंग, मालती चोपडे, शिवानी शर्मा, रंजना नारनवरे आदींनी परिश्रम घेतले.

निवडक राष्ट्रीय

भारतात ३५.९५ अब्ज डॉलर्सचे सोने आयात

नवी दिल्ली : भारतात यंदाच्या आर्थिक वर्षात एप्रिल ते डिसेंबरदरम्यान ३५.९५ अब्ज डॉलर्सचे सोने आयात झाले आहे. गेल्यावर्षीच्या तुलनेत भारतात सोने आयातीत २६.७ टक्क्यांची वाढ झाली. गेल्यावर्षी भारतात याच कालावधीत २८.४ अब्ज डॉलर्सची आयात झाली होती. एकट्या डिसेंबर २०२३ मध्ये भारतात ३ अब्ज डॉलर्सचे सोने आयात केले.

अमेरिकेने भारतीयांसाठी १४ लाख व्हिसा केले जारी

नवी दिल्ली : २०२३ मध्ये अमेरिकेने भारतीयांसाठी १४ लाख व्हिसा जारी केले आहे, तर भेटीच्या व्हिसाच्या अपॉइंटमेंटचा प्रलंबित कालावधी ७५ टक्क्याने कमी झाला आहे, असे अमेरिकन वकिलातीने सांगितले. २०२२ च्या तुलनेत २०२३ मध्ये भारतातून अमेरिकन व्हिसाच्या अर्जात ६० टक्क्यानी वाढ झाली. अमेरिकन व्हिसासाठी जगभरात केल्या जाणाऱ्या १० पैकी एक अर्ज हा भारतीयांचा असतो, असे वकिलातीने म्हटले आहे.

सुदानमधील हिंसाचारात ५४ ठार

जुबा : आफ्रिकेतील सुदान आणि साऊथ सुदान या देशांच्या सीमावर्ती विभागात झालेल्या हिंसाचारात ५४ जण ठार झाले आहेत. मृतांमध्ये महिला, मुले यांच्यासह संयुक्त राष्ट्रांच्या दोन शांतिसैनिकांचा समावेश आहे. याशिवाय हिंसाचारात ६४ जण जखमी झाले आहेत. सुदानमधून फुटून साऊथ सुदान या वेगळ्या देशाची निर्मिती झाली होती. दोन्ही देशांच्या सीमेवरील अब्येई हा प्रांत खनिज तेलसमृद्ध असून त्यावर दोन्ही देशांनी दावा केला आहे. सध्या तेथे दोन्ही देशांचे संयुक्त प्रशासन आहे.

इस्त्रायलच्या चार गुप्तहेरांना इराणमध्ये मृत्युदंड

तेहरान : इस्त्रायलच्या चार गुप्तहेरांना इराणने सोमवारी पहाटे मृत्युदंड ठोठावला. मोहम्मद फरमर्झी, मोहसीन मझलूम, वफा अझरबार आणि पेजमन फातेही अशी या चौघांची नावे असून त्यांच्यावर इराणमध्ये घुसून बॉम्बस्फोट घडवण्याचा कट केल्याचा आरोप होता. हे चार जण इस्त्रायलच्या मोसाद या गुप्तहेर संघटनेशी संबंधित होते. त्यांनी इराकच्या कुर्दिस्तान प्रांतातून इराणमध्ये अवैधपणे प्रवेश केला. इराणमधील इस्फाहान येथील संरक्षण सामग्रीचे उत्पादन करणाऱ्या कारखान्यात ते स्फोट घडवण्याची तयारी करत होते.

मालदीवच्या अध्यक्षांविरुद्ध महाभियोगाची तयारी

माले : मालदीवचे चीनधार्जिणे अध्यक्ष मोहम्मद मुईझू यांच्याविरुद्ध महाभियोग चालवण्याची तयारी तेथील विरोधी पक्षांनी केली आहे. मुईझू यांच्या भारतविरोधी धोरणांमुळे मालदीवमधील विरोधी पक्ष नाराज झाले असून त्यांनी अध्यक्षांना पदावरून हटवण्याच्या हालचाली सुरू केल्या आहेत.

मालदीवमध्ये सध्या अध्यक्ष मुईझू यांची पीपल्स नॅशनल काँग्रेस (पीएनसी) आणि प्रोग्रेसिव्ह पार्टी यांचे आघाडी सरकार सत्तेत आहे. मुईझू यांनी निवडणूक जाहीरनाम्यातच भारतविरोधाचे धोरण अवलंबले होते. निवडून आल्यास भारताला मालदीवमधील सैन्य मागे घेण्यास भाग पाडू, असे आश्वासन त्यांनी मतदारांना दिले होते. त्यानुसार अध्यक्षपदी निवड झाल्यावर त्यांनी भारताला सैन्य मागे घेण्याची मागणी केली. भारताबरोबरचा जलविज्ञान करार रद्द केला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नुकतीच लक्षद्वीपला भेट दिली. त्यावरून दोन्ही देशांत वाद निर्माण झाला.

भारतविरोधी भूमिकेमुळे विरोधी पक्ष नाराज



संसदेत कडेकोट सुरक्षा

मालदिवियन डेमोक्रॅटिक पार्टीने (एमडीपी) देशाचे अध्यक्ष मोहम्मद मुईझू यांना पदावरून हटवण्यासाठी महाभियोग चालवण्याची तयारी केली आहे. त्यांनी अनेक खासदारांच्या स्वाक्षऱ्या असलेले निवेदन तयार केले आहे. रविवारी मुईझू सरकारविरुद्ध अविश्वास ठरावादरम्यान संसदेत खासदारांची हाणामारी झाली. या घडामोडींच्या पार्श्वभूमीवर संसद परिसरात पोलीस आणि सेनादलांनी कडेकोट सुरक्षा व्यवस्था ठेवली आहे. राजधानी माले शहरात तणावाचे वातावरण आहे.

मालदीवच्या मंत्र्यांनी मोदीविरोधी विधाने केली. त्यामुळे तेथील तीन मंत्र्यांची हकालपट्टी झाली. भारतीय पर्यटकांनी मालदीववर बहिष्कार टाकला.

या सर्व घटनाक्रमामुळे अध्यक्ष मुईझू यांच्या सरकारने तेथील विरोधी पक्षांचा रोष ओढवून घेतला. भारतासारख्या विश्वासू मित्राला नाराज केल्याबद्दल मुईझू यांनी अध्यक्षपदाचा राजीनामा द्यावा, अशी मागणी तेथील महत्त्वाचा विरोधी पक्ष असलेल्या मालदिवियन डेमोक्रॅटिक पार्टीने (एमडीपी) केली. तसेच मुईझू यांच्या सरकारविरुद्ध संसदेत अविश्वाचा ठराव आणला. रविवारी या ठरावावर मतदान होणार होते. त्यावेळी सत्ताधारी आणि विरोधी पक्षाच्या खासदारांमध्ये हाणामारी झाली. संसदेत खासदार एकमेकांना लाथाबुक्क्या मारत असलेली दृश्ये सोशल मीडियावरून व्हायरल झाली. त्यानंतर विरोधी पक्षांनी मुईझू यांच्याविरुद्ध महाभियोग चालवून त्यांना हटवण्याची तयारी केली आहे.


हनुमान झेंड्यावरून कर्नाटकात वादंग

बंगळुरू : कर्नाटकच्या मंड्या जिल्ह्यातील केरागोडू गावात फडकावण्यात आलेल्या १०८ फुटी हनुमान (भगवा) झेंड्याच्या प्रकरणावरून भाजप-काँग्रेसमध्ये वादाला तोंड फुटले आहे. पोलिसांनी गावात जमावबंदी लागू केली आहे. सध्या परिसरात तणाव आहे. बंगळुरूमध्ये भाजप कार्यकर्त्यांनी आंदोलन सुरू केले असून अनेकांना ताब्यात घेण्यात आले आहे.

पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, केरागोडू आणि शेजारच्या १२ गावांमधील गावकरी आणि काही संघटनांनी रंगमंदिर या ठिकाणी ध्वज स्थापना करण्यासाठी निधी गोळा केला होता. भाजप, जनता दल सेक्युलरचे कार्यकर्ते यात आघाडीवर होते, अशीही माहिती आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, हनुमान ध्वज १०८ फुटांचा होता. पण, काही लोकांकडून त्याविरोधात तक्रार दाखल करण्यात आली होती. त्यानंतर अधिकाऱ्यांनी हनुमान झेंडा उतरवण्याची विनंती केली होती. मात्र, गावकरी झेंडा न उतरवण्यावर ठाम होते. काही लोक याचे राजकारण करत असल्याचा आरोप गावकऱ्यांनी केला आहे. गावात तणाव निर्माण झाल्याने आणि परिस्थिती हाताबाहेर जाण्याची शक्यता असल्याने मोठ्या प्रमाणात पोलीस तैनात करण्यात आले.

गावकऱ्यांना भाजप आणि बजरंग दलच्या कार्यकर्त्यांनी साथ दिली आहे. गावकऱ्यांनी झेंडा काढण्याच्या विरोधात दुकाने बंद ठेवण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे शनिवारी हा वाद विकोपाला गेला. रविवारी ग्रामपंचायतचे कर्मचारी झेंडा काढण्यासाठी आले होते. त्यावेळी गावकऱ्यांनी गो बॅकच्या घोषणा देत विरोध दर्शवला. स्थानिक काँग्रेस आमदार रवी कुमार यांचे काही फलक फाडण्यात आले होते. त्यानंतर या प्रकरणाने राजकीय वळण घेतले. त्यामुळे पोलिसांकडून फौजफाटा वाढवण्यात आला आहे. भाजपने झेंडा काढण्याच्या विरोधात आंदोलन तीव्र केले आहे. भाजपने कर्नाटकच्या प्रत्येक जिल्ह्यात आंदोलनाला सुरुवात केली आहे. त्यानंतर भगवा झेंडा उतरवण्यात आला आहे.

काँग्रेस-भाजप समोरासमोर



राष्ट्रध्वज फडकावण्यास परवानगी

या घटनाक्रमाबाबत मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी सांगितले की, 'राष्ट्रीय ध्वज फडकावण्याऐवजी हनुमान ध्वज फडकवणे, ही बाब योग्य नाही. मी त्या ठिकाणी राष्ट्रीय ध्वज फडकवण्यास सांगितले आहे.' मंड्या जिल्ह्याचे प्रभारी मंत्री एन. चेलुवरयास्वामी यांनी सांगितले की, राष्ट्रीय ध्वज फडकवण्याचीच संमती देण्यात आली होती. २६ जानेवारीच्या दिवशी त्यांनी भारताचा झेंडा फडकावला आणि त्यानंतर हनुमान ध्वज उभारला. ही बाब योग्य नाही, असे त्यांनी म्हटले आहे.

सीएए कायदा लवकरच देशभरात लागू होणार ?



केंद्रीय मंत्र्यांच्या वक्तव्याने चर्चांना उधाण

कोलकाता : केंद्रीय मंत्री शांतनु ठाकूर यांनी पश्चिम बंगालमध्ये एका कार्यक्रमातील भाषणादरम्यान नागरिकत्व सुधारणा कायदा अर्थात सीएए आठवडाभरात देशभर लागू होणार, असे विधान केले आहे. त्यामुळे नागरिकत्व कायद्यासंदर्भात चर्चांना उधाण आले आहे. २०१९ साली नागरिकत्व सुधारणा कायदा संसदेत मंजूर झाला असून त्यानंतर झालेल्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर कायद्याच्या अंमलबजावणीसंदर्भात टप्प्याटप्प्याने निर्णय घेतले जात आहेत.

पश्चिम बंगालच्या २४ परगणा जिल्ह्यातल्या काकद्वीप भागात झालेल्या कार्यक्रमात शांतनु ठाकूर यांनी नागरिकत्व सुधारणा कायद्याबाबत भूमिका मांडली. नुकतेच राम मंदिराचे उद्घाटन करण्यात आले आहे. आता मी तुम्हाला खात्रीने सांगतो की, येत्या सात दिवसांत फक्त पश्चिम बंगालमध्येच नाही तर अख्ख्या भारतात नागरिकत्व सुधारणा कायदा लागू केला जाईल. देशातल्या प्रत्येक राज्यात या कायद्याची अंमलबजावणी केली जाईल, असे शांतनु ठाकूर यांनी या कार्यक्रमात सांगितले.

२०१९ साली संसदेमध्ये नागरिकत्व सुधारणा कायदा संमत झाला. मात्र, कायदा मंजूर झाल्यानंतर लागलीच विरोधकांसह देशात अनेक ठिकाणी कायद्याविरोधात आंदोलने सुरू झाली. विरोधकांनी कायद्याला परखड शब्दांत विरोध केला. या पार्श्वभूमीवर हा कायदा संमत झाला असला, तरी त्याच्या अंमलबजावणीसंदर्भात नियमावली अद्याप स्पष्ट झालेली नाही. अफगाणिस्तान, बांगलादेश आणि पाकिस्तानमधून ३१ डिसेंबर २०१४ पूर्वी भारतात आलेल्या हिंदू, शीख, बौद्ध, जैन, पारशी व ख्रिश्चन स्थलांतरितांना भारतीय नागरिकत्व देण्यासंदर्भात या कायद्यात तरतुदी करण्यात आल्या आहेत.

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी गेल्या वर्षी डिसेंबर महिन्यात नागरिकत्व सुधारणा कायद्याच्या अंमलबजावणीसाठी भारतीय जनता पक्ष बांधील असल्याचे विधान केले होते. हे स्पष्ट सांगू इच्छितो की, सीएए हा संसदेत मंजूर झालेला कायदा आहे. त्याची अंमलबजावणी कुणीही रोखू शकत नाही. प्रत्येकाला नागरिकत्व मिळेल. आमच्या पक्षाची ही बांधिलकी आहे, असे अमित शहा पश्चिम बंगालमधील भाजप पदाधिकाऱ्यांसमोर म्हणाले होते.

पान १ वरून

राज्यसभेच्या ५६ जागांसाठी निवडणूक घोषित

जुलै २०२२ मध्ये झालेल्या राज्यसभेच्या द्विवार्षिक निवडणुकीत भाजपने आघाडीची मते फोडून चौथा उमेदवार विजयी केला होता. या निवडणुकीत आघाडीच्या फुटीची बीजे पेरली गेली होती. त्यानंतरच्या विधान परिषद निवडणुकीत आघाडीचा पराभव निश्चित करून एकनाथ शिंदे यांनी शिवसेनेत बंड केले. या बंडानंतर आघाडी सरकारला आणि मुख्यमंत्रीपदावरून उद्धव ठाकरेंना पायउतार व्हावे लागले होते. त्यानंतर निवडणूक अयोग आणि विधानसभा अध्यक्षांनी शिवसेना हा पक्ष एकनाथ शिंदे यांचा असल्याचा निर्णय दिला. त्यामुळे या निवडणुकीत शिंदे गटाचे मुख्य प्रतोद भरत गोगावलेंचा पक्षादेश शिवसेना आमदारांना लागू होणार आहे. शिवसेनेनंतर राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पडली. या फुटीनंतर दोन्ही गटाची निवडणूक आयोग आणि विधिमंडळात लढाई सुरू आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाबाबत निवडणूक आयोगाने अजून निर्णय दिलेला नाही. राष्ट्रवादी आमदार अपात्रतेबाबत विधानसभा अध्यक्षांकडे सुनावणी सुरू आहे. राज्यसभा निवडणुकीआधी निवडणूक आयोग आणि विधानसभा अध्यक्षांकडून राष्ट्रवादीच्या संदर्भात निर्णय अपेक्षित आहे.

या पार्श्वभूमीवर राज्यसभेची निवडणूक रंगतदार ठरणार आहे. भाजपचे आमदार गोवर्धन शर्मा यांच्या निधनामुळे अकोला पश्चिम विधानसभा मतदारसंघाची जागा रिक्त असल्याने राज्यसभा निवडणुकीसाठी विधानसभेतील २८७ आमदार मतदान करतील. या निवडणुकीत विजयासाठी ४२ मतांचा कोटा आवश्यक आहे. जुलैमध्ये झालेल्या निवडणुकीत भाजपने मतांचे गणित जमवून मतदान केले होते. त्यामुळे विजयी उमेदवाराच्या अतिरिक्त मतांवर भाजपने चौथा उमेदवार निवडून आणला होता. मात्र, आता राजकीय परिस्थिती बदलली आहे. उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेकडे १५ ते १६ आमदार, तर शरद पवारांकडे ११ आमदार आहेत. त्यामुळे या दोन्ही गटांना राज्यसभा निवडणुकीत विजयाचे गणित जमविणे अवघड आहे. अशातच उद्धव ठाकरे गटाला शिंदे गटाचा व्हीप लागू होणार असल्याने ठाकरे गटाची कोंडी होणार आहे.

निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या राज्यसभा निवडणुकीसाठी ८ फेब्रुवारी २०२४ रोजी अधिसूचना जारी होणार आहे. १५ फेब्रुवारी ही उमेदवारी अर्ज करण्याची अंतिम तारीख असून १६ फेब्रुवारीला उमेदवारी अर्जांची छाननी केली जाईल. या निवडणुकीत २० फेब्रुवारीपर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेता येतील, तर २७ फेब्रुवारीला सकाळी ९ ते दुपारी ४ वाजेपर्यंत मतदान होणार असून सायंकाळी पाच वाजता मतमोजणी होऊन निकाल घोषित केले जातील. निवडणूक आयोगाने या निवडणुकीत मतदानासाठी विशेषतः जांभळ्या रंगाचे स्केच पेन वापरण्याचे निर्देश दिले आहेत.

ज्ञानवापीच्या तळघराचे वैज्ञानिक सर्वेक्षण करा

मात्र, हिंदू पक्षाने पुन्हा एकदा ज्ञानवापीला इजा न करता हे सर्वेक्षण शास्त्रोक्त पद्धतीने करण्यात यावे, असा अर्ज सुप्रीम कोर्टात दाखल केला आहे. वादग्रस्त जागेतील वजूखाना सुप्रीम कोर्टाच्या आदेशानंतर संरक्षित करण्यात आला आहे. तो भाग प्रतिबंधित करण्यात आला आहे. तिथे आधी विश्वेश्वराचे शिवलिंग असल्याचा दावा हिंदू पक्षाकडून केला जात आहे. मात्र, ते कारंजे असल्याचा दावा मुस्लीम पक्षाकडून केला जात आहे.

दरम्यान, या भागाचे मुस्लीम समाजासाठी कोणतेही धार्मिक महत्त्व नाही. कारण त्यांच्या मते तेथे एक कथित कारंजे आहे. पीठ, पीठिका इत्यादी शिवलिंगाशी निगडित मूळ वैशिष्ट्ये लपवण्यासाठी हे आधुनिक बांधकाम जाणीवपूर्वक केले गेले आहे. शिवलिंगाचा परिसर कृत्रिम भिंती उभारून लपवण्यात आल्याचा दावा हिंदू पक्षाने केला आहे. तसेच ज्ञानवापी येथील प्रतिबंधित केलेले क्षेत्र खुले करावे. प्रतिबंधित जागेत सर्वेक्षण करण्यास बंदी घालणारा आदेश मागे घ्यावा. वादग्रस्त जागेवर कृत्रिम भिंतींनी प्रतिबंधित केलेली वाराणसी मशिदीची १० तळघरे खुली करावीत. त्या ठिकाणी पुरातत्त्व खात्यामार्फत वैज्ञानिक सर्वेक्षण करण्याची परवानगी द्यावी, अशा मागण्या हिंदू पक्षाने आपल्या याचिकेत केल्या आहेत.

जेईई विद्यार्थिनीची आत्महत्या

अभ्यास करत होती. तिने आपल्या खोलीत गळफास लावून आत्महत्या केली. ३१ जानेवारीला तिचा पेपर होता. कोटा हे कोचिंगचे शहर मानले जाते. तेथे मुले मोठमोठी स्वप्न बघतात. गेल्यावर्षी येथे २९ मुलांनी आत्महत्या केली.

महिला कर्मचाऱ्यांना पेन्शनसाठी मुलगा, मुलगी वारस ग्राह्य

(पान १ वरून) प्रत्येक क्षेत्रातील महिलांना कायदेशीर हक्क मिळवून देण्याचे धोरण पंतप्रधान मोदी यांनी आखले आहे. त्यानुसार हे धोरण तयार केले. यासाठी संबंधित महिला कर्मचाऱ्याने त्यांच्या कार्यालयातील प्रमुखाकडे लेखी विनंती करणे गरजेचे आहे. संबंधित महिला सरकारी कर्मचारी किंवा पेन्शनर मृत झाल्यावर तिची फॅमिली पेन्शन तिने नामांकित व्यक्तीला देण्याची कार्यवाही केली जाईल, असे सरकारी पत्रकात नमूद केले आहे.

मोबाईलचा वापर रिल्ससाठी नको, शिक्षणासाठी करा!

(पान १ वरून) त्यासाठी लिखाणाचा सराव करा, असे ते म्हणाले. परीक्षेच्या वेळी तुम्ही चांगली झोप घ्या. तसेच परीक्षेवेळी रात्री अभ्यास करू नका. त्याचबरोबर चांगल्या आहारावर लक्ष केंद्रित करा. आपले आरोग्य चांगले नसल्यास तुम्हाला परीक्षा व्यवस्थित देता येणार नाही, असे त्यांनी सांगितले.

हेमंत सोरेन यांच्या घरी ईडीची धाड

नवी दिल्ली : झारखंडचे मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांच्या नवी दिल्लीतील निवासस्थानी ईडीच्या अधिकाऱ्यांनी मनी लॉन्डरींग प्रकरणी छापा टाकला. सक्तवसुली संचालनालयाने म्हणजे ईडीने अलिकडेच २० जानेवारी रोजी एका भूखंड घोटाळा-प्रकरणी हेमंत सोरेन यांची चौकशी केली होती. त्याच प्रकरणात ईडीचे अधिकारी आता त्यांच्या घरी पोहोचले असावेत, असा अंदाज लावण्यात येत आहे.

ईडीचे अधिकारी दिल्ली पोलिसांसह सोरेन यांच्या निवासस्थानी पोहोचले होते. हेमंत सोरेन यांचे निवासस्थान दक्षिण दिल्लीत ५/१ शांती निकेतन या ठिकाणी आहे. चौकशीच्या वेळी तेथे पत्रकार, छायाचित्रकारांनी गर्दी केली होती. गेल्याच आठवड्यात ईडीने सोरेन यांना चौकशीसाठी समन बजावले होते. २९ किंवा ३१ जानेवारी रोजी उपलब्ध होण्याची सूचना दिली होती. संबंधित भूखंड घोटाळ्यात ईडीने आतापर्यंत १४ जणांना अटक केली आहे.

मुक्त न्यायव्यवस्थेसाठी राज्यघटनेतील तरतुदी अपुऱ्या

नवी दिल्ली : सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांनी देशाच्या संविधानातील तरतुदी मुक्त न्यायव्यवस्थेसाठी पुरेशा नाहीत, अशी खंत व्यक्त केली आहे. मुक्त न्यायव्यवस्था म्हणजे अशी न्यायव्यवस्था जी कार्यकारी व कार्यकारी मंडळापासून अलिप्त असेल. ज्या न्यायव्यवस्थेत न्यायाधीशही मानवी पक्षपातांपासून मुक्त असतील, असे स्पष्टीकरणही सरन्यायाधीशांनी दिले आहे. यामुळे त्यांचे हे विधान चांगलेच चर्चेत आले आहे.

मागील काही महिने वेगवेगळ्या राजकीय प्रकरणांमध्ये सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांनी मांडलेली परखड भूमिका व दिलेले निकाल चर्चेचा विषय राहिले आहेत. यात अनेक महत्त्वपूर्ण निकालांचाही समावेश होता. त्यात महाराष्ट्रातील सत्तासंघर्षाबाबत व दिल्ली-हरयाणा राज्यपाल विरुद्ध सरकार खटल्यांबाबत मोठी चर्चा झाल्याचे दिसून आले आहे. आता सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांचे विधान घटनात्मक विश्लेषकांसाठी चर्चेचा विषय झाले आहे. देशाच्या राज्यघटनेतील सध्याच्या तरतुदी न्यायव्यवस्थेच्या स्वातंत्र्यासाठी पुरेशा नसल्याचेही ते म्हणाले आहेत. बार अँड बेंचने



सरन्यायाधीश चंद्रचूड यांची खंत

संकेतस्थळासवर यासंदर्भातील सविस्तर माहिती देण्यात आली आहे.

मुक्त न्यायव्यवस्था म्हणजे अशी न्यायव्यवस्था जी कार्यकारी व कार्यकारी मंडळापासून अलिप्त असेल. ज्या न्यायव्यवस्थेत न्यायाधीशही मानवी पक्षपातांपासून मुक्त असतील, असे सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांनी नमूद केले. सर्वोच्च न्यायालयाची ७५ वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. भारताच्या राज्यघटनेमध्ये न्यायव्यवस्थेच्या स्वातंत्र्यासाठी अनेक संस्थात्मक तरतुदी करण्यात आल्या आहेत. उदाहरणार्थ न्यायाधीशांच्या निवृत्तीचे निश्चित वय, न्यायाधीशांच्या निवृत्तीनंतर त्यांच्या वेतनात बदल न करण्याचे बंधन आहे. पण, न्यायव्यवस्थेचे स्वातंत्र्य अबाधित राखण्यासाठी या संस्थात्मक तरतुदी अपुऱ्या पडत आहेत, असे न्यायमूर्ती धनंजय चंद्रचूड म्हणाले आहेत.

गेल्या काही काळात यासंदर्भात अनेक वाद उद्भवले आहेत. त्यांचे स्वरूप कमालीचे क्लिष्ट आहे. या वादांचे निराकरण सध्याच्या चौकटीत अवघड होत आहे. पण हे सर्व असले, तरी सर्वोच्च न्यायालय राज्यघटनेचे संरक्षण व कायद्याचे राज्य कायम राखण्याचे आपले मूलभूत कर्तव्य कधीच विसरू शकत नाही, असेही ते म्हणाले.

न्यायपालिकेवर विश्वास वाढतोय

सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांनी न्यायपालिकांसमोर प्रलंबित असणाऱ्या खटल्यांबाबतही भाष्य केले. ते म्हणाले, "सातत्याने वाढत्या खटल्यांवर तोडगा काढण्यात वर्षागणिक सर्वोच्च न्यायालयाला अडचणींचा सामना करावा लागत आहे. आजघडीला फक्त सर्वोच्च न्यायालयासमोर ६५ हजार ९१५ खटले प्रलंबित आहेत. या वाढत्या खटल्यांचा अर्थ नागरिकांचा न्यायपालिकेवर विश्वास दृढ होत असल्याचेही सरन्यायाधीशांनी स्पष्ट केले आहे.

पदापेक्षा जात, धर्म आणि देश महत्त्वाचा

मराठा समाजाच्या आरक्षणासंबंधी राज्य सरकारने अधिसूचना काढल्यानंतर त्याला राज्य सरकारमधीलच ज्येष्ठ मंत्री छगन भुजबळ आणि केंद्रीय मंत्री नारायण राणे यांनी विरोध केला. छगन भुजबळ यांनी तर तातडीने राज्यातील प्रमुख ओबीसी नेत्यांची बैठक बोलावून पुढची दिशा स्पष्ट केली. नारायण राणे यांनी देखील रविवारी एक्सवरून पोस्ट करत आपण सोमवारी पत्रकारपरिषद घेऊन भूमिका स्पष्ट करू, असे म्हटले. सोमवारी त्यांनी पत्रकार परिषद घेतली नाही. मात्र एक्सवरूनच पोस्ट करत पुन्हा एकदा आपली भूमिका स्पष्ट केली.

या विषयावर मला महाराष्ट्र शासनाला विनंती करावयाची आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या महाराष्ट्रात लढवय्येपणाचा वारसा आणि इतिहास असलेल्या मराठा समाजाचे खच्चीकरण होणार नाही याची काळजी घ्यावी. स्वाभिमानी मराठा कुणबी समाजामध्ये समाविष्ट होऊन आरक्षण घेणार नाही. याशिवाय तसे केल्याने इतर मागासवर्ग (ओबीसी) समाजावर अतिक्रमण होणार आहे. या सगळ्या नाजूक प्रश्नाचा महाराष्ट्र सरकारने सखोल विचार करावा. महाराष्ट्रामध्ये मराठा समाजाची संख्या ३२ टक्के म्हणजे ४ कोटी एवढी आहे. कोणत्याही पदापेक्षा जात, धर्म आणि देश महत्त्वाचे आहेत एवढंच मला सांगावेसे वाटते, असं सूचक विधानही नारायण राणे यांनी केलं आहे.

छगन भुजबळ आणि नारायण राणे हे राज्याच्या राजकारणातील दोन ज्येष्ठ नेते आहेत. त्यामुळे या दोघांच्या नाराजीची दखल राज्य सरकारला घ्यावीच लागणार आहे. कारण दोघांकडेही त्यांना मानणारा मोठा वर्ग राज्यभरात आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी याआधीच जीआर पूर्ण वाचल्यानंतर छगन भुजबळ यांचे समाधान होईल, असे स्पष्ट केले आहे.

मला सरकारमध्ये ठेवायचे की नाही पक्षाने ठरवावे!

पण त्यांना ओबीसीत कशाला घुसवत आहात. त्यांना आरक्षण द्यायला सुरुवात झाली, हे आता थांबवा, अशी स्पष्ट भूमिकाही छगन भुजबळ यांनी सोमवारी मांडली.

भुजबळ म्हणाले, ''चांगले घर असले तरी झोपडी दाखवली जात आहे. शिक्षण असले तरी नाही म्हणून सांगितले जात आहे. नोकरी असली तरी दाखवली जात नाही. घरासमोर गाडी, ट्रॅक्टर असला तरी मोलमजुरी करतो म्हणून सांगितले जात आहे, असा मोठा दावा करत, इथे मंत्रिमंडळाच्या हुद्द्याचा कसलाही संबंध नाही. ओबीसी बांधवांचे, भटक्यांचे कित्येक वर्षांनी मिळणारे आरक्षण संपत आहे, याची आग मनात भडकत आहे. आमच्यात विविध जातींचे ३५० हून अधिक वाटेकरी होते. आता हजार वाटेकरी झाले. त्यामुळे वाटा कमी होणार, हे अगदी सरळ आहे. ओबीसींच्या ५४ टक्क्यांमध्ये आणखी २०-२५ टक्के घुसवले तेही बलदंड. भटके विमुक्त जमातीतील लोक असतील किंवा इतर ओबीसी जाती असतील, या सर्वांचे आरक्षण आता बलदंड लोक घेऊन जाणार आहेत. आमचे आरक्षण संपल्यात जमा आहे, अशी भीती वाटते. त्यामुळेच मी बोलत आहे, असे छगन भुजबळ म्हणाले.

भुजबळांशी चर्चा करू -अजित पवार

"प्रफुल्ल पटेलांनी यासंदर्भात पक्षाची भूमिका स्पष्ट केली आहे. कोणत्याही निर्णयाबाबत वेगवेगळ्या सहकाऱ्यांची वेगवेगळी मतं असतात. पण यातून कुणालाही दुखवायचं काही कारण नाही. कुणावरही अन्याय करण्याचं कारण नाही. रविवारी मुख्यमंत्री आणि मी एकत्र शंभूराज देसाईंच्या मुलाच्या लग्नाला होतो. तिथेही आमचं बोलणं झालं. आम्ही मुंबईला गेल्यानंतर मी, मुख्यमंत्री, देवेंद्रजी भुजबळांशी बोलू," अशी माहिती अजित पवार यांनी यावेळी दिली.

राष्ट्रवादी आमदार अपात्रतेचा निर्णय १५ फेब्रुवारीपर्यंत घ्या

यावर सरन्यायाधीश डी. वाय. चंद्रचूड, न्यायमूर्ती जे. बी. पर्डीवाला आणि न्यायमूर्ती मनोज मिश्रा यांच्या खंडपीठाने ३० ऑक्टोबर २०२३ रोजी दिलेल्या निर्णयावेळी नार्वेकर यांनी या प्रकरणी ३१ जानेवारीपर्यंत निर्णय घ्यावा, असे निर्देश दिले होते. मात्र, अंतिम मुदतीच्या दोन दिवस आधी सर्वोच्च न्यायालयात तीन आठवड्यांचा अतिरिक्त वेळ मागितला. महाधिवक्ता तुषार मेहता म्हणाले, शिवसेनेतील आमदार अपात्रता प्रकरणात विधानसभा अध्यक्ष व्यस्त होते. त्यामुळे त्यांना राष्ट्रवादी आमदार अपात्रता प्रकरणातील वेळ पाळता आली नाही. राष्ट्रवादी आमदार अपात्रताप्रकरणी कार्यवाही संपली आहे. परंतु, अध्यक्षांना आदेश देण्याकरिता आणखी तीन आठवड्यांची आवश्यकता आहे. यावरून सर्वोच्च न्यायालयाने त्यांना १५ फेब्रुवारीपर्यंतची मुदत दिली. त्यामुळे ३१ जानेवारी रोजी अपेक्षित असलेला निकाल आता लांबला असून राष्ट्रवादी आमदार अपात्रता प्रकरणाच्या निकालाची प्रतीक्षा १५ फेब्रुवारीपर्यंत करावी लागणार आहे.

२०२४ मध्ये शनिदेवाच्या स्थितीत ३ वेळा होणार बदल; या राशीच्या लोकांचे नशीब उजळेल

वैदिक ज्योतिषशास्त्रानुसार, सर्व ग्रह विशिष्ट वेळेच्या अंतराने आपली राशी बदलतात. इतकेच नाही तर ज्योतिषशास्त्रीय गणनेनुसार जेव्हा कोणताही ग्रह उगवतो, प्रतिगामी होतो, गोतर करतो किंवा मावळतो तेव्हा त्याचा प्रभाव संपूर्ण जगासह सर्व १२ राशींच्या लोकांवर दिसून येतो.

शनिदेव २०२५ पर्यंत कुंभ राशीत राहतील

शनिदेव सध्या कुंभ राशीत विराजमान आहेत आणि २०२५ पर्यंत शनिदेव कुंभ राशीतच राहतील. पण २०२४ मध्ये त्यांच्या परिस्थितीत मोठा बदल होणार आहे. ज्यामध्ये ११ फेब्रुवारी ते १८



मार्चपर्यंत शनिदेवाचा अस्त होईल आणि दुसरीकडे १८ मार्चला शनिदेवाचा उदय होईल. याशिवाय २९ जून ते १५ नोव्हेंबरपर्यंत शनि प्रतिगामी राहील. अशा स्थितीत शनीच्या स्थितीत बदल झाल्यामुळे सर्व १२ राशीच्या लोकांवर त्याचा प्रभाव पडेल, परंतु अशा ३ राशी आहेत ज्यांचे नशीब बदलणार आहे.

ज्योतिषशास्त्रानुसार, शनि हा कर्माचा न्याय आणि फळ देणारा ग्रह मानला जातो. शनिदेव लोकांना त्यांच्या कर्मानुसार फळ देतात. शनि २०२५ पर्यंत कुंभ राशीत राहील, परंतु २०२४ मध्ये त्याच्या स्थितीत मोठा बदल होईल.

मेष : मेष राशीच्या लोकांच्या व्यवसायात वाढ होईल. आरोग्याशी संबंधित सर्व समस्या दूर होतील. उत्पन्नाचे नवीन स्रोत निर्माण होतील, शनिदेवाच्या स्थितीत बदल झाल्यामुळे मेष राशीच्या लोकांना दिवसा दुप्पट आणि रात्री चौपट लाभ मिळेल. वैवाहिक जीवनात गोडवा राहील, जोडीदाराकडून सहकार्य मिळेल, अध्यात्मात रस वाढेल.

वृषभ : वृषभ राशीच्या लोकांना नोकरीत चांगल्या संधी मिळतील. तुम्हाला परदेशात जाण्याची संधी मिळेल, कुटुंबासाठी वेळ काढण्यात तुम्हाला अडचणींचा सामना करावा लागणार नाही. स्पर्धा परीक्षा आणि मुलाखतींमध्ये यश मिळण्याची संधी मिळेल.

मिथुन : मिथुन राशीच्या लोकांना करिअरमध्ये प्रगती होईल आणि मान-सन्मान वाढेल. लांबच्या प्रवासाला जाण्याची नवीन संधी मिळेल. शुभ कार्यावर पैसे खर्च करावे लागतील, कुटुंबातील आरोग्य चांगले राहील.

मंगळवारचा उपवास : या ८ कामाच्या गोष्टी जाणून घ्या

भीती आणि काळजीपासून मुक्ती देणारा मंगळवार. असे करावे व्रत कैवल्य. हिंदू धर्मात मंगळवारच्या उपासाला खूप महत्त्व दिले आहेत. अशी आख्यायिका आहे की विधी विधानाने व्रतकैवल्य केल्याने उपास करण्याच्या सर्व भीती, काळजी दूर होतात. मंगळवारच्या व्रतकैवल्याच्या पूजेची विधी :

- मंगळवारी सूर्योदयाच्या आधी उठायला हवं.
- नित्य विधी आटोपल्यावर आंघोळ करून शुचिर्भूत व्हावे.
- या दिवशी लाल रंगाचे कापडं घालणे शुभ मानले आहे. नंतर मारुतींना लाल फूल, शेंदूर, कापडं अर्पण करावी.
- मारुतीच्या मूर्तीसमोर दिवा लावून मनोमनी हनुमान चालीसा किंवा सुंदर कांडाचे पठण करावे.
- संध्याकाळी बेसनाच्या लाडूंचा किंवा खिरीचा नैवेद्य दाखवून स्वतः अळणी जेवण करावं.
- मंगळवारचा उपवास करणाऱ्यांना या दिवशी ब्रह्मचर्य व्रत पाळायला हवं.
- अशी आख्यायिका आहे की, मंगळाचे दोष असणाऱ्यांनी देखील मंगळवारचे उपवास करायला हवे. असे केल्यास लाभ होतो.
- शनिची महादशा, अडीच वर्षे किंवा साडेसाती पासून होणाऱ्या त्रासाला दूर करण्यासाठी मंगळवाराचे व्रतकैवल्य प्रभावी मानले जाते.



रेडमी-रियलमी नव्हे तर 'ही' कंपनी घेऊन येत आहे ६०००एमएएचची दमदार बॅटरी असलेला फोन

मोटो जी२४ पॉवर ३० जानेवारीला भारतीय बाजारात सादर होईल. यात ऑक्टा कोर हेलिओ जी८५ चिपसेटचा वापर केला जाईल.

मोटोरोलानं आपल्या जी सीरीज स्मार्टफोन मोटो जी२४ पॉवरची लाँच डेट सांगितली आहे. हा नवीन मोबाईल येत्या ३० जानेवारीला भारतीय बाजारात सादर होईल. डिव्हाइसबद्दल कंपनीनं सोशल मीडिया आणि ई-कॉमर्स साइट फ्लिपकार्टवर माहिती शेअर केली आहे. यात ६०००एमएएचची बॅटरी, ५०एमपी कॅमेरा, ६.६ इंचाचा मोठा डिस्प्ले, ८जीबीपर्यंत रॅम असे अनेक स्पेसिफिकेशन्स मिळतील. चला, जाणून घेऊया मोटो जी२४ पावरची संपूर्ण माहिती.

मोटो जी२४ पॉवर भारतीय लाँच

सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर कंपनीनं नवीन टीजर व्हिडीओ शेअर केला आहे ज्यात मोटो जी२४ पॉवर फोनचे फीचर्स आणि डिझाइन दाखवण्यात आली आहे. त्यानुसार डिव्हाइस ३० जानेवारीला लाँच केला जाईल. हा मोबाईल फ्लिपकार्ट आणि अन्य रिटेल स्टोअर्सवर सेलसाठी उपलब्ध होईल. तसेच फ्लिपकार्टवर मोबाईलची मायक्रोसाइट लाईव्ह झाली आहे. जिथे सर्व स्पेसिफिकेशन लिस्ट करण्यात आले आहेत.

मोटो जी२४ पॉवरचे स्पेसिफिकेशन्स

फ्लिपकार्ट लिस्टिंगनुसार मोटो जी२४ पॉवर ६.६ इंचाच्या डिस्प्लेसह लाँच केला जाईल. या स्क्रीनवर पंच होल कटआऊट डिझाइन मिळेल. मोटोरोलाचा जी२४ पॉवर मोबाईल लेटेस्ट अँड्रॉइड १४ वर आधारित असेल. पावर बॅकअपसाठी मोटो जी२४ पॉवरमध्ये ६०००एमएएचची बॅटरी आणि ३३वॉट फास्ट चार्जिंगचा सपोर्ट दिला जाईल.

फोनमध्ये परफॉर्मन्ससाठी कंपनी ऑक्टा कोर हेलिओ जी८५ चिपसेट देत आहे. त्याचबरोबर ग्राफिक्ससाठी माली जी५२ एमपी२ जीपीयू मिळेल. दोन स्टोरेज ऑप्शन दिले जातील, ज्यात ४जीबी आणि ८जीबी रॅमसह १२८ जीबी इंटरनल स्टोरेज मिळेल.

फोटोग्राफीसाठी स्मार्टफोनमध्ये ड्युअल रिअर कॅमेरा सेटअप एलईडी फ्लॅशसह दिला जाईल, ज्यात ५० मेगापिक्सलचा प्रायमरी आणि २ मेगापिक्सलचा दुसरी लेन्स असेल. तसेच, सेल्फी आणि व्हिडीओ कॉलिंगसाठी १६ मेगापिक्सलचा फ्रंट कॅमेरा मिळेल.

कनेक्टिव्हिटीसाठी मोबाइलमध्ये ड्युअल सिम ४जी, ब्लूटूथ ५.०, जीपीएस, यूएसबी टाइप सी पोर्ट, ३.५मिमी हेडफोन जॅक, एफएम रेडियोसारखे ऑप्शन मिळतील. यात साइड माऊंटेड फिंगरप्रिंट सेन्सर, फेस अनलॉक फीचर, पाणी आणि धुळीपासून वाचण्यासाठी फोनमध्ये आयपी५२ रेटिंग आणि चांगल्या ऑडियोसाठी स्टीरियो स्पिकरसह डॉल्बी ॲटमॉसचा सपोर्ट दिला जाईल.

आजूबाजूचा गोंधळ होईल छुमंतर! जबरदस्त नॉइज कॅन्सलेशन येत आहेत वनप्लस बड्स ३

वनप्लस बड्स ३ कंपनीच्या फ्लॅगशिप स्मार्टफोन वनप्लस १२ सह भारतीय बाजारात येत आहेत. यात ४४ तासांपर्यंत बॅटरी बॅकअप, १०.४ मिमी वूफर आणि आयपी ५५ रेटिंग मिळेल. यांची किंमत आता लीक झाली आहे.

वनप्लस भारतासह जागतिक बाजारात वनप्लस १२ सीरिज स्मार्टफोन २३ जानेवारी म्हणजे आज लाँच करणार आहे. यातील वनप्लस १२ आणि वनप्लस १२आर स्मार्टफोनची किंमत देखील लाँच पूर्वीचा ऑनलाईन लीक झाली आहे. परंतु या इव्हेंट मधून फक्त स्मार्टफोन नव्हे तर कंपनी आपले नवीन इअरबड्स देखील बाजारात लाँच करणार आहे. त्याच वनप्लस बड्स ३ ची किंमत टिपस्टर पारस गुगलानीनं शेअर केली आहे. चाल जाणून घेऊया तुमच्या बजेटमध्ये



बसत आहेत का कंपनीचे आगामी इअरबड्स.

वनप्लस बड्स ३ ची लीक किंमत

ऑनलाईन लीक झालेल्या माहितीनुसार, वनप्लस बड्स ३ ची भारतात एमआरपी १२,९९९ रुपये असेल. परंतु पहिल्या सेल दरम्यान इअरबड लाँच ऑफर अंतर्गत १०,४९९ रुपयांमध्ये उपलब्ध होऊ शकतात.

ऑफिशियल लाँच पूर्वीच वनप्लस नं वनप्लस बड्स ३ मधील फीचर्सची माहिती दिली आहे, ज्यात टच व्हॉल्यूम कंट्रोल, ४४ तासांची बॅटरी लाइफ आणि अडॅप्टिव नॉयज कॅन्सलेशनचा समावेश आहे. हे इअरबड चीनमध्ये आधीच उपलब्ध झाले आहेत त्यामुळे इतर स्पेसिफिकेशन्स देखील सहज उपलब्ध झाले आहेत.

वनप्लस बड्स ३ चे स्पेसिफिकेशन्स : वनप्लस बड्स ३ मध्ये १०.४मिमी कंपोसाइट डायाफ्राम बेस युनिट देण्यात आला आहे, जो क्लियर साऊंड आणि डीप बेस देतो. यात थ्री-मायक्रोफोन एआय सिस्टम ४९डेसिबल ॲक्टिव्ह नॉयज कॅन्सलेशन मिळते, त्यामुळे बॅकग्राऊंड नॉयज खूप कमी होते. एलएचडीसी ५.० हाय-रेज सपोर्टसह हे बड्स ९६किलोहर्ट्झ सॅम्पलिंग रेट आणि १एमबीपीएस वायरलेस स्पीडवर हाय क्वॉलिटी ऑडियो ट्रान्समिशन मिळते.

हे खासकरून गेमिंगसाठी डिझाइन करण्यात आले आहेत. त्यामुळे कस्टम गेम साऊंड इफेक्ट, नवीन साऊंड फिल्ड एक्सपान्शन, ३डी स्पॅशियल साऊंड इफेक्ट आणि इमर्सिव्ह इन-गेम साऊंडसाठी ९४मिलिसेकंद लो लेटेंसी मिळते. वनप्लस बड्स ३ नॉयज कॅन्सलेशनविना ४४ तासांपर्यंत वापरता येतात. तसेच हे १० मिनिटांच्या क्विक चार्जिंगसह ७ तासांपर्यंत वापरता येतात. इअरबड्स धूळ आणि पाण्यापासून सुरक्षित राहावेत म्हणून कंपनीनं आयपी ५५ रेटिंग दिली आहे. कनेक्टिव्हिटीसाठी ब्लूटूथ ५.३ चा सपोर्ट देण्यात आला आहे.

भक्तिमार्ग

व्यक्ती ज्या भावनेच्या योगाने ईश्वराला सर्वथा शरण जाते, ती भावना म्हणजे भक्ती होय. ईश्वराविषयीचे आत्यंतिक व अनन्य प्रेम म्हणजे ईश्वराची भक्ती, असेही म्हणता येईल. ईश्वराचा अनुग्रह करून देण्याचे सामर्थ्य असलेली आचारपद्धती म्हणजे ईश्वरप्राप्तीचा मार्ग होय. वेगवेगळ्या तत्त्वचिंतकांनी ईश्वराचा अनुग्रह मिळविण्याचे जे मार्ग सांगितले आहेत, त्यापैकी ईश्वरभक्ती हा एक महत्त्वाचा मार्ग आहे. ईश्वराच्या अस्तित्वाविषयीची व्यक्तीच्या मनातील श्रद्धा, सेवाभाव, समर्पणवृत्ती, भीती, ईश्वराचा अनुग्रह वा साक्षात्कार मिळविण्याची उत्कट इच्छा इत्यादींमधून व्यक्तीच्या मनात भक्तीची भावना स्फुरते. ईश्वर हा सर्वज्ञ, सर्वशक्तिमान, सुर्वगुणसंपन्न, सृष्टीचा निर्माता आणि आपला उद्धारकर्ता आहे, हा विश्वासच या भावनेच्या निर्मितीला कारणीभूत होतो. या व्यापक अथार्ने जगातील सर्व समाजांतून भक्तिभावना आढळते.

मोक्षाचा मार्ग : भारतात स्थूलमानाने मोक्षप्राप्तीचे ज्ञान, कर्म व भक्ती असे तीन मार्ग मानले जातात. योग हा स्वतंत्र मार्ग मानणारे लोकही आहेत. या विविध मार्गांपैकी कोणत्या मार्गाला किती महत्त्व द्यावयाचे, याबाबतीत आणि हे मार्ग एकमेकांना पूरक, पर्यायी की बाधक आहेत, याबाबतीत विविध संप्रदाय, भक्त इत्यादींमध्ये मतभेद आहेत. भक्तिमार्गी संतांच्या मते भक्ती हाच यापैकी सर्वश्रेष्ठ मार्ग आहे. याउलट, भक्ती हे मोक्षाचे साधन नसून ती मोक्षापेक्षाही श्रेष्ठ असा पाचवा पुरुषार्थ म्हणजेच साध्य आहे, असे मानणारे भक्तही आहेत.

ईश्वर व भक्त यांचे नाते : ईश्वर व भक्त यांच्या नात्याविषयी विविध धर्म, संप्रदाय व भक्त यांनी वेगवेगळ्या भूमिका घेतल्या आहेत. ईश्वर हा स्वामी, पिता, माता, बंधू, गुरू, सखा, आत्मा इत्यादी विविध नात्यांनी निर्दिष्ट करण्यात आला आहे. खरे म्हणजे, याबाबतीत नाती दर्शविणारे लिंगवाचक शब्द हे



लाक्षणिक असतात. ईश्वर परमप्रेमास्पद आहे, हेच या शब्दांतून सूचित करावयाचे असते. म्हणूनच ज्ञानेश्वरांनी वेगवेगळ्या संदर्भात ईश्वराबरोबर भक्ताची वेगवेगळी नाती मानली आहेत. ईश्वर हा सर्व आणि सर्वस्व आहे. इतर संतांनीही अशीच विविध नाती मानल्याचे आढळते.

इस्लाम धर्मात ईश्वर हा स्वामी व भक्त हा त्याचा दास, असे मानले आहे. ख्रिस्ती धर्मात ईश्वराला पिता मानले आहे. ईश्वराला आई मानणारे अनेक संत, विशेषतः महाराष्ट्रात, होऊन गेले. काही शाक्त पंथीय उपासकांनी स्वतःला आई व देवाला पुत्र मानल्याचेही सांगितले जाते. मधुराभक्तिनामक भक्तीच्या विख्यात प्रकारात ईश्वराला पती वा प्रियकर आणि स्वतःला पत्नी वा प्रेयसी मानले जाते. स्वतः स्त्री असलेल्या मीराबाईसारख्या भक्तांनी तर, हे नाते मानले आहेच; परंतु चैतन्य महाप्रभू, गुलाबराव महाराज इत्यादी पुरुषभक्तांनीही स्वतःला ईश्वराची प्रियतमा मानले आहे. सुफी पंथाच्या भक्तांनी ईश्वराला प्रेयसी आणि स्वतःला प्रियकर मानून ईश्वरभक्ती केल्याचे आढळते. अर्जुन, सुदामा इत्यादी भक्त हे ईश्वराला सखा मानणारे होते.



हिवाळ्यात कशी घ्याल केसांची काळजी

प्रत्येक ऋतूमध्ये केसांची विशेष काळजी घेणं गरजेचं असतं. महत्त्वाचं म्हणजे हिवाळ्यात केसांची काळजी घेणं फार महत्त्वाचं असतं. हिवाळ्यात त्वचा कोरडी आणि निर्जीव होते. त्यामुळे केस तुटू लागतात आणि केसांची चमकही कमी होत जाते. म्हणून आपण हिवाळ्यात केसांची काळजी कशी घ्यायची...

हिवाळ्यात दररोज केस धुने शक्य नाही. त्यामुळे केसं खराब होण्याची शक्यता जास्त असते. केसांच्या समस्या टाळण्यासाठी आठवड्यातून २ वेळा हलक्या शॅम्पूने केसं धुवा आणि कंडिशनर करणे विसरू नका.

डोक्यातील कोंड्यामुळे केसं कमकुवत होतात. हिवाळ्यात कोंड्याची समस्या मोठ्या प्रमाणात डोकं वर काढते. म्हणून डोक्यातील कोंडा कमी करण्यासाठी नियमितपणे डोक्यात तेल लावणे आवश्यक असते.

तेल मालिश देखील महत्त्वाची आहे. जसे शरीराला पौष्टिक आहार आवश्यक असते. तसेच केसांची सुद्धा योग्य निगा राखणे आवश्यक असते. हिवाळ्यात केसांची पूर्णपणे काळजी घेतली तर केसांची स्थिती चांगली होत जाते.

हिवाळ्यात केस ड्राय होण्याची जास्त शक्यता असते. त्यामुळे बाहेर जातांना केसांना स्कार्फने झाकून बाहेर पडावे. हिवाळ्यात केसांना जास्त स्प्लिटस पडतात. त्यामुळे अधूनमधून केसांना ट्रीम करत राहा. म्हणजे केस हेल्दी राहतील.

जवळपास प्रत्येकाच्याच दिवसाची सुरुवात चहाने होते. तर आजच्या या दिवशी जाणून घेऊया चहाचे काही असे फायदे जे तुम्हाला करतील थक्क.

केसांची चमक वाढवण्यासाठी



तुम्ही चहाप्रेमी असाल तर नक्की जाणून घ्या चहाचे हे काही फायदे

केस चमकदार व्हावेत यासाठी ग्रीन टी चा वापर केला जातो. त्यासाठी ग्रीन टीच्या तीन बॅग उकळत्या पाण्यात टाका. पाणी थंड झाल्यावर टी बॅग काढून घ्याव्या आणि त्या पाण्याने केस धुवून घ्या. केस गडद होण्यासाठी ग्रीन टीऐवजी ब्लॅक टीचा वापर करावा.

डोळ्यांवरील सूज घालवण्यासाठी

सुजलेले डोळे टी बॅग तुमची समस्या दूर करू शकतात. त्यासाठी डोळे बंद करून टी बॅग डोळ्यांवर १० मिनिटं ठेवा. त्यानंतर तुम्हाला झालेला बदल जाणवेल.

आपल्यासोबत गुलाबाच्या फुलांचं सौंदर्य वाढवण्यासाठी

चहाच्या पानांमध्ये असलेलं विशिष्ट प्रकारचे टॅनिक ॲसिड गुलाबाच्या फुलांचे सौंदर्य आणि रंग वाढवण्यास मदत करतं. त्यासाठी वापरलेल्या टी बॅग फाडून गुलाबाच्या झाडाच्या मुळाशी पसरवावी.

पायांचे सौंदर्य वाढवण्यासाठी

जर दिवसभर काम करून तुमच्या पायांना दुर्गंध येत असेल किंवा पायाच्या स्कीनची समस्या असेल तर टी बॅगचा वापर करू शकता. त्यासाठी कोमट पाण्यात टी बॅग टाकून त्या पाण्यात पाय भिजवा. त्यामुळे पायांची दुर्गंधी तर जाईलच, पण त्याचसोबत पायदेखील मऊ होतात.

मेथीदाणे आरोग्यास लाभदायक



मेथीदाणे आरोग्यास अत्यंत उपयुक्त आहेत. मेथीमध्ये प्रोटीन, फॅट, कार्बोहायड्रेट, कॅल्शियम, फॉस्फोरस आणि आयर्नसारखे न्यूट्रीएंट्स असतात. मेथीदाणे ॲनिमिया म्हणजे शरीरात रक्ताची कमतरता असणाऱ्या रुग्णांसाठी खूप फायदेशीर आहेत. मेथीदाण्यामध्ये बहुमूल्य औषधी गुण आहेत.

मेथीचे दाणे आर्थरायटीस आणि साइटिका समस्यांवर रामबाण उपाय आहेत. एक ग्रॅम मेथीदाण्यांची पावडर आणि सुंठ पावडर यांचे मिश्रण गरम पाण्यातून दिवसभर दोन-तीन वेळा घ्या.

केसांमध्ये कोंडा झाला असेल तर मेथीच्या दाण्यांची पेस्ट डोक्याला लावा. त्यानंतर अर्ध्या तासाने केस धुवा. सुती कापडाने पुसा.

मेथीदाणे रात्रभर नारळाच्या गरम तेलात भिजवून ठेवा. सकाळी या तेलाने डोक्याला मसाज करा. हळूहळू केस गळणे बंद होईल.

पोटातील गॅस आणि छातीतील कफ दूर करण्यासाठी मेथी रामबाण औषधीचे काम करते. दररोज ५ ग्रॅम मेथीचे चूर्ण सकाळ-संध्याकाळ खाल्ल्याने वातरोग दूर होतात.

मेथीदाण्यामध्ये असलेले भरपूर फायबर आणि स्टेरॉइड दोन पद्धतीने काम करतात. एक म्हणजे शरीरात इन्सुलिनची संवेदनशीलता वाढवतात. याची मधुमेहींसाठी खूप गरज भासते. दुसरे म्हणजे यामुळे कोलेस्ट्रॉल नियंत्रित राहतो. सोबतच मेथी दाण्यांमुळे प्रतिकारशक्तीतही वाढ होते.

मेथीदाण्याची पावडरची पेस्ट तयार करून त्वचेवर लावल्यास जळाल्याचे व्रण दूर होण्यास मदत होईल.

थायरॉइडची लक्षणे आणि उपचार

थायरॉइडसंबंधी आजारांचे प्रकार आणि उपाय

हायपो थायरॉइडिसीम : थायरॉइडसंबंधी सर्वसामान्य आजार म्हणजे हायपो थायरॉइडीसीम हा आहे, यामध्ये विभिन्न कारणांमुळे थायरॉइड ग्रंथीची काम करण्याची क्षमता कमी होत जाते. नुकत्याच जन्मलेल्या बाळापासून ते ८०-९० वर्षांच्या वयोवृद्धापर्यंत कोणालाही हा आजार होऊ शकतो.

लक्षणे : चेहऱ्यावर सूज येणे, सुस्ती वाटणे, जास्ती झोप येणे, हात-पाय दुखणे, बद्धकोष्ठता, मनाची चलबिचल आणि उदास वाटणे, महिलांमध्ये मासिक पाळी अनियमित होणे आणि थोड्या प्रमाणात वजन वाढणे ही साधारण लक्षणे दिसून येतात.

सकस आहाराची कमतरता आणि धावपळीची जीवनशैली यामुळे सध्या अनेक आजारांना आमंत्रण देणारी ठरत आहे. यामध्ये थायरॉइड या आजाराचा समावेश आहे. थायरॉइड ही मानवी शरीरातील एक महत्त्वपूर्ण ग्रंथी आहे. या ग्रंथीचे स्थान गळ्यात विशिष्ट ठिकाणी असते. शरीर किती वेगाने ऊर्जा खर्च करते, शरीरात किती प्रोटिन तयार होतात आणि अन्य हार्मोन्सच्या बाबतीत शरीर किती संवेदनशील आहे, या बाबींवर या ग्रंथीचे नियंत्रण असते. या सगळ्या प्रक्रियेदरम्यान ट्रायओडोथायरॉनाईन (टी-३) आणि थायरॉक्सिन (टी-४) हे दोन प्रकारचे हार्मोन्स तयार होतात. हे हार्मोन्स विशिष्ट शारीरिक प्रक्रियेसाठी आवश्यक असतात. थायरॉइडचे सुप्त थायरॉइड (हायपो थायरॉइडिझम) किंवा जागृत थायरॉइड (हायपर थायरॉडिझम) असे दोन प्रकार असून, ते व्यक्तीला आयुष्यात कोणत्याही वयात होऊ शकतात.

उपचार : या प्रकारच्या हायपोथायरॉइडिसीमची उपचार पद्धती अतिशय सोपी असते. जेवढ्या प्रमाणात शरीरात टी४ संप्रेरकाची कमतरता आहे, तेवढ्या प्रमाणात ते गोळीच्या माध्यमातून दिले जाते आणि नियमितपणे रक्ततपासणी करून त्यांचे प्रमाण योग्य राखले जाते. त्यामुळे हायपो थायरॉइडिसीम हा आजार नसून एक कमतरता आहे. एकदा ती कमतरता गोळीद्वारे भरून काढली की रुग्ण एका सामान्य व्यक्तीप्रमाणे जीवन व्यतीत करू शकतो.

हायपरथायरॉइडिसम

हायपो थायरॉइड विपरीत जो आजार असतो, त्यास हायपर थायरॉइडिसम असे संबोधले जाते, ज्यामध्ये थायरॉइड ग्रंथी गरजेपेक्षा अधिक वेगाने काम करते. परिणामी शरीरातील टी३ आणि टी४ संप्रेरकांचे प्रमाण वाढते आणि टीएसएच कमी होते.

लक्षणे : हात-पाय थरथर कापणे, वजन कमी होणे, वारंवार शौचास होणे, छातीमध्ये धडधड जाणवणे, खूप घाम येणे ही लक्षणे दिसतात. काहींमध्ये डोळे सुजणे, डोळे लाल होणे असे त्रासदेखील होऊ शकतात. या प्रकारच्या थायरॉइड आजाराची व्याप्ती साधारण लोकसंख्येमध्ये एक टक्का आहे.

उपचार : थायरॉइड विपरीत काम करणारी गोळी, रेडिओॲक्टिव्ह आयोडिन थेरपी अथवा शस्त्रक्रिया अशा उपचारपद्धती अवलंबल्या जातात. याव्यतिरिक्त थायरॉइड ग्रंथीमध्ये गाठी होणे (गॉयटर), थायरॉइड ग्रंथीचा कॅन्सर, थायरॉइड स्थानभ्रष्ट असणे (एक्टोपिक थायरॉइड) हे आजार असू शकतात. त्यांचे उपचार रुग्ण आणि तपासणी अहवालांपरत्वे वेगवेगळे असू शकतात.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या शौर्याने गाजलेले गडकिल्ले ठरणार जागतिक वारसा!

ना. सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकाराला सांस्कृतिक विभागाकडून केंद्र सरकारकडे पाठवलेला प्रस्ताव युनेस्कोकडे सादर

'मराठा लष्करी रणभूमी परिसर'मधील १२ गडकिल्ल्यांच्या समावेशाची शिफारस

दै.जनप्रभात मुंबई, दि.३० जानेवारी :छत्रपती शिवाजी महाराजांच्या शौर्याचे साक्षीदार ठरलेले महाराष्ट्रातील ११ व तमिळनाडू मधील १ असे १२ गडकिल्ले युनेस्कोने जागतिक वारसा स्थळांच्या यादीत समाविष्ट करण्यासाठी प्रस्तावित झाले आहे. राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री ना. श्री. सुधीर मुनगंटीवार यांनी पाठविलेला प्रस्ताव केंद्र सरकारने स्वीकारला असून युनेस्कोकडे यासंदर्भात शिफारस केली आहे. 'मराठा लष्करी रणभूमी परिसर' म्हणून ओळख असलेल्या या १२ किल्ल्यांना युनेस्कोकडे पाठविण्यात आलेल्या प्रस्तावात स्थान देण्यात आले आहे.छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाच्या ३५०व्या वर्षानिमित्त सांस्कृतिक कार्य मंत्री ना. श्री. सुधीर मुनगंटीवार यांनी यासंदर्भातील प्रस्ताव केंद्र सरकारला पाठविला होता. त्याचवेळी देशभरातील विविध राज्यांमधून केंद्र सरकारकडे प्रस्ताव आले होते. मात्र ना. श्री. सुधीर मुनगंटीवार यांच्याकडून सातत्याने पाठपुरावा करण्यात आला. त्यानंतर केंद्र सरकारकडून महाराष्ट्राचा प्रस्ताव युनेस्कोकडे पाठविण्यात आला आहे.यामध्ये महाराष्ट्रातील ११ आणि तामिळनाडूतील जिंजी अशा १२ गडकिल्ल्यांना नामांकन देऊन जागतिक वारसा स्थळांच्या यादीत समाविष्ट करण्याची शिफारस करण्यात आली आहे. यामध्ये किल्ले रायगड, शिवनेरी, लोहगड, साल्हेर, खांदेरी, राजगड, प्रतापगड, सुवर्णदुर्ग, पन्हाळा, विजयदुर्ग, सिंधुदुर्ग या महाराष्ट्रातील ११ किल्ल्यांचा समावेश आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचे रणझुंजार कर्तृत्व आणि त्यांच्या शौर्याचे साक्षीदार ठरलेले हे सर्व किल्ले २०२४-२५ या वर्षासाठी जागतिक वारसा स्थळाच्या यादीत येण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे.युनेस्कोच्या वतीने सांस्कृतिक (कल्चरल) आणि नैसर्गिक (नॅचरल) अशा दोन कॅटेगरीमध्ये जागतिक वारसा स्थळांची यादी जाहीर केली जाते. यात महाराष्ट्रातील ११ किल्ल्यांना सांस्कृतिक निकषात समाविष्ट करण्याची शिफारस केंद्र सरकारने केली आहे. वैशिष्ट्यपूर्ण व अपवादात्मक सांस्कृतिक परंपरांची साक्ष देणाऱ्या वास्तूंचा या गटात समावेश केला जातो. यासोबतच मानवी शौर्याचा इतिहास सांगणाऱ्या या किल्ल्यांचे आर्किटेक्चर, इमारतीचे बांधकाम आणि त्यांची तांत्रिक बाजू देखील यामध्ये ग्राह्य धरली जाते. २०२१ मध्ये युनेस्कोने 'मराठा लष्करी रणभूमी परिसर' हा संभाव्य जागतिक वारसा स्थळांच्या यादीत समाविष्ट केला होता. त्यानंतर आता भारतातील ४२ जागतिक वारसा स्थळांमध्ये युनेस्कोने मराठा लष्करी रणभूमी परिसरातील १२ किल्ल्यांचा समावेश करावा, असा प्रस्ताव केंद्र सरकारने युनेस्कोकडे सादर केला आहे.

ना. मुनगंटीवार यांचे 'ऐतिहासिक' निर्णय

राज्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री ना. श्री. सुधीर मुनगंटीवार यांच्या अफलातून कार्यशैलीवर पुन्हा एकदा शिक्कामोर्तब झाले आहे. त्यांनी घेतलेल्या अनेक ऐतिहासिक निर्णयांमुळे ऐतिसाहिक वारसा आणि परंपरेचे जतन करण्याच्या दृष्टीने सरकारने पाऊल टाकले आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाचे ३५०वे वर्ष साजरे करताना सांस्कृतिक कार्यक्रमांसह ऐतिहासिक परंपरेचे जतन करण्याच्या दृष्टीने देखील त्यांनी पुढाकार घेतला.महाराजांनी ज्या वाघनखांनी अफजलखानाचा कोथळा बाहेर काढला ती वाघनखे ब्रिटनच्या संग्रहालयातून भारतात आणण्याची जिद्द त्यांनी बाळगली. सातत्याने पाठपुरावा करून ब्रिटन सरकारसोबत त्यांनी सामंजस्य करार देखील केला. लवकरच ही वाघनखे दर्शनासाठी भारतात दाखल होणार आहेत. यासोबतच जम्मू-काश्मीर मधील कुपवाडा येथे मराठा इन्फन्ट्री सैन्य दलाच्या सहकार्याने 'आम्ही पुणेकर' या संस्थेमार्फत छत्रपती शिवाजी महाराजांच्या पाकिस्तानच्या दिशेने तलवार धरलेल्या पुतळ्याचे देखील काही दिवसांपूर्वी अनावरण झाले. छत्रपती शिवाजी महाराजांनी ज्या शीशैलममध्ये तपश्चर्या केली, तिथे महाराजांचे एक छोटे मंदिर होते. सरकारने तिथे भव्यदिव्य मंदिर उभे केले.

सिध्दांत भंडारे मुंबई इन्व्हरसिटीत धावण्यात प्रथम



दै.जनप्रभात
सातारा /जीवन मोहिते:

पाटण तालुका बांबावडे गावचे सुपुत्र आयु सिध्दांत बाबासो भंडारे यांने मुंबई ईनवरसिटी वतीने चिपळुन सावर्डे येथे घेण्यात आलेल्या धावण्याच्या स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकाविला सिध्दात हा मनोज भंडारे उपअध्यक्ष पाटण तालुका वंचित यांचे पुतने आहेत मुंबई ईनवरसिटी वतीने चिपळुन सावर्डे येथे रनिंग क्रीकेट कबड्डी खोखो या स्पर्धे चे आयोजन करण्यात आले होते त्यावेळी सिध्दांत भंडारे यांनी धावण्यात प्रथम क्रमांक मिळाल्या बध्दल सर्व स्थरातुन कैतुक होत असुन समाजरत्न मा राहुल रोकडे भानुदास सावंत राजाराम भंडारे मनोज भंडारे आत्माराम कांबळे राजेद्र सावंत मधुकर जगधानी आबासाहेब भंडारे विजय भंडारे आदि मान्यवरांनी अभिनंदन केले पुढील वाटचालीस शुभेच्या दिल्या

द युवा ग्रामीण पत्रकार संघाच्या शिरूर तालुका अध्यक्षपदी

शकील मनियार; तालुका उपाध्यक्षपदी विवेकानंद फंड व विश्वनाथ घोडके

दै.जनप्रभात
पुणे/(प्रतिनिधी)

रिजवान बागवान पत्रकार बांधवांच्या न्याय हक्कासाठी व अन्याय अत्याचाराच्या विरोधात लढा उभारून पत्रकारांना न्याय देणारी संघटना म्हणजे द युवा ग्रामीण पत्रकार संघ,या संघाच्या शिरूर तालुका अध्यक्षपदी निर्वी येथील शकील मनियार यांची तर शिरूर तालुका उपाध्यक्षपदी रांजणगाव गणपती येथील विवेकानंद फंड व सणसवाडी येथील विश्वनाथ घोडके यांची सर्वांनुमते निवड करण्यात आली आहे. शिरूर शहरातील कृषी उत्पन्न बाजार समिती कार्यालय येथे पार पडलेल्या द युवा ग्रामीण पत्रकार संघ आयोजित मराठी दिनदर्शिका २०२४ चे प्रकाशन सोहळ्यात तालुका अध्यक्ष शकील मनियार तालुका उपाध्यक्ष विवेकानंद फंड व विश्वनाथ घोडके यांना संस्थापक अध्यक्ष अन्सार शेख,राज्य कार्याध्यक्ष शामभाऊ कांबळे,इलेक्ट्रॉनिक मिडिया प्रमुख रोहित वाळके,पुणे जिल्हाध्यक्ष रिजवान बागवान आदि.यांच्या शुभहस्ते गौरव करून नियुक्तीपत्र देण्यात आले.

तालुका अध्यक्षपदी शकील मनियार तालुका उपाध्यक्षपदी विवेकानंद फंड व विश्वनाथ घोडके यांच्या निवडीबद्दल राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे पुणे जिल्हा उपाध्यक्ष मा.तात्यासाहेब सोनवणे,द युवा ग्रामीण पत्रकार संघाचे राज्य कार्याध्यक्ष मा.शामभाऊ कांबळे,निमोणे गावचे सरपंच मा.संजय (आबा) काळे,मा. आदर्श सरपंच जिजाताई



दुर्गे,देवदैठण गावचे मा.सरपंच मगलताई कौठाळे,सामाजिक कार्यकर्ते हाजी सादिकभाई बागवान,शालेय व्यवस्थापन समितीचे निर्वी अध्यक्ष मा.प्रदिपभाऊ साळुंकेशरद जोशी विचारमंच शेतकरी संघटनेचे शिरूर तालुकाध्यक्ष मा.नवनाथ गव्हाणे,श्रीपाद उद्योग समुहाचे अध्यक्ष मा.कमलेश बुराडे,द युवा ग्रामीण पत्रकार संघाचे नगर तालुकाध्यक्ष मा.हेमंत साठे,सदस्य बिभिषण झेंडे आदिंनी कौतुक करून अभिनंदन केले आहे आहे.

द युवा ग्रामीण पत्रकार संघाची कार्यकारणी पुढीलप्रमाणे-तालुकाध्यक्ष शकील मनियार,तालुका उपाध्यक्ष विवेकानंद फंड,विश्वनाथ घोडके,तालुका सचिव अक्षय वेताळ,तालुका कार्याध्यक्ष सुजित मैड,तालुका संपर्कप्रमुख विजय कांबळे,तालुका सल्लागार संतोष काळे,तालुका कोषाध्यक्ष मच्छिंद्र काळे,तालुका खजिनदार संजय मोरे,तालुका संघटक सुदर्शन दरेकर,तालुका सरचिटणीस सुनिल काटे,कायदेविषयी सल्लागार एडवोकेट इन्नुस मणियार आदि.

वंचित बहुजन आघाडीच्या नवीन शाखेचे उद्घाटन

नामफलकाचे जल्लोषात उद्घाटन करताना वंचितचे पदाधिकारी व कार्यकर्ते.



दै.जनप्रभात
सातारा/प्रतिनिधी

जीवन मोहिते : वारुंजी,ता. कराड याठिकाणी वंचितच्या नवीन शाखेचे मोठ्या उत्साहात उद्घाटन करण्यात आले. यावेळी जिल्हाध्यक्ष बाळकृष्ण देसाई,महासचिव शरद गाडे, तालुकाध्यक्ष प्रा.दिलीप लोखंडे, अध्यक्षा सौ.अपर्णा वाघमारे व सौ.विनंता लगाडे यांची प्रमुख उपस्थीती होती.सदरच्या कार्यक्रमास प्रशांत थोरवडे, संतोष बोलके, राहूल थोरवडे, राजकुमार लादे, मिलींद कांबळे, साहेबराव लोखंडे , किरण सावंत, भागवत कांबळे, जितेंद्र गोतपागर, राजेंद्र गोखले, नितीन जाधव, दिपकजी कांबळे, भगवान सोनवणे, दिनकर कांबळे, ऋतूराज कांबळे, सौ.तृप्ती शिंदे,सौ.सुवर्णा विटूले,सौ.विध्या वाढते,सौ. सुरेखा वाढते, विजय अडसुळे, अमोल गंगावणे,वारुंजी गावचे सर्व उपासक-उपासीका मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रा बालाजी शिंदे यांचा सेवापूर्ती सोहळा संपन्न

दै, जनप्रभात परभणी अरविंद कांबळे

श्री गुरु बुद्धीस्वामी महाविद्यालय येथे व्यवसायिक अभ्यासक्रम विभाग मध्ये सेवेत असलेले प्रा बालाजी शिंदे यांच्या सेवानिवृत्ती निमित्त आयोजित कार्यक्रमाचे अध्यक्ष संस्थेचे पदसिद्ध अध्यक्ष श्री डॉ नंदिकेश्वर शिवाचार्य महास्वामीजी हे होते. प्रा बालाजी शिंदे यांची या महाविद्यालयात ३३ वर्ष सेवा झाली या प्रसंगी संस्थेचे कार्याध्यक्ष प्रमोद अण्णा एकलारे, सचिव अमृतराज कदम ,सहसचिव प्रा.गोविंदराव कदम, कोषाध्यक्ष उत्तमराव कदम ,ज्येष्ठ संचालक श्री दत्तात्रेय वाघमारे,श्री साहेबरावजी कदम, माजी प्राचार्य मनोहरराव सोनटक्के,आजीव सदस्य सूर्यकांत कदम, प्राचार्य डॉ के राजकुमार ,उपप्राचार्य डॉ शिवसांब कापसे यांची मंचावर उपस्थिती होती, कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ के राजकुमार यांनी केले तर सचिव अमृत राज कदम यांनी शिंदे सरांच्या कार्यकाळाविषयी समाधान व्यक्त केले. कुटुंबासोबतच विद्यार्थ्यांचे विकासात शिक्षकांनी हातभार लावला पाहिजे आणि हे काम त्यांच्याकडून झाल्याचे वक्तव्य याप्रसंगी केले. या कार्यक्रमास मोठ्या संख्येने आप्तस्वकीय यांची उपस्थिती होती, यावेळी अनेकांनी मनोगत व्यक्त करून शिंदे सरांविषयी असलेले प्रेम व्यक्त केले, कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा आबाजी खराटे ,डॉ जितेंद्र पुल्ले, प्रा शहेनशहा शेख ,प्रा अंबेकर सर, यांनी प्रयत्न केले या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा चारुदत्त डाफणे यांनी केले या कार्यक्रमास मोठ्या संख्येने महाविद्यालयीन प्राध्यापक कर्मचारी यांची उपस्थिती होती



मराठवाड्यावर दुष्काळाचं सावट; जायकवाडीतील पाणीसाठा पिण्याच्या पाण्यासाठी राखीव..!

दै.जनप्रभात
प्रतिनिधी मोहन आखाडे

छत्रपती संभाजीनगर -यंदा अपेक्षित पाऊस झाला नसल्याने अनेक ठिकाणी दुष्काळ सदृश्य परिस्थिती निर्माण झाली असून, भर उन्हाळ्यात भीषण पाणी टंचाई निर्माण होण्याची शक्यता वर्तवली जात असून या पार्श्वभूमीवर आता प्रशासनाने जायकवाडी धरणातील पाणी पिण्यासाठी राखीव ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तर, दरवर्षी उन्हाळी पिकांसाठी जायकवाडी प्रकल्पातून ४ आवर्तने दिली जातात. मात्र, यंदा उन्हाळी पिकांसाठी पाणी न सोडण्याचा निर्णय देखील लाभक्षेत्र विकास प्राधिकरण (कडा) प्रशासकांनी घेतला आहे. जायकवाडी धरणातून छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, जालना जिल्ह्यासह औद्योगिक वसाहतींना जायकवाडी प्रकल्पातूनच पाणीपुरवठा होतो. सध्या जायकवाडी धरणात ३८.४२ टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे. त्यामुळे या सर्व बाबी लक्षात घेता जायकवाडी धरणातील पाणीसाठा पिण्यासाठी राखीव ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तर, दरवर्षी उन्हाळी पिकांसाठी जायकवाडी प्रकल्पातून ४ आवर्तने दिली जातात. मात्र, यंदा उन्हाळी पिकांसाठी पाणी न सोडण्याचा निर्णय देखील घेण्यात आला आहे.

परमेश्वर नरवटे यांचा उपक्रम जिल्ह्यात प्रथम

दै.जनप्रभात
प्रतिनिधि - अब्दुल कदीर बख्श.

राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धा २०२३-२४ या स्पर्धेत जि प प्राथमिक शाळा शेकापूर बाई तालुका हिंगणघाट येथील शिक्षक परमेश्वर रामचंद्र नरवटे यांनी जिल्हा स्तरावर प्राथमिक गटात प्रथम क्रमांक प्राप्त केला आहे.

राज्यातील सर्व उपक्रमशील शिक्षक गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी सतत प्रयत्न करत असतात. नवोक्रमाच्या माध्यमातून आपल्या कल्पनांना व विचारांना मूर्त स्वरूप देण्याकरिता तसेच विद्यार्थी, शिक्षक व पालक यांच्या समस्या सोडविण्याच्या अनुषंगाने नवनवीन उपक्रम हाती घेत असतात. शिक्षकांच्या कल्पकतेला व सृजनशीलतेला वाव मिळावा म्हणून दरवर्षी परिषदेमार्फत राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धा आयोजित केली जात असते. यावर्षीच्या स्पर्धेत हिंगणघाट तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा शेकापूर (बाई) येथील शिक्षक परमेश्वर नरवटे यांच्या 'दोन्ही हातांनी लिहिणारे जिनिअस' या उपक्रमाला जिल्ह्यात प्रथम क्रमांक प्राप्त झाला आहे. नुकताच जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था वर्धाचे प्राचार्य डॉ. मंगेश घोगरे यांनी पारितोषिक देऊन सन्मान केला.

परमेश्वर नरवटे यांनी सुरुवातीला खेकडीच्या शाळेत त्यानंतर कोल्हीच्या शाळेत आणि आता शेकापूरच्या शाळेत हा उपक्रम यशस्वीपणे राबविला आहे. आपली अक्षरे आकर्षक असावी असे प्रत्येकालाच वाटते पण अनेकांना एका हाताने वारंवार सराव करूनही वळणदार अक्षरापासून दूरच राहावे लागते. जिथे एकाच हाताने अक्षरे सुरळीत येत नाहीत तिथे दुसऱ्या हाताने लिहिल्यास काय होणार? पण हिंगणघाट तालुक्याच्या शेकापूर बाई येथील शिक्षक परमेश्वर नरवटे यांच्या शाळेतील विद्यार्थी उजव्या हातासोबतच डाव्या हातानेही वळणदार अक्षरे गिरवतात. विद्यार्थ्यांचे एकाच वेळी दोन्ही हातांनी काढले जाणारे आकर्षक अक्षरे पाहून प्रत्येकालाच नवल वाटते. असा हा आगळावेगळा 'दोन्ही हाताने लिहिणारे जिनिअस' हा उपक्रम स्पर्धेत सादर केला व त्यास जिल्हास्तरीय प्रथम क्रमांक प्राप्त झाला. यासाठी परमेश्वर नरवटे यांचे जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी डॉ ज्ञानदा फणसे, शिक्षणाधिकारी जगताप, डायटचे प्राचार्य मंगेश घोगरे, गटशिक्षणाधिकारी सोनावणे, केंद्रप्रमुख दांडेकर, मुख्याध्यापक मेश्राम, सहकारी शिक्षक दिपाली सावंत, रामकृष्ण ढबाले व शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष राजेंद्र खेकारे यांनी अभिनंदन केले आहे.





दै.जनप्रभात : - संकट चतूर्थी महोत्सव निमित्त काल्याच्या किर्तन व प्रवचन कार्यक्रम

दैनिक जनप्रभात जयश्री मेंघरे रामटेक अठराभुजा गणपती देवस्थान, येथे माजी आमदार मल्लिकार्जून रेड्डी यांनी केले पूजन. रामटेक - अठराभुजा गणपती देवस्थान,रामटेक येथे संकट चतूर्थी महोत्सव निमित्त काल्याच्या किर्तन व प्रवचनाच्या कार्यक्रमाला सहकार्यासह उपस्थित राहून कार्यक्रमाच्या आस्वाद घेतला. यावेळी माजी आमदार मल्लिकार्जून रेड्डी,रामटेक भाजपा शहर अध्यक्ष उमेश पटले,आलोक मानकर सह रामटेक शहरातील गणमान्य नागरीक, व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

जनप्रभात हे दैनिक पत्र मालक, प्रकाशक, मुद्रक : संपादक राहुल ज्ञानेश्वरराव गजरे यांनी रुतुजा पिंटर नवीन आष्टी ता. आष्टी जि. वर्धा ४४२२०२ येथे मुद्रीत करुन साप्ताहिक जनप्रभात कार्यालय, नवीन आष्टी ता. आष्टी जि. वर्धा ४४ २२०२ येथे प्रसिध्द केले. भ्रमणध्वनी ७८७५६१३६१९(या पत्रकातील सर्व माहितीशी संपादक, मालक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद वर्धा न्यायालयांतर्गत) RNI No : MAHMAR/2020/82242